# रायआंवळे

म. ग्रं. मं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ४२

निबंध
१५८११३८

REFBK-0005578

अवळसकर



# रायआंवळे

[ लघुनिबंध-संग्रह ]

REFBK-0005578

लेखक

शां. वि. अवळसकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५५७८

१९३७

किंमत १२ आणे

प्रकाशक
शां. वि. अवळसकर,
मेहेंदळे हायस्कूल,
रोहें.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. ]

मुद्रक
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
'राजगुरु' प्रेस, ५१३ शनवार,
पुणें २.

श्री मातृचरणीं

# आभार

---

गेल्या तीन वर्षांत लिहिलेल्या लघुनिबंधांतले सुमारें अर्धेअधिक आज पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहेत. लेखनाची पूर्वतयारी त्यापूर्वीही तीन वर्षे चालूच होती; पण प्रत्यक्ष लेखनाचें धाडस मात्र आत्मविश्वासाच्या अभावीं होत नव्हतें. ज्यांच्या प्रोत्साहनामुळें लेखनास प्रत्यक्ष सुरुवात करण्याची मला उमेद आली, त्या सर्वांचा मी अतिशय आभारी आहें. या बाबतींत मला मुख्यतः रा. बापूराव अवळसकर, रा. तात्या कुंटे, रा. नारायणराव कुळकर्णी व रा. बाबूराव पेंडसे यांचे आभार मानावयास हवेत.

पुस्तकांत अंतर्भूत केलेल्या निबंधांतील कांहीं सह्याद्री, प्रतिभा, पारिजात व कोंकण एज्युकेशन सोसायटीचें त्रैमासिक यांत एक-एकदां प्रसिद्ध झाले आहेत. सदरहू मासिकांच्या संपादकांनीं मला अतिशय उपकृत करून ठेविलें आहे. त्यांनीं दाखविलेल्या आपुलकीबद्दल मी त्यांचा अतिशय आभारी आहें.

पुस्तक प्रसिद्ध करण्याचा विचार करीत असतांना व निबंधांची निवड करीत असतांना ती. ना. म. पटवर्धन व प्रो. वि. पां. दांडेकर यांच्या मार्गदर्शनाचा मला अत्यंत उपयोग झाला आहे. त्यांनीं दाखविलेल्या जिव्हाळ्याच्या व आत्मीयतेच्या अभावीं हें पुस्तक प्रसिद्ध होण्याचें फार लांबणीवर पडलें असतें—कदाचित् प्रसिद्धच झालें नसतें !

'राजगुरु आणि कंपनी'च्या व्यवस्थापकांनीं माझ्या पुस्तकाचें काम अल्पावधींत, काळजीपूर्वक आणि आपलेपणाच्या भावनेनें केलें आहे; त्यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतों.

मेहेंदळे हायस्कूल,<br>
रोहें<br>
ता. १३ मे १९३७ इ.

शां. वि. अवळसकर.

# अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | देऊळ व तरुण | १ |
| २ | फेरफटका | ५ |
| ३ | उठण्यापूर्वीची मोहक झोंप | १० |
| ४ | सत्याभास | १६ |
| ५ | सूपशास्त्रांतील प्रगति | २० |
| ६ | नाकारलेली वधू | २५ |
| ७ | उत्पत्ति, स्थिति आणि लय | २९ |
| ८ | माझा देव | ३५ |
| ९ | वरातीचा सुखसोहळा | ३९ |
| १० | सारखेपणा | ४३ |
| ११ | उन्हाळ्यांतील दुपार | ४८ |
| १२ | ग्रंथकार आणि रसिकता | ५४ |
| १३ | गायन | ५९ |
| १४ | वाचन | ६५ |
| १५ | दृष्ट | ७० |
| १६ | निरुत्साह व निष्क्रियता | ७४ |
| १७ | वाचक, लेखक आणि खेडें | ७९ |
| १८ | भ्रामक अर्थान्तरन्यास | ८३ |
| १९ | आशाभंग | ८९ |
| २० | दोन घुबड | ९३ |
| २१ | सिंहावलोकन | ९७ |
| २२ | तुलसीपूजा | १०२ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५५४६८

# देऊळ व तरुण

केशवसुतांच्या काव्यांतील कांहीं कांहीं ओळी मला नेहमीं म्हणाव्याशा वाटतात—नव्हे मी त्या न कळत म्हणतोंच. त्यांतल्या त्यांत सहजगत्या मुखांतून बाहेर पडणाऱ्या ओळी :—

“ देवळीं त्या देवास बळें आणा ।
परी राहे तो सृष्टिमधें राणा ॥”

या होत. टीकाकारांच्या दृष्टीनें लिहावयाचें झालें तर मीही असेंच म्हणेन कीं, केशवसुत शब्दांच्या बाबतींत अगदीं दरिद्री कवि आहेत. पण या दोन ओळी अपवादात्मक होत. केवढा मोठा आशय अगदीं किती 'साध्या' शब्दांत समाविष्ट झालेला या ओळींत आढळून येतो !

परमेश्वराविषयींचें पूर्वार्जित तत्त्वज्ञान आपण अगदीं सवंग विकतों. आपण म्हणतों कीं, “ परमेश्वर सगळें ब्रह्मांड व्यापून दशांगुळें उरला आहे. तो अमुक एका ठिकाणीं आहे नि तमुक ठिकाणीं नाहीं, असें म्हणतांच यावयाचें नाहीं. चराचराचा अणु-अणुहि परमेश्वराच्या पूर्णांशानें व्यापला आहे, ” इत्यादि इत्यादि.

पण देवळांत जाण्याविषयींचा प्रश्न निघाला म्हणजे हें सगळें तात्त्विक ज्ञान मनाच्या तळाशीं दडून-बुडून बसतें आणि आपण देवळांतल्या राम, कृष्ण, विठोबा यांच्या मूर्तींचा विचार करूं लागतों. आपल्याभोंवतीं अमूर्त रूपानें वसत असलेल्या परमेश्वराच्या अस्तित्वाचें भान त्या वेळीं आपणांस उरत नाहीं. याचें

कारण माझ्या दृष्टीनें एकच; आणि तें म्हणजे अमूर्तावस्थेंतील परमेश्वराविषयीं आपल्याला कल्पना करतांच येत नाहीं. म्हणूनच म्हाताऱ्या अगर भाविक माणसांचा मूर्तिमय परमेश्वराची गांठ घेण्याबाबत अगदीं कटाक्ष असतो. तीं देवदर्शन घेतल्याशिवाय कधीं अन्नग्रहण करावयाचीं नाहींत, तें घेत असतांना व घेण्यास जातांनाही मनांत नामसंकीर्तन करतील आणि परमेश्वराला हजार तऱ्हांनीं आळवतील.

केशवसुतांच्या याच ओळींचा मनावर फार संस्कार झाला आहे म्हणून असो, विचार करण्याची संवय थोडी वाढली आहे म्हणून असो, अगर अन्य कांहीं कारणें असोत, देवदर्शना-साठीं देवळांत जाणें माझ्या वृत्तीला आणि माझ्यासारख्याच पुष्कळांच्या मनाला मानवत नाहीं. म्हणजे आम्ही तरुणमनाचे लोक नास्तिक आहोंत असें नव्हे; आमचें आस्तिक्य तर परमा-वधीस पोंहोचलेलें आहे. हाच विचार आमच्या मनांत डोकावतो कीं, परमेश्वर जसा देवळांत आहे, तसाच देवळाबाहेरही आहेच; मग त्याला अंतर्दृष्टीनें शोधावयास जागच्या जागींच राहून अन्तर्मुख झालें तरी भागतेंच कीं ! कशाला हवें देवळांत जायला तेवढ्यासाठीं !

आणि आम्ही देवळांत गेलोंच, तर मग आमचें मूर्तींतील देवत्वाकडे तितकेंसें लक्ष असत नाहीं. देऊळ किती वर्षांचें जुनें आहे, मूर्ति गंडकी शिलेची कीं दुसऱ्या कसल्या फत्तराची, देवळा-च्या शिखरांच्या खांबावर कोरलेलें काम तीनशें वर्षांपूर्वीचें, कीं त्याच्याही अगोदरचें, एकंदरींत त्यांत प्रकट झालेलें शिल्प बौद्ध-कालीन शिल्पाशीं जमतें कीं त्यांत हेमाडपंती ओबडधोबडपणा

आणि भरडेपण दिसतें, कीं त्यांत मुसलमानी कातीवपणा आणि नाजूकपणा भरलेला आहे, याची चिकित्सा करण्याची लहर आम्हांस येते. ही लहर अर्थात् आकस्मिक असते. हिंवाळ्यांत बेताची थंडी असतांना अंगास किंचित् झोंबणारी पण सुखसंवेदना निर्माण करणारी वाऱ्याची गारशी झुळूक लागावी, अगदीं तसा हा प्रकार होतो. देऊळ पडकें असलें आणि आंत गाभाऱ्यांत अंधार असला, तर जुनेपणाबरोबरच भयाणतेचा किंचित् पगडा आमच्या मनावर बसतो. एकंदरींत, तें देऊळ देवस्थान या दृष्टीनें आम्ही पाहूंच शकत नाहीं. तेथली मूर्ति आमच्या मनावर देवत्व स्थापित करीत नाहीं. गतकालीन इतिहासाकडे अन्तर्मुख होऊन, किंचित् उदास होऊन, आपल्याबरोबर देवळांत आलेल्यांशीं अबोला धरूनच बसण्याची आमच्या मनाची प्रवृत्ति होते.

पण अशा तऱ्हेच्या जुन्या देवळांत आर्यांचें गतकालीन, अदृश्य, ऐतिहासिक वैभव हुडकण्यास जावें, असें वाटून मी पुष्कळदां जातों. तरी तेथें मनावर आलेल्या खिन्नपणाच्या दडपणांत मला एक प्रकारचें सौख्य वाटतें. पण नवीन शिल्प ज्यांत पूर्णपणें उतरलें आहे, अशा एकाद्या धनाढ्य शेट्यानें बांधलेल्या देवळांत देव शोधावयाला तर मी कधींच जात नाहीं. देव जर कुठें नसेल तर तो नक्की अशा देवळांतून नसावा असें मला खात्रीपूर्वक वाटतें. त्या ठिकाणीं श्रीमंती दिसते, शिल्प आढळतें, पण त्याबरोबरच प्रतीत होणाऱ्या ऐश्वर्यांत मादक विलासीपणाच्या घाणीचा भपकारा तेथें येत असतो. तेथें माझ्या मस्तकांत भ्रमूं लागतें. इंदूरचें हुकुमचंदाचें त्रिलोरी देऊळ मी एवढ्याकारितांच बघावयास जात नाहीं; किंवा मुंबईच्या माधवबागेंत जावेंसें मला वाटत नाहीं.

अशीं देवळें म्हणजे माझ्या दृष्टीनें कुजवलेल्या सम्पत्तीची थडगीं होत. अशीं देवळें म्हणजे धनाढ्यांच्या सम्पत्तीचा मूर्तिमंत दिमाख होय. त्यांतील अप्रिय वैभव डोळ्यांना दिपवितें व त्याच वेळेस माझ्या मनाच्या अप्रसन्नतेंत भर घालतें. आणि मग प्रश्न मनांत उद्भवतो—हीं हजारांनीं मोजतां येतील एवढीं देवळें दरवर्षी निष्कारण कां बांधलीं जातात? देवळें बांधणें हा एकच का सम्पत्तीच्या सद्व्ययाचा श्रेष्ठतम मार्ग? अशीं देवळें बांधण्यापेक्षां उघड्या पडलेल्या गरिबांना राहण्यासाठीं कनवाळू होऊन बांधलेली एकच झोंपडी मी जास्त किंमतीची मानीन. शिराळशेटाप्रमाणें मी जर औट घटकेचा हिंदुस्थानचा राजा झालों, तर प्रत्येक श्रीमंतानें एका गरीब कुटुंबास राहण्यासाठीं आपल्या खर्चानें एक झोंपडी बांधून द्यावी व पुढील पन्नास वर्षांत एकही देऊळ, मशीद अगर चर्च बांधण्यांत येऊं नये, असा एकसहा हुकूम फर्मावीन व हुकूम मोडणारास तशीच मोठी शिक्षा ठोठावीन.

आपली अशी पूर्वापार समजूत आहे कीं, परमेश्वर म्हणजे मूर्तिमंत सत्त्वगुणाचा पुतळा होय. त्याच्यांत राजस आणि तामस गुणांचा परमाणुसुद्धां नाहीं. पण वरील देवळांतील देवांत साधेपणाचा सात्त्विक गुण बिंदुभरसुद्धां नसतो. माझ्या दृष्टीनें साधेपणा आणि सात्त्विकता एकरूप होत. जेथें साधेपणा परिणामकारक स्वरूपांत आढळून येईल, तेंच आमच्या दृष्टीनें देऊळ होय, मग तेथें मूर्ति नसली तरी आमचें अडत नाहीं. अशा ठिकाणीं आम्ही वारंवार जाऊं आणि त्या साधेपणाच्या मनोमय मूर्तीचें मनांतच प्रसन्न होऊन पूजन करूं.

---

# फेरफटका

निबंधलेखकांचा "सहल" हा अतिशय आवडता आणि अनेकवार हाताळलेला विषय आहे. पण विशेष असें कीं, जवळजवळ प्रत्येकांत निराळेपणा व क्वचित् सारखवट यांच्या बेमालूम छटांचें मिश्रण झळकतांना दिसून येतें. जेवणाच्या वेळेपूर्वी दोनतीन तास अगोदर फिरायला जाणें स्टिव्हन्सनच्या दृष्टीनें योग्य होय, व तो एकट्यानेंच, लांबवर, आपणांस कोणी पाहत नाहीं असें खात्रीपूर्वक वाटेल, अशा जागीं ज़ाणें पसंत करतो; तर उलट चार्लस लॅम्ब मात्र कोणाबरोबर तरी बोलत फिरणें इष्ट समजतो. फडक्यांच्या दृष्टीनें तर फिरायला जाण्यास वेळेचें बंधनच नाहीं.

फेरफटक्याच्या बाबतींत माझ्या लहरी या लेखकांच्या लहरीहून थोड्याफार भिन्न स्वरूपाच्या आहेत. सहल करण्यांतलें आणि संभाषणतालें सुख एकाच वेळीं अनुभवतां येणें कसें शक्य आहे, असें कोडें स्टिव्हन्सनला पडत असलें तरी, तें मला मात्र पडत नाहीं. मी एकटा कधीं फिरत नाहीं असें नाहीं; पण एकटें फिरणें मला उदासवाणें होतें. मनुष्य हा प्राणीच माझ्या दृष्टीनें सहवासप्रिय आहे. त्याला चोवीस तास कोणाच्या ना कोणाच्या तरी संगतींत काढण्याची सहजप्रवृत्ति आंतून होत असते; मग फिरावयास जाण्याच्या बाबतींत तरी अपवाद कसा असूं शकेल ? फिरायच्या लहरीनें उचल खाली, म्हणजे मग मला कोणीही दोस्त चालतो आणि चालण्यासारखा कोणीच मनुष्यप्राणी जवळ नसला, म्हणजे मग मी मोत्या कुत्र्याचा साखळदंड सोडतों.

बिचारें आनंदी जनावर ! माझ्या बरोबर, पुढें, मागें, पळावयाला सदाच तयार असतें !

पण एक आहे हं ! स्वातंत्र्य लाभल्याच्या आनंदांत व माझ्या-बद्दल त्याला जें कांहीं वाटतें त्याबद्दलच्या प्रदर्शनाच्या भरांत उड्या मारमारून तो माझें धोतर व कपडे चांगलेच ओरबाडतो, व वेळेनुसार ते फाटतात देखील. क्वचित् त्याचे ओरखडे माझ्या मांडीवर देखील वठले आहेत; पण मी त्याकडे लक्ष देत नाहीं. कारण त्याच्या शुद्ध हेतूबद्दल माझी पूर्ण खात्री झालेली असते व हे अपराध त्याच्या हातून (?) न कळत व चुकून झाले आहेत हें ध्यानांत येऊन मी त्यास नुसत्या शिक्षेच्या धमकीवरच सोडून देतों. असो.

अशा तऱ्हेनें फिरण्याच्या वेळीं मला कोणी तरी दोस्त लागत असला, तरी वाटेल तो दोस्त मला चालत नाहीं. एखाद्या म्हाताऱ्याबरोबर फिरायला जाऊन फेरफटक्याचें सुख मी अनुभवूं शकत नाहीं; कारण त्याच्या व माझ्या वयांत कमींत कमी एका पिढीचें आणि विचारांच्या बाबतींत तीस वर्षांपूर्वीचे व आजचे विचार इतकें अंतर आहे, ही गोष्ट माझ्या सरळ मनांत येते. अशाशीं वाङ्मयीन गप्पा मी जर मारूं लागलों, तर प्रत्येक वेळीं एखाद्या योग्याप्रमाणें माझा सात्त्विक संताप मिनिटामिनिटाला आवरण्याची नसती कसरत मला करावी लागणार.

बाईमाणसाबरोबर फिरायला जाणें मी तितकेंसें पसंत करीत नाहीं; कारण मी स्वभावतः लाजाळू आहें. एकाद्या बाईबरोबर कोठें जाण्याचा प्रसंग आला, तर तिच्याऐवजीं मलाच अतिशय लाज वाटूं लागून माझे कान लाल होऊं लागतात व मोकळे-

पणानें फिरणें व फेरफटक्याचें सुख अनुभवणें मला जमत नाहीं. मग फिरणें आपल्याला आवडत नाहीं, तें म्हाताऱ्या-कोताऱ्यांचें काम, अशी पाठ करून ठेवलेली थाप मी मारतों. आणि खुद्दांच्या बाईसाहेबांबरोबर फिरण्याचा प्रसंग आला तर मी स्वच्छ सांगतों, कीं जोडप्यानें हातास हात लावून सत्यनारायण करण्याचें पत्करीन अगर एक दिवस मेहूण म्हणून जेवायला जाईन, पण हा आग्रह नको बुवा !

हें झालें फिरावयास जाण्याबाबत. वेळेच्या बाबतींतही माझा मार्ग निराळाच आहे. फडक्यांप्रमाणें वाटेल तेव्हां, अगर स्टिव्हन्सनप्रमाणें जेवणापूर्वीं फिरण्यापेक्षां रात्रीचें फिरणें मी पसंत करतों. ऐन उन्हाळ्याच्या दिवसांत रात्रीं गप्पा झोकीत झोकीत, चांदण्यांत बसून, थोडच्या अंतरावरच्या रातराणीच्या चारदोन विस्तारलेल्या व बहरलेल्या झुडुपांतून सुगंधाची मंद दरवळ आपल्याकडे सारखी येत असावी व आपलें मन सारखें सुप्रसन्न राखीत असावी, ऊबदार आणि सात्त्विक अन्न आपण आपल्या वाजवी भुकेइतक्या प्रमाणांत संथपणानें जेवत असावें, अशा वेळीं माझा अकस्मात् फिरायला निघण्याचा विचार ठरतो व जेवण उरकतांच मी तो अमलांतही आणतों.

अशा वेळीं किती फिरायचें याला कांहीं बंधन नसतें. दिवसाचे सगळे उद्योग पुरे झालेले असतात; रात्रीचें जेवण उरकलेलें असतें. आपण जरा जास्त वेळ घालवला, तर आपल्यामुळें अमुक एक कार्य खोळंबेल, अशी भीति त्या वेळीं मनाला शिवत नाहीं. आकाशांतल्या चांदण्यांतून चंद्रिकेचे पाझर सारखे झरत असतात, सगळीकडचा कोलाहल हळूहळू मंदावत असतो, आणि चंद्रकिरण व मंद अंधार यांच्या नैसर्गिक आवरणांत आपण आसपासच्या

आपल्यासारख्याच फिरस्त्याच्या दृष्टिक्षेपांतून पाहिजे तितक्या प्रमाणांतच अदृश्य असतों, ही स्थिति मला एकंदरींत गोड वाटते.

अशा स्थितींत पाय नेतील तिकडे बरेंच फिरल्यावर एखाद्या ठिकाणीं स्वस्थ बसणें मला फार आवडतें. रस्त्यानें चालतांना मी बरोबरच्या माणसाबरोबर बोलत असतों. पण पाय ताणून आणि हात मागें टेकून एकदां बसल्यावर मग मला बोलावेंसें वाटत नाहीं.

अशा तऱ्हेनें शांत जागीं बसण्यांतलें सुख अनुभवूं लागलों, म्हणजे मला आणखीही एक प्रकारचें सुख अनुभवतां येतें. टेनिसननें आपल्या Palace of Art नांवाच्या एका काव्यांत आकाशगोलकांच्या संगीताचा उल्लेख केला आहे. तो म्हणतो कीं, आकाशांतले तारे एक प्रकारचें संगीत निर्माण करितात, पण तें आपणांस ऐकूं येत नाहीं. हें संगीत आपणांला ऐकूं येत आहे, असा आभास मग माझ्या मनाला होऊं लागतो व ते अज्ञात आणि इंद्रियांच्या ग्रहणापलीकडले सूर आपण हृत्संपुटांत सांठवीत आहोंत, अशी एक प्रकारची बलवत्तर भावना माझ्या अंतःकरणांत अमूर्त रूपानें वावरूं लागते. घटकेघटकेला बदलत्या कळांनीं कलणारे सप्तर्षि आपलें स्थान बदलवीत असतांना, ह्या ग्रहगोलकांच्या अज्ञात संगीताची मैफल विसर्जित होऊं लागते. त्या संगीतांतले भैरवीचे धीरगंभीर स्वर उमटूं लागल्याचा स्पष्ट आभास मला होऊं लागतो.

परत येतांना, एखाद्या उत्कृष्ट गायकानें पूर्ण समरस होऊन घेतलेल्या गानलहरी सावधानतेनें ऐकलेला रसिक श्रोता ज्या-

प्रमाणें मजलस संपल्यावर एका प्रकारच्या धुंदींत, ते स्वर आंतल्या आंत आठवीत आणि आळवीत परत जात असतो, तशी स्थिति माझ्या हृदयाची झालेली असते. घरीं जाऊन पोंहोचेपर्यंत व नंतर-ही त्या अज्ञात संगीताचा पगडा माझ्या मनावर बसलेला असतो आणि अशा वेळीं त्यांतच भर घालण्याकरितां कीं काय, पत्नीच्या प्रत्येक प्रेमळ शब्दांत सांठवलेलें एक प्रकारचें अप्रकट अंगाई गीत माझ्या मनावर निद्रेची मोहिनी घालतें !

रात्रीची साडेआठपासून अकरा वाजेपर्यंतची वेळ फेर-फटक्याच्या दृष्टीनें मला उत्कृष्ट वाटते. पण याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, इतर वेळा कांहीं फिरण्यास योग्य नव्हत. फिरण्या-च्या बाबतींत ज्याप्रमाणें वेळेचा गुण म्हणून कांहीं तरी असतो, त्याचप्रमाणें लहर अगर फिरण्याची तहानसुद्धां तेवढीच महत्त्वाची असते. ही तहान अगर आसुसलेली स्थिति प्राप्त झाली, म्हणजेच फिरावयास जाण्यांत मौज वाटत असते; मग वेळ कोणतीही असो !

# उठण्यापूर्वीची मोहक झोंप

कुणाला उपदेश करायचा झाला, तर मी अगदीं गंभीर शब्दांत आणि मनःपूर्वक असें सांगत असतों कीं, 'बाबा रे, लवकर उठावें. थोडें सूर्योदयापूर्वीं उठण्यानें पुष्कळांच्या असें प्रत्ययास आलें आहे कीं, त्यांचें आयुष्य वाढलें आहे. आपल्या पूर्वकालीन ऋषींनीं प्रातःकालीं उठण्याबद्दलचे जे नियम घालून दिलेले आहेत, ते पाळण्यांत आपलें सर्वस्वीं हित आहे....' वगैरे.

हा उपदेश करीत असतांना केवळ मोठेपणाचा टेंभा मिरवण्याचा माझा उद्देश असतो असें मात्र नव्हे—तसा नक्की नसतोच. —सांगतांना मी अगदीं कळकळीनें सांगतों हें अगदीं खरें.

पण मी स्वतः मात्र त्याप्रमाणें वागत नाहीं हेंही तितकेंच खरें आहे. सकाळीं लवकर उठण्याचा मीं पुष्कळदां प्रयत्न केला आहे. पण तसें उठण्यानें माझ्या वृत्ति मोठ्याशा उल्हसित झाल्या आहेत व मी जगांतलें कांहीं नवीन और अनुभवतों आहे, असें माझ्या प्रत्ययास आजवर कधींच आलें नाहीं. लवकर उठण्यानें माझा सबंध दिवस चिडखोरपणांत जातो आणि अशा वेळीं माझ्या नोकरमाणसांस व पत्नीस निष्कारण त्रास होतो.

पक्ष्यांच्या सूर्योदयापूर्वींच्या गोड चिवचिवाटानें माझ्या मनावरचें आणि डोळ्यांवरचें जड दडपण जवळ जवळ नाहींसें झालेलें असतें; फक्त एक विरळ पापुद्रा मात्र शिल्लक उरलेला

असतो. अशा वेळीं मनांत जागेपणचे विचार येरझारा घालूं लागतात. आपण सिनेमाचें तिकीट काढून खेळाच्या सुरुवातीपूर्वी दाराशीं गर्दींत जाऊन मिसळतों आणि दार उघडतांच आंतल्या झकझकाटांत दिसणाऱ्या खुर्च्यांवर गर्दीनें जाऊन बसतों. आपल्या मागून येणारा आपणांस पुढें लोटीतच असतो व आपण स्वतःस सांवरून, बरीशी जागा पकडून बसण्याचा प्रयत्न करीतच असतों. माझ्या विचारांचें तसेंच झालेलें असतें. निद्रापटलाचा दरवाजा उघडतो केव्हां, आणि आपण आंत घुसतों केव्हां, असें होऊनच जणूं कांहीं माझे विचार घोटाळूं लागलेले असतात. मग ते विचार मनांत सगळेच्या सगळे एकदम घुसतात. उठण्यापूर्वीची ही स्थिति मला खूप आल्हाददायक वाटते. शून्य मनानें उठणें आणि भरल्या मनानें उठणें यांतील अंतर मला शून्य गृहांत प्रवेश करणें आणि भरल्या घरांत पाऊल टाकणें यांतिल अंतराइतकें वाटतें.

पण पक्षी किलबिलत आहेत, दक्षिणच्या उंचच उंच गेल्यानंतर विस्तारलेल्या कलमी आंब्यावरची काळी कोयळ कुयकुयत आहे, गड्यानें माझ्या नारळी-पोफळींच्या वाडींत रहाटांस पांड्या, टिक्या आणि पोवळ्या हे माझे आवडते तीन बैल जुंपले आहेत, ते आपल्या दमदार इमानी चालींत, उत्साहानें सारखे भिरभिरत आहेत, आणि रहाटांची गोड किरकीर एक प्रकारचें मंद सुरांतलें संगीत गुणगुणत आहे, अशा स्थितींत पत्नीनें खालूनच नुसतें 'चहा ऽऽ' म्हणून मध्यम आवाजांत मला उद्देशून म्हटलें आहे, अशा नमुनेदार स्थितींत उठणें मी श्रेयस्कर समजतों. अशा वेळीं प्रत्येक गोष्ट करीत असतांना मला अतिशय उत्साह वाटतो. एकादें नवें घड्याळ योग्य रीतीनें काम

द्देत असावें, त्याच्या प्रत्येक ठोक्यांत, कांट्यांच्या फिरण्यांत प्रमाणबद्धता असावी, तशीच, माझ्या प्रत्येक कृतींत प्रमाणबद्धता आहे, असा मग मला अनुभव येत असतो. या बाबतींत माझें थोडेंसें मेरिडिथच्या टॉम कॉंग्लेस्बीसारखें आहे. स्वारी अगदीं चक्रम्! हॉटेलमधल्या नोकराला ठरीव पदार्थ ठरीव वेळीं आणण्यास एकदां खणखणीत ताकीद दिलेली असावयाची! आणि वेळेच्या अगोदर अर्ध सेकंद जरी पदार्थ आणले गेले, तरी राजेश्रींनीं गुरगुरून म्हणावयाचें, 'हं! जगाचा प्रवास थोडा लवकरच संपवण्याची तुला गर्दी झाली आहे!' आणि उशीर झालाच तर हे तिस्मारखान म्हणत, 'वाजवीपेक्षां जास्त जगण्याची इच्छा धरतोस होय?'

तसंच मला थोडंसं वाटतं! वर सांगितलें तशा तऱ्हेनें सर्व गोष्टी घडून आल्या म्हणजे मग माझ्या मनाचें अवर्णनीय समाधान होतें. त्या दिवशीं मीं केलेल्या सौद्यांत एक प्रकारचा दिलदारपणा आणि एक प्रकारचा गोडवा उत्पन्न होतो.

आणि हा अनुभव मीं अनेकदां घेतला आहे. म्हणून मी स्वत: मात्र माझ्या लहरीनुसार सूर्य उगवून थोडा वर आल्यानंतरच उठतों. पण दुसऱ्याला उपदेश करण्याचा प्रसंग आला, म्हणजे मात्र, 'बाबारे! लवकर उठावें. लवकर उठण्यामुळें आपलें आयुष्य वाढतें असें आजवर पुष्कळांच्या प्रत्ययास आलें आहे,' वगैरे सांगण्यास मी मुळींच चुकत नाहीं. 'उशिरां उठत चला' असा उपदेश केला, तर लोक मला मूर्ख म्हणतील हें उघडच आहे; पण त्यांच्या नांवें ठेवण्याला भिऊन मी तसें म्हणतों, असें म्हणणें विपर्यस्त होय. या बाबतींत आपण वागतों त्याच्या

उलट वागण्यांतच अनेकांचें कल्याण आहे असें माझ्या प्रांजळ मनास वाटतें, म्हणूनच मी तसें कळकळीनें सांगत असतों.

हें झालें उठण्याविषयीं ! पण त्यापूर्वीची झोंप ? तिचें माहात्म्य कांहीं औरच आहे. आतां सगळे कवि आणि लेखक एक जात गाढ आणि अभंग झोंपेचें वर्णन करीत असतात; करोत बिचारे ! पण आपल्याला एका रात्रींतच झोंप संपली आहे, अशा झोंपा आयुष्यांत किती येतात ? अगदीं मोजक्या !

तशी झोंप लागायला साधारणतः मनुष्य अगोदर खूप दमलेला असावयास पाहिजे व त्याचें मनही निद्रासमयीं तितकेंच मोकळें—निर्विकल्प—असावयास पाहिजे. आणि मनुष्याच्या मनास ही निर्विकल्पता फारच क्वचित् प्राप्त होते व म्हणूनच गाढ झोंपेचे चुटके अनुभवणें हें त्याच्या फारसें नशिबीं नसतें.

पण या निर्विकल्प निद्रेपेक्षां आपल्या नेहमीं अनुभवास येणारी सविकल्प निद्रा कांहीं कमी महत्त्वाची नव्हे. उलट मी तर असें म्हणेन कीं, ही सविकल्प निद्रा अनेक अनुभूतींची जननी असून तीच आपल्याला जास्त स्वास्थ्य देण्यास समर्थ असते. निदान मी तरी सविकल्प निद्राच अधिक पसंत करतों.

आठ-साडेआठच्या सुमारास आपलें जेवण झालेलें असावें, घरच्या चिल्लापिल्लांची चिवचिव निद्रागाराच्या खुराड्यांत हळू-हळू अगदीं शांत होऊं लागली असावी आणि आपण नवारीच्या पलंगावर एकटेच, उशाशीं योग्य उंचीवर ठेवलेल्या दिव्याच्या बेताच्या उजेडांत, आवडणाऱ्या Alpha of the Plough चें Wind Falls अगर Many Furrows किंवा फडक्यांच्या ‘गुज-गोष्टीं’तली ‘हरवली म्हणून सांपडली’ वाचीत असावें. वाचतां

वाचतां डोळे मिटूं लागून अर्धवट गुंगी, अर्धवट विचारांची तंद्री अशा स्थितीप्रत येऊन पोंहोचावें व शेवटीं छातीवर उघडी बाजू टेकलेलें पुस्तक मिटून, दिवा मालवून पांघरूण छातीपर्यंत ओढून पडावें, व विचार आणि निद्रा यांना एकसमयावच्छेदेंकरून चालना मिळावी, ही स्थिति खरोखर स्पृहणीय होय. आकाशांतल्या मंद तारकांच्या अंधुक प्रकाशाचा, काळ्या अंधाराच्या मिश्रणानें सांवळा झालेला झोत अंगावर पडत असावा आणि निःस्तब्ध वातावरणांत आपण तशा स्थितींत आगामी—नव्हे अर्धवट आलेल्या निद्रेचा अनुभव घेत पडावें, हें मला जास्त सौख्यकारक वाटतें. अशा वेळीं आपल्या मनांत अमुकच एक विचार येतात, असें सांगतां येणार नाहीं. क्षणांत आपल्या सद्यःस्थितीचा ओझरता विचार पाझरूं लागतो; निमिषांत तिसराच कांहीं तरी विचार आपल्या मनोमुकुरासमोर अकस्मात् गोंधळल्यासारखा उभा राहतो. एकाद्या लाजाळू, लग्न न झालेल्या तरुणीनें पांचसहा तरुणांचा अकस्मात् जमलेला तांडा अभावितपणें पहावा आणि चमकून परतावें, तसेंच मग या विचाराचें होतें. विचाराविचारांतही फरक असतो. कांहीं धीट विचार आपल्या मनांत बेधडक प्रवेश करतात व कांहीं अगदीं हळवे आणि लाजरे असतात. असा विचार चुकून जसा डोकावत, कानोसा घेत आंत शिरतो, तसाच तत्काल तो मनांतून नाहींसा होतो. आस्ते आस्ते आपले सर्व विचार विरून जाऊन आपलें मन निर्विकार होऊं लागतें.

पण एवढ्यावरच भागत नाहीं. सगळीकडे अगदीं गाढ अंधार पसरलेला असावा, सगळें विश्व अगदीं शान्त होऊन ब्रह्मांडाचा गोल एकाद्या झोपाळ्याप्रमाणें मंदमंद झुलत असावा, आणि

एकदम एकादा उज्ज्वल तारा चमकूं लागून त्याच्या सोज्ज्वल, शीत किरणांत एकाद्या दिशेनें अभ्यंगस्नानास सुरुवात करावी, तसें आपल्या हृदयाचें होतें. एकाएकीं एकादा प्रबल सात्त्विक विचार आपल्या हृदयाची गुंगी तशीच कायम ठेवूनही वर उसळतो. अशा वेळीं पहांटेच्या अंधाराचें आवरण अजून बरेंच दाट असावें आणि दूर पूर्वदिशेकडे प्रकाशाचे पहिले किरण नुकतेच वर उगवूं लागावेत, म्हणजे पूर्वदिशा जशी दिसूं लागते, अगदीं तसेंच, आपल्या हृदयांत निद्रानिशेचा अंधार आणि विचार-किरणांचें तेज यांचा मंद संध्याप्रकाश, यांच्या गोड संमीलनानें झालेलें असतें. आपण अशा वेळीं धड जागेही नसतों, गाढ झोंपेंतही नसतों. आपणांस त्या वेळीं भय वाटणारीं स्वप्नें पडत नसतात व सकाळीं उठल्या-वर आपली झोंप पुरी झाली नाहीं, असेंही आपणांस वाटत नाहीं.

म्हणूनच मी म्हणतों कीं, गाढ झोंपेपेक्षांही या निद्रेंत जास्त सौख्य सांठवलेलें असतें. शिवाय या निद्रेचा आणखी एक स्वर्गीय फायदा आपणांस लाभत असतो. गाढ निद्रेंत आपण सगळें विश्व विसरतों आणि स्वतःलाही विसरतों. पण या निद्रेंत बाह्य विश्वां-तले आपले व्यापार थांबतात व अंतर्विश्वांतील अनेक सुप्त विचारां-चें दृश्य अन्तर्दृष्टीपुढें चमचमूं लागतें. आपल्या हृदयांतच खोलवर कोंडलेली, सहसा बाहेर न येणारी ही विचारसंपत्ति आपल्या अन्तर्दृष्टीसमोर झळाळूं लागलेली पाहणें कोणत्या मानवास आनंदित करणार नाहीं ?

# सत्याभास

सर वाल्टर रॅलेची एक गोष्ट आपण अनेकदां ऐकतों अगर वाचतों. तुरुंगांत त्यानें एक इतिहासाचें पुस्तक लिहिलें व तें पुस्तक सत्याला धरून असल्याचा त्याला अभिमान होता. पण समोर घडलेल्या मारामारीबद्दल दोन प्रत्यक्ष अवलोकन करणाऱ्या साक्षीदारांतही एकदां दुमत दिसून आल्यावर त्याचा अभिमान विरघळला, व त्यानें आपलें पुस्तक जळत्या शेगडींत फेंकून दिलें.

इतिहासाबाबत काय किंवा कोणत्याही गोष्टीबद्दल काय, लिहितांना आपण पूर्णसत्य लिहीत आहोंत अशी मिजास मारणें उत्तरोत्तर मूर्खपणांतच गणलें जाणार आहे. विशेषतः इतिहासाच्या बाबतींत तरी असें उघड म्हणतां येईल कीं, त्यांत पूर्ण सत्य ओतणें हें अशक्यच आहे. लिहिण्याची व छापण्याची कला जवळ जवळ पूर्णावस्थेस पोंहोचली, मनुष्याच्या ज्ञानांत भर पडली व निरनिराळ्या कला आणि शास्त्रें यांत प्रगति झाली, पण त्याबरोबरच मनुष्याला कपटनीति व तिचे डावपेच यांचें तंत्र चांगलेंच पाठ झालें.

गेल्या महायुद्धाचेंच उदाहरण घेऊं या. एकाद्या इतिहासकारानें अस्सल पुराव्यावरून जरी तो इतिहास लिहिला, तरी तो सत्यास पूर्णपणें धरून होणार नाहीं—तो सत्याभास होईल. अगर आपण असें म्हणूं कीं, त्याच्या दृष्टिकोनांतून जितक्या सत्याचा त्यास प्रत्यय झाला, तितक्याचा तो यथातथ्य आविष्कार होय. असें

म्हणण्याचें कारण असें कीं, महायुद्धाचे वेळीं अनेक राष्ट्रांतील अनेक हेरांनीं युद्धनीति म्हणून नाना तऱ्हेचे भ्रामक संदेश अनेक जागीं अनेक मार्गांनीं पसरविले. इतिहासकारानें हे संदेश विचारांत घेऊन त्यांतून सत्य शोधण्याचा प्रयत्न केला तर त्याचा काय परिणाम होईल ? अनेक भ्रामक आणि असत्यमूलक विधानें त्याच्या लेखनांत उतरतील हाच तो परिणाम.

ऐतिहासिक ग्रंथांतल्याप्रमाणेंच प्रत्येक बाबतींत मनुष्यास सत्याभासाचाच दृक्प्रत्यय येत असतो; म्हणून दोन सभ्य गृहस्थांच्या एकाच गोष्टीबाबतच्या प्रांजळ सांगण्यांतही पुष्कळदां अंतर पडतें व त्यांच्या प्रामाणिकपणाविषयींची आशंका उत्पन्न होते. असें विधान करण्यांत अर्थातच असत्याचा केवढा विजय आणि बडेजाव आहे. असत्याचे विजय प्राप्त करून घेण्याचे जे अनेक मार्ग आहेत, त्यांतलाच हा एक सत्याभास उत्पन्न करणें हा होय.

सत्य हें एखाद्या अनेक पैलू असलेल्या हिऱ्यासारखें आहे. यांतील कांहीं पैलू आपलें चित्त वेधून घेतात. पण त्यांचें सौंदर्य अजमावीत असतांना त्याला आपण न पाहिलेले इतर अनेक पैलू आहेत, ही गोष्टच आपण विसरतों. अर्थात् पूर्ण सत्य आपल्या अवलोकनांत आलेलेंच नसतें. पण आपल्या अल्पसंतुष्ट मनाचें मात्र तेवढ्यानेंच समाधान होतें. एखाद्या गोष्टीचें अवलोकन केल्यानंतर तिच्यांतील आपल्या दृष्टोत्पत्तीस आलेलें सत्यच आपण पूर्ण सत्य मानतों. उलट, आपण न अवलोकिलेलें त्याच बाबतीचें अंग पाहणारा दुसरा मनुष्य त्याच्या दृष्टीस पडलेलें सत्य सांगूं लागला व तें आपल्या सत्याशीं विसदृश असलें, तर

२

आपण त्याची गणना अप्रामाणिकांत करतों व आपणांस त्या व्यक्तीविषयीं राग येऊन तिरस्कार वाटूं लागतो.

म्हणजे पुष्कळदां असें होतें, कीं आपण ढालीची पांढरी अगर सोनेरी एकच बाजू पाहतों व आपल्या विधानाची उभारणी आपल्या दृक्प्रत्ययाच्या डळमळीत पायावर करतों. आपण पाहिलेलें सत्यच असतें खरें, पण तें पूर्ण सत्य नसतें. अशा अपूर्ण सत्यावर उभारलेलें विधान अर्थात् सत्य नसून सत्याभासच होय. आणि जरी एकाद्यानें ढालीच्या दोन्ही बाजू पाहिल्या व ती पांढरी व पिवळी असल्याचें ऐसपैस आणि शक्य तितकें सत्यास धरून विधान करण्याचा प्रयत्न केला, तरी ढालीचा असा एक भाग त्यास दिसलेला नसतोच, कीं ज्या ठिकाणीं ढाल पिवळीही नाहीं व पांढरीही नाहीं ! अर्थात् हा दृष्टीच्या ढोबळपणाचा दोष होय. मनुष्य कितीही तीव्र दृष्टीचा अगर सूक्ष्मग्राही असला, तरी त्याच्या ग्राहकतेच्या सूक्ष्मत्वासही बंधनें आहेतच.

म्हणजे लिहिण्याचा मुद्दा असा कीं, लेखकानें, श्रोत्यानें अगर प्रेक्षकानें पूर्ण सत्याचेंच एकाद्या बाबतींत आकलन करावयाचें असें ठरवलें, तरीही त्यास पूर्ण सत्याचा प्रत्यय येत नाहीं व त्याची प्रत्येक कृति पूर्ण सत्यावर अधिष्ठित न ठरतां सत्याभासच ठरते. केवळ या सत्याभासामुळेंच जगांत राजकीय अगर सामाजिक बाबतींत पक्षोपपक्ष निर्माण होऊन प्रत्यक्ष अगर शाब्दिक रणें माजतात. आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांतलि अलीकडचें अगदीं ठळक उदाहरण घेऊं या. टिळक काय अगर आगरकर काय दोघांसही असेंच वाटे कीं, हिंदुस्थानास स्वातंत्र्य लाभून पुन्हा तेथें सुवर्णयुग सुरू व्हावें. पण त्यांच्यांतही

सामाजिक सुधारणा आधीं कीं राजकीय आधीं असा वाद माजलाच कीं नाहीं? आणि अशा तऱ्हेनें दोन बुद्धिमान, कर्तबगार, दृढनिश्चयी, सच्चरित व्यक्तींत मतभेद होण्याचें कारण माझ्या मतें बुद्धीच्या सूक्ष्मतेंत आणि त्यांस होणाऱ्या दृक्प्रत्ययांत व म्हणून सत्याभासांत आहे.

पण अशा तऱ्हेनें सत्याचे निरनिराळ्या प्रमाणांत आभास होण्यांतच जिवंतपणा सांठविलेला आहे. सर्वांस येणाऱ्या अनुभवांत व दृक्प्रत्ययांत जर उत्तरोत्तर एकजात सारखवट येऊं लागेल, तर शास्त्रांतली व कलांतली आणि म्हणून जगांतील प्रगतिच स्थिरावेल आणि मानवी जीवनांत हरघडी दिसून येणारें नाविन्य व आंदोलन हींही थांबतील. म्हणून राजकीय क्षेत्रांत काय अगर समाजांत काय अशीं सत्याभासावर अधिष्ठित आंदोलनें वारंवार व्हावयासच पाहिजेत; त्यांतच राष्ट्राचें अंतिम हित आहे.

# सूपशास्त्रांतील प्रगति

किर्लोस्करांच्या स्त्री-मासिकाचा साधारणतः कोणताही अंक उघडून पाहिला तरी एक गोष्ट प्रामुख्यानें आढळून आल्याशिवाय रहात नाहीं आणि ती म्हणजे 'स्वयंपाकघरांतील कांहीं प्रकार' ही होय. मनुष्यानें जगावयाचें व सुदृढ राहावयाचें, म्हणजे त्यानें शक्य तितकें उत्कृष्ट प्रकारचें, सात्त्विक आणि पाचक अन्नाचें सेवन केलें पाहिजे हें क्रमप्राप्तच होय. या दृष्टीनें पाहिलें असतां अन्नाबाबत वारंवार निरनिराळ्या प्रकारचे शास्त्रीय प्रयोग आणि संशोधन होऊन त्यांत प्रगति व्हावी हें अपरिहार्यच आहे. आपल्या पूर्वजांनीं अन्न ही महत्त्वाची बाबत अनुपेक्षणीय आहे हें ओळखून त्या शास्त्रांत निरनिराळ्या प्रकारचें संशोधन केलें ही गोष्टही सिद्धच आहे. 'भोजन-कुतूहल'सारख्या ग्रंथांत अनेक धान्यांचीं, त्यांच्या गुणधर्मांचीं आणि दोषांचीं गुणवर्णनें आपणांस अनेकदां वाचावयास मिळतात व 'नीवार' वगैरेसारखीं पूर्ण निकृष्ट अन्नें, आणि तींही अल्प प्रमाणांत सेवन करण्यांत संतमहंत आणि ब्रह्मर्षींचा कोणता कटाक्ष होता याचीही जाणीव पूर्णत्वेंकरून होते.

अशा तऱ्हेनें संशोधन आणि प्रगति यांचा गतइतिहास ज्याचे मागें आहे, अशा अन्नाबाबत वारंवार नवनवीन प्रकार प्रत्यहीं प्रचारांत यावेत व आजकालही खाद्यपदार्थांत व पक्वान्नांत भर पडून जिव्हालौल्य आणि खादाडपणाची हौस भागवली जावी, हें क्रमप्राप्तच झालें. विशेषतः ज्यांच्या हातांत पाळण्याची—म्हणजे

भावी पिढीची–दोरी आहे अशा महिलांनींच या पकान्नप्रगतींत भाग घ्यावा, ही गोष्टही माझ्या मतें तितकीच समाधानपूर्ण आणि प्रोत्साहक व आशामय आहे.

परवांच ज्ञानप्रकाशच्या एका अंकांत 'झगडा' नांवाच्या एका अभिनव पदार्थाच्या कृतीचें टांचण मला वाचावयास सांपडलें व तें मीं चारपांच वेळ मोठ्यानें व एक-दोनदां मनांतल्या मनांत वाचलें. मजकूर मात्र विसरून गेलों. पण त्यांत हरभऱ्याची डाळ, ती वाटणें, तळणें, उकडणें, करडईच्या तेलाची फोडणी देणें व शिवाय पाण्यांत घाटणें असल्या कांहीं तरी बऱ्याच भानगडी होत्या. मसाले, तिखट, चिंच इत्यादि इत्यादि पदार्थांची त्यांत मिळवणी केल्यानंतर हें खाद्यपेय चवदार होणार व त्यामुळें खादाडपणाही पण कांहीं वेळ शमणार याचा मीं पूर्णपणें अंदाज बांधला व हा पदार्थ एकदां करून बघ म्हणून आमच्या 'तिला' खड्या सुरांत शब्दसंदेश धाडून मोकळा झालों !

नव्या खाद्यपदार्थाबाबत कोणत्याही मासिकांत का होईना, जी माहिती प्रसिद्ध होते, ती सर्व अशाच प्रकारची असते. कोणत्याही पदार्थाबद्दल तळणें, कढवणें, उकळवणें, मोहन, सपीट, मैदा घालणें, लसणीचा व कांद्याचा लगदा मिसळणें व चमचमीत लोणकढी फोडणी देणें इत्यादि पारिभाषिक शब्दांची साखरपेर कृतींत केलेली आढळून येते. एकएका पदार्थाच्या कृतीच्या बाबतींत कोण द्राविडी प्राणायाम, दगदग आणि तंत्र हें ! मीं असल्या पदार्थांच्या याद्या पाहिल्या म्हणजे, उन्हाळ्याच्या दिवसांतही थिजून गारठतों व सर्द होतों. तशा स्थितींत माझ्या मनांत एकच एक विचार प्रामुख्यानें पुनः पुन्हा उद्भवतो

कीं, हें सगळें ठीक आहे, पण तें पचायचें कसें ! मला व माझ्यासारख्याच इतरांना पूर्णपणें ध्यानांत येतें कीं, असल्या पदार्थांच्या सेवनानें पोट भरेल, पण तें औषधांशिवाय आणि रेचकांशिवाय दुरुस्त आणि रिकामें व्हावयाचें नाहीं ! त्यांनीं बद्धकोष्ठता झाली नाहींच, तर वात धरेल; दोन्ही नच झालें तर रात्रीं उन्हाळे व दिवसा पावसाळे लागतील; हेंही नच झालें तर कमींत कमी, अपचनानें करपट ढेंकरा येणें, डोकें जडावणें, आळस भरणें, गति मंदावणें व डोळ्यांवर झांपड येणें हें तरी होईलच होईल ! आणि एवढ्याच एका कारणाकरितां मी रोजच्या ठराविक पदार्थांव्यतिरिक्त इतर पदार्थ खाण्याचें अगदीं तरुण वयांतही टाळूं लागलों आहें. असल्या पदार्थांच्या याद्या कृतींसह प्रसिद्ध झालेल्या पाहिल्या म्हणजे, मला सुदाम्याच्या पोह्यांतील बंडूनानांच्या चित्रकलेची आठवण होते. बंडुनानांनीं रती, उर्वशी, मेनका, इत्यादींचीं चित्रें काढावींत आणि तीं हिडिंबा, त्राटिका, शूर्पणखा इत्यादींचीं म्हणून मानलीं जावींत असाच प्रकार या पदार्थांच्याबाबत होत असावा ! चवदारपणा या दृष्टीनें या पदार्थांस किंमत असेल, पण इतर दृष्टींनीं ? असो.

कोणत्याही शास्त्रांत संशोधन आणि वाढ होऊन प्रगति व्हावी हें आवश्यकच आहे. सूपशास्त्रांतही ती वारंवार होत राहावी याबद्दल कोणाचेंच दुमत होणार नाहीं. प्रगतीवरच जगांतील आधिभौतिक सुखें अवलंबून असून मानवांचे सर्व व्यवहार सुरळीत चालणें आश्वासून आहे. विमानाबाबतच्या शास्त्रांत वाढ झाली व आज हजारों मैलांच्या अंतरावर असलेल्या दोन देशांत नजीकता झाल्याचा फायदा झाला, यांत खरोखर मानवाच्या शोधक आणि श्रमसातत्यिक बुद्धीस धन्यवादच द्यावयास हवेत. पण सर्वच

शास्त्रांच्या आणि कलांच्याही प्रगतीस बंधनें असावयास पाहिजेत. प्रगति ही निस्संशय आवश्यक आहे, पण ती विशिष्ट मर्यादे-पर्यंतच ! युद्धकलेचें उदाहरण क्षणभर घेऊं या. युद्धांत नवनवीन शस्त्रांचा उपयोग होऊं लागून नवनवीन पद्धति अमलांत येऊं लागल्या व युद्धाबाबतच्या वार्तांस एक प्रकारचा खुसखुशीतपणा येऊं लागला. येथपर्यंत–युद्धें व्हावींत, तीं राष्ट्रांस आवश्यक आहेत असें वाटणारांच्या दृष्टीनें–ठीक झालें. जर्मनीनें महायुद्धांत विमानांचा व पाणसुरुंगांचा उपयोग केला, ही गोष्टही कौतुकास्पदच वाटली. पण एकंदर नाशाचा विचार केल्यानंतर असेंच वाटूं लागतें कीं, विषारी धूर, पाणसुरुंग, टार्पेडो, वगैरेचा उद्भव ह्या युद्धकलेंतून झाला नसता तर बरें झालें असतें. हे शोध व ही प्रगति म्हणजे संहारराक्षसाचीच उत्पत्ति होय. कोणत्याही शास्त्रा-बाबत आपणांस हाच नियम बांधतां येईल कीं, त्या शास्त्रांतील प्रगतीची विशिष्ट सीमा गांठल्यानंतर मनुष्यानें आपलें संशोधन तेथेंच थांबवावयास पाहिजे व ते प्रयत्न न थांबवले, तर त्यांचा अन्त विश्वसंहारांतच व्हावयाचा आहे असें त्यानें पक्कें ध्यानांत आणावयास पाहिजे. जग निर्माण करणारा म्हणून ब्रह्मा, स्थिति कायम ठेवणारा म्हणून विष्णु व संहारक म्हणून शिव असे आपण तीन देव मानतों. प्रत्येक शास्त्र म्हणजे या तिन्ही देवांचा एकत्र केलेला सारभूत अंश होय. शास्त्रास चालना मिळाली कीं, पहिलीहून श्रेष्ठ अशा दुसऱ्या व पुढच्या स्थितीप्रत मनुष्यमात्र भराभर जाऊं लागतो व शेवटीं तें शास्त्र संहारकत्वाप्रत जाऊन पोंहोचतें.

अर्थात् अन्नाबद्दलचें शास्त्र म्हणजे सूपशास्त्रही या नियमास अपवाद नाहीं. निसर्गसिद्ध पदार्थांत थोडा फरक करून, आपण

त्याची पोषणाची क्षमता वाढवतों; पण कृत्रिमतेच्या बेसुमार उपयोगानें तेच पदार्थ मानवी जीवनास कसे मारक होतील, हेंच आपण आज जणूं कांहीं प्रयोगानें पाहात आहोंत. म्हणूनच मला अलीकडे असें वाटूं लागलें आहे कीं, मनुष्यानें आपल्या पोषणाचा प्रश्न योग्य रीतीनें सोडवावयाचा असला, तर जमल्यास पुच्छ प्रगतीच कशी होईल इकडे लक्ष द्यावयास हवें आहे. Back to nature again हाच सुखाचा खरा मूलमंत्र अनेकांस मान्य आहे व त्यांतील तथ्य विचारी मनास मानवतेंही. अन्नाबाबतही Back to nature या तत्त्वाचा अवलंब करणें प्रगतिपरच होईल, असें वाटण्याइतका उपयोग मात्र या किर्लोस्करांच्या स्त्री मासिकाचा नक्की होतो हें शुभच होय !

---

# नाकारलेली वधू

आयुष्यांत दोन माणसांची गांठ अनेकदां पडतेच असें नाहीं. कांहींकांहींची तर जन्मभर आणि जन्माची गांठ पडण्याचे योग येऊन सुद्धां ते फिसकटतात व त्या दोन व्यक्तींची जन्मभर पुन्हा दृष्टिभेट होण्याचाही संभव फारसा राहात नाहीं. त्यासारखेंच माझें झालें. योग्य वेळीं लग्न करण्याचा माझा विचार जाहीर झाल्यावर मला पुष्कळ वधू 'पाहण्याचा' योग आला; व एक सोडून बाकीच्या सगळ्या मीं नाकारल्या. त्या नाकारण्याची कारणमीमांसा आतां पूर्वींच्यासारखी स्पष्टपणें मला करतां येणार नाहीं. माझ्यापुढें फक्त दोन उत्तरें असत. Yes or No. पुष्कळ दिवस No म्हणत गेलों आणि एक दिवस Yes म्हणून उत्तरलों झालें! आणि मग सध्यांच्या माझ्या सौभाग्यवतीचा यजमान झालों व No चे सगळे मेंबर विसरून गेलों.

पण त्या दिवशीं प्रवासांत सहज गोरेगांवला उतरलों असतांना माझ्या यजमानांच्या घरासमोरच अस्मादिकांनीं नाकारलेली एक वधू माझ्या ध्यानीं-मनीं नसतांना अकस्मात् दृष्टीस पडली. गोरेगांवांत पाण्याचा खडखडाट; त्यांतून उन्हाळ्यांत तर अतिशयच व्याप पाण्याबाबत. प्रत्येकाच्या घरीं एक बैलगाडी व तींत बसविलेलें लाकडी पिंप असावयाचेंच.

४॥–५ ची वेळ होती. वत्सला त्या गाडींतलें पाणी कळशाकळशांनीं घरांत नेत होती व मी तें दृश्य पाहत तसाच गच्चींत

उभा होतों. माझ्या मनांत गतकालाच्या विचारांचा चित्रपट निर्माण होऊन एकएक दृश्य अन्तश्चक्षूंपुढून पुढें सरकूं लागलें.

मी अगदीं तारुण्यांत पदार्पण करीत होतों, अशा वेळीं वत्सलेला अगदीं अल्लड अशा स्वरूपांत प्रथम पाहिलें होतें. माझ्या मनांत अगर तिच्या मनांतही, लग्नाविषयींच्या पूर्ण स्वरूपांत अगर गंभीर स्वरूपांत भावना निर्माण होणें, त्या वेळीं शक्य नव्हतें पण पुढें दोन वर्षांनीं, तिच्याविषयीं माझ्या मनांत एक विचार क्षणभर चमकून गेला होता — हिच्याशीं माझा विवाह झाला तर ?

पण या प्रश्नावर माझें मन फारसें रेंगाळलेंच नाहीं व तिच्या मनाचा विचार करण्याचा विचारही माझ्या मनास फारसा शिवला नाहीं. एकाद्या मस्त रानडुकराला जसें पुढचें, मागचें, बाजूचें कांहीं दिसत नाहीं, तसेंच माझें झालें होतें. मी जगाचा अगर प्रणयाचा, कौटुंबिक प्रश्नाचा अगर आध्यात्मिक सुखाचा —सगळ्याच बाबतींत सारख्याच उदासीनतेनें त्या वेळीं मी वागत होतों. पण तशाही स्थितींत मला एक दिवस शंका आली— वत्सला आपल्याविषयीं यत्किंचित् का होईना, विचार करीत असली पाहिजे. तिची दृष्टि मला तसें सांगूं लागल्याचा भास मला झाला. आणि नंतर —त्या पद्धतशीर No नंतर सगळेंच संपलें होतें. माझ्या लग्नानंतर आजवर तिच्याविषयीं विचार करण्यास माझें मन मोकळें झालेंच नाहीं. आणि आज ती लग्न होऊन दुसऱ्याचा संसार सांवरीत असलेली माझ्या दृष्टीस पडली.

तिच्या देहांत आतां अनुकूल बदल झाला होता; आणि ती दृष्टीस पडतांच तो बदल माझ्या मनाला जाणवलाही. योग्य

जागीं योग्य दागिन्यांनीं त्या देहास व वर्णास गोडवा आला होता. तिची कळशी उचलण्याची ढब, कमरेवर हाताचें वेष्टन घालून सांवरण्याची रीत, जलवाहन व पुनरागमन हें सारेंच माझ्या दृष्टीस पडलें व मी भारावल्या धुंद दृष्टीनें तें सर्व दृश्य सारखा वेड्यासारखा पाहत राहिलों. जमिनीवर तिचें ज्या ज्या ठिकाणीं पाऊल पडे त्या त्या ठिकाणीं त्यांतील अदृश्य संथपणा अगर मंदपणा व कोमलपणा लवंडला आहे कीं काय, हें मी आसुसलेल्या व अतृप्त दृष्टीनें सारखा न्याहाळीत होतों. तिच्या दृष्टीला दृष्टि देऊन बघण्याचें सामर्थ्य आज मला नाहीं, असें माझ्या प्रत्ययास आलें व मी त्यामुळें जास्तच बिचकून गेलों.

आणि परवांच्या या प्रसंगावर आज चार दिवस माझ्या मनांत तात्त्विक विचार आणि प्रश्न सुचत आहेत. मी तिला कां नाकारलें ? त्या वेळीं मी तिच्यांत कशाची कमतरता मानली? खरें म्हटलें म्हणजे मी कोरा तरुण होतों. विचार करण्याची ऐपत नुकती कोठें माझ्या मनाला येऊं लागली होती व तिचा प्रत्यय येऊन मी स्वतःस पूर्ण विचारी समजूं लागलों होतों. लहान मुलाला नुकतेच पाय फुटावेत, व मग त्यानें घरभर धांवावें व वेळेनुसार घर अपुरें पडून त्यानें अंगणांत धांव घ्यावी, तसें माझ्या बुद्धीचें झालें होतें. माझी बुद्धि विचारजलांत विहार करण्याची आकांक्षा धरी; पण तें अंगुष्ठलव जलांत. वास्तविक माझ्या मनावर भावनेचा पगडाच अधिक होता, असें आज मला स्पष्टपणें वाटतें. भावनेच्या भरांत मी कोणतें तरी क्षुल्लक वैगुण्य ठळकपणें पाहून वत्सलेबाबत No म्हणून मोकळा झालों असलों पाहिजे. अर्थात, भावनेच्या बळावर दिलेल्या नकाराला

कारणपरंपरा जरी मीं त्या वेळीं कांहीं दिली असली, तरी ती तशीच फुसकी असली पाहिजे, यांत मला आज संदेह वाटत नाहीं.

त्या वेळीं मी न कळत भावनाविवश होतों, असें वर मीं म्हटलेंच; त्याशिवाय माझ्या या नकाराला आणखी एक कारण होतें, असें माझ्या मनास वाटतें. तरुणता अगर तारुण्याचा अरुणोदय ज्या व्यक्तींत झालेला असतो, अशांवर काव्याचा म्हणजे सत्याभासाचा व कलेच्या आभासाचा परिणाम हटकून होतोच. या आभासास अनुसरूनच माझी बायको कशी असावयास पाहिजे, याचें गमक मीं ठरविलें होतें. त्यांतल्या तपशीलाचा विचार करीत असतांना व वत्सलेंत तपशीलवार शंभर टक्के सौंदर्य मोजीत असतांना कुठें तरी बेरजेंत तूट आली असावी, याहून कांहीं कारण संभवत नाहीं.

आणि आज मात्र, त्या तपशीलाचा आणि आलेल्या तुटीचा विचार माझ्या मनास वेडेपणाचा भासूं लागला आहे. आज पांच वर्षांनीं त्याच वत्सलेंत तें काल्पनिक वैगुण्य न पाहण्याइतका भावनेच्या आवरणापासून मी अलिप्त झालों आहें. आज विचारांच्या किंचित् वाढत्या प्रबलतेमुळें मला वाटतें कीं, वत्सला काय, किंवा माझी आजची पत्नी काय, दोघी सारख्याच. वैगुण्य नाहीं न् कां ऽऽऽ हीं नाहीं ! मग मीं एवढी शोधाशोध, आणि yes no ची आटाआट केली कशाला ?........ देव जाणे !

# उत्पत्ति, स्थिति आणि लय

नुकतीच घडलेली गोष्ट. रात्रीं आठ-साडेआठच्या सुमारास शांत चित्तानें करमणुकीसाठीं मी पी. जी. वुडहौसचें Something Fresh वाचीत सतरंजीवर पडलों होतों. वाचनांत पूर्ण गुंग होण्यापूर्वीं कशी काय कोणास ठाऊक, दाराच्या चौकटींत खिळ्याला अडकवलेल्या चिमणीची काच एकदम तडकली आणि खळकन् खालीं पडून तिचे तुकडे इतस्ततः पडले.

आणि त्या आवाजानें माझी वाचनाची अर्धवट समाधि भंगली आणि माझ्या अंतःकरणांत एकदम चर्रर् झालें. मीं ती काच दोन दिवसांपूर्वींच बाजारांत जाऊन स्वतः आणली होती व ती बसवून स्वतः दिवा लावतांना मला त्या दिवशीं खरें मानसिक समाधान लाभलें होतें. पण तें सारें समाधान असें कोलमडून कोसळलें.

पुष्कळदां आपलें मन असेंच एकदम चरकतें. अर्थात् असें चरकण्याला कांहीं तरी निमित्त लागतेंच. वर्षाकालांत आभाळांत ढग थोडेफार जमलेले असतात आणि प्रमाणाबाहेर एकदम गडगडाट होतो. त्या गडगडाटानें आपलें मन किंचित् हदरतें व त्यांतच वीज जरा जास्त वेळ लवली आणि कोठें तरी लोंबकळून कोसळली म्हणजे असाच मनाला एकदम चरका बसतो. अर्थात् या गडगडण्यापूर्वीं सर्वत्र शक्य तितकी दाट शांतता जमलेली असते. वास्तविक पूर्णपणें शांत असणें हा कांहीं जगताचा नियम

नव्हे; कोठें ना कोठें कांहीं तरी घडामोड चाललेली असावयाचीच व त्या प्रमाणांत स्तब्धतेचा भंगही पण व्हावयाचाच. जणूं कांहीं पुढें घडून येणारा मोठा आघात सहन करण्याचें बळ यावें, या उद्देशानेंच जगानें ती अल्पकालीन अनैसर्गिक शांतता धारण केलेली असते. मनुष्याच्या मनास चरका बसण्यापूर्वी त्याची अशीच स्थिति झालेली असते; आणि वास्तविक मानवी मनाची अशी गाढ शांतता म्हणजे खरोखर अनैसर्गिकच होय. पाण्या-सारखें, नव्हे पाण्याहूनही जास्त चंचल असणें व त्यांत भावनांचे तरंग सारखे उसळत राहणें, हाच त्याचा स्वभावधर्म होय.

पुष्कळदां आपण एकाद्या कुशल तंतकाराचें वादन ऐकण्यास जातों. जसजशी कार्यक्रम सुरू होण्याची ठरलेली वेळ अगदीं जवळ येऊं लागते, तसतशी आपली उत्सुकता वाढूं लागते. शेवटीं आपली उत्सुकता परमावधीस पोंहोचली आहे, अशा स्थितींत तो तंतकार एकदम, आपलें कौशल्य आस्ते आस्ते प्रकट करण्या-साठीं, एका हातांत वाद्य व दुसऱ्या हातांत संगीताचे तरंग निर्माण करण्याची ती धनुकली घेऊन अगदीं कुशल हातानें एक ध्वनि रेखाटतो. आपले आतुर झालेले श्रवण स्वर्गसंगीताचा पहिला तरंग अत्यंत कोमल स्वरूपांत कानांवर पडतांच एकदम निवतात व आपल्याला अंतःकरणाच्या अगदीं आंत नाजूक गुदगुल्या होऊन हृदयांत शांततेच्या आणि समाधानाच्या लहरी सुरू होतात.

त्या शांततेशीं व समाधानाशीं अगदीं विसदृश अशा भावना अकस्मात भपकन् आवाज होऊन दीप विझण्यानें अगर काच तडकून घरंगळण्यानें निर्माण होतात. जणूं कांहीं मन एकदम

भकास होतें. अंतःकरणांतील समाधानाच्या तारा जणूं कांहीं कापल्या जातात अशा वेळीं. मृत्यूनें एकाद्या घरांत आपल्या अदृश्य पावलांनीं थैमान घालून एकादें माणूस टिपून घ्यावें आणि घरच्या माणसांच्या मनाला चटका लावावा म्हणजे जें आंतरिक दुःख अनुभवण्याचा प्रसंग येतो, तसलेंच पण त्या मानानें अत्यल्प-जीवी दुःख काचेच्या खळ्ळ् अवाजानें आपण अनुभवीत असतों. आपल्या मनाला एक प्रकारची हुरहुर लागते व मग कांहीं काल चैन पडेनासें होतें. आपलीं सर्व माणसें जिकडलीं तिकडे सुखरूप असतील ना, असा एक विचार आपल्या मनांत पटकन् आल्या-वांचून राहत नाहीं.

मनाची अशी स्थिति होण्यास माझ्या दृष्टीनें एकच कारण संभवतें. एकाद्या गोष्टीचा 'लय' होणें ही स्थितीच मनुष्याला मानसिकदृष्ट्या पटत नाहीं. जगांत एवढ्या उलाढाली होतात, त्यांत अनेक गोष्टींचा विनाश होतो, अनेक लढाया होतात व त्यांतही अनेकविध संहार होतो. हा विनाश अगर संहार बहुधा मनुष्यमात्रानेंच केला असल्यामुळें सहज प्रत्येकास असें वाटण्याचा संभव आहे कीं, लय करणें हीच मानवी मनाची खरीखुरी दुर्दमनीय प्रवृत्ति होय.

पण असें विधान करणें बरोबर होणार नाहीं. मला तर असेंच राहून राहून वाटतें कीं, होणाऱ्या या संहाराची वास्तविक कल्पना मानवी मनास शिवत नसावी. कोणत्या तरी नवीन वस्तूची उत्पत्ति करण्याच्या भरांत नादावलेलें मन एकाद्या महत्त्वाच्या गोष्टीचा लय करून बसतें हें खरें, पण तें न उमजतां! अशा तऱ्हेनें न कळत झालेल्या संहारामुळें मनुष्याचें मन फारसें उदास

होत नाहीं व थोडें खिन्न झालेंच, तरी ती उदासीनता मनुष्याच्या मनाची पकड साधूं शकत नाहीं. पण अशी उदासीनता काळजास शिवून जेव्हां झोंबूं लागते, तेव्हां तो लय करणारा प्रकार ताबडतोब थांबविण्यांत येतो.

उदाहरणार्थ, गुलामांच्या व्यापारांतील भीषणतेचा अनुभव येतांच मानवी मनास गुलामगिरीची– माणुसकीच्या लयाची– शिसारी बसली व ती चाल बंद पडली. किंवा जर्मनीच्या झालेल्या पराभवाची, उगवत्या कष्टांची आणि विपन्नावस्थेची पुसट कल्पना मनापुढें तरंगूं लागतांच महायुद्ध थांबलें. आणि युद्धाची किळस वाटूं लागल्यामुळें, फार थोड्या पुरुषांस का होईना, युद्धें पूर्णपणें थांबवावींत व शस्त्रसंन्यास करावा असें वाटूं लागून त्या दिशेनें प्रयत्न करण्यास सुरुवात झाली. हीच स्थिति प्रत्येक वस्तूबाबत आहे.

उत्पत्ति आणि स्थिति या बाबतींत मनुष्य प्रवृत्तिपर आहे, म्हणून एकंदरींत मानवी व्यापारास विशिष्ट वळण लागलें आहे. या प्रवृत्तीच्या पूर्णपणें आधीन झाल्यामुळेंच जगांतील नाना गोष्टींस स्थैर्य आलें आहे. मानवाची व एकंदर सर्व जगाची, त्यामुळेंच उत्क्रांति होत आहे. उत्पत्ति नच करतां आली, तर निदान प्रत्येक वस्तुमात्राची पूर्वस्थिति कायम राहावी एवढ्यासाठीं मनुष्यमात्राचा केवढा तरी भगीरथ प्रयत्न चाललेला असतो. आणि सृष्टींत एकाद्या वस्तूचा कांहीं कारणानें लय होऊं लागला, तर उत्पत्ति आणि स्थिति यामुळें प्रवृत्तिपर असलेला आपल्या मनास एक प्रकारची निष्क्रियता येते. काचेच्या खळ्ळ् आवाजानेंही हाच परिणाम मनावर होत असतो. प्रवृत्तिपर असलेल्या कांहीं संवेदना

जणूं कांहीं आंतल्या आंत कांपल्या जातात व त्याचाच उदासीनता हा दृश्य परिणाम असतो.

या बाबतींत एकाद्या दैववाद्याचें मत कदाचित् निराळें पडेल. त्याला असें वाटेल कीं, मनुष्याच्या प्रारब्धाभोंवतीं अगर दैवाभोंवतीं, मनुष्याचें मन ज्यामुळें उल्हसित अगर उदास होईल अशा दोन प्रकारसमुच्चयाचें वर्तुलभ्रमण चाललेलें आहे. मनुष्य आनंदित झाला म्हणजे त्याच्या भावना किंचित् ताठरतात व अनावर होतात, याचें कारण विशिष्ट प्रकारसमुच्चयाचा प्रभाव हेंच त्याच्या दृष्टीनें असूं शकेल. मन त्या वेळीं अशा स्थितीप्रत जाऊन पोंहोचलेलें असतें कीं, त्यास परिणामाच्या स्वाधीन होण्याशिवाय दुसरा मार्गच नसतो. चंद्रास ज्याप्रमाणें कला असतात व तो ज्याप्रमाणें कमी-अधिक होत असतो, त्याप्रमाणें मानवी मनाचा चंद्र हा कलाकळांनीं जास्त सोशिक होत जातो. एकाद्या भावी संकटाची आगाऊ कल्पना असली, तर त्या प्रमाणांत सोशिकपणा वाढतो व म्हणून दुःखाचा आवेग तितक्या प्रमाणांत सहन करण्याची शक्ति मनुष्यास प्राप्त होते. आणि काच तडकण्यापूर्वीं आगाऊ कल्पना नसल्यामुळें मनास त्या सोशिकपणाची कदाचित् सर्वांत कमी प्रकारची स्थिति प्राप्त झालेली असेल.

कांहींही असो, हा विचार तूर्त बाजूस ठेवूं या. पण एवढें मात्र म्हणण्यासारखें आहे कीं, आपण जेव्हां वाद्यवादन ऐकत असतों, तेव्हां आपणांस संगीताच्या निर्मितीची कल्पना असते. तें संगीत निर्माण होत असतांना आपल्या अंतःकरणांतील संवेदनांच्या तारांस कंप होतो खरा, पण त्यांतून समाधानाचे सूर निघण्यापुरताच. पण काचेच्या तडकण्यानें अगोदर निर्माण

झालेल्या संगीताचा—उत्पत्ति अगर स्थितीचा—लय होत असतो व म्हणून आपल्या मनांतील समाधान नष्ट होऊन आपल्या अंतः-करणास एकदम चरका बसतो. शिवाय हें उघड दिसतें कीं, उत्पत्ति करण्याकडे व स्थिति राखण्याकडेच मानवी बुद्धीचा खरा कल दिसतो. मनुष्यास संहारकर्ता म्हणून नांवें ठेवणें अवास्तव होय.

---

# माझा देव

गेल्या वर्षीं जगद्गुरु कृष्णमूर्ति यांचा आमच्या इंदूर शहरीं बरेच दिवस मुक्काम होता आणि रोज संध्याकाळीं एडवर्ड हॉल-मध्यें त्यांचें एक व्याख्यानही तासभर होई.

ते काय सांगत तें मला व्याख्यानांस रोज जाऊनही समजलें नाहीं. आज त्यांचीं भाषणें बरींच पुसट आठवतात, पण त्यांचा अर्थ काय हें मला अजूनही कळत नाहीं. अर्थात् या जगद्गुरूंच्या ईश्वरत्वाचा ठसा माझ्या अंतःकरणावर न उमटल्या-मुळें " तसाचि उरलों कसा ? " असा प्रश्न माझ्या बाबतींत माझ्या मनांत वारंवार डोकावतो.

आणि मला विशेष चमत्कारिक वाटण्याचें कारण म्हणजे माझ्या सगळ्या मित्रांच्या मनावर त्यांच्या व्यक्तित्वाचा (Personality) आणि ईश्वरत्वाचा योग्य परिणाम झाला. त्यांना त्यांच्या हसण्यांत साक्षात् स्वर्गीयता दिसली व तें अत्यंत सात्त्विक आणि म्हणून सहज सुंदर वाटलें. एका मित्राला त्यांच्या हावभावांचें कौतुक तर अजूनही वाटतें.

खरें सांगण्यांत कृष्णमूर्ति या व्यक्तीचा कोणत्याही तऱ्हेनें अपमान करण्याचा माझा उद्देश नाहीं, हें प्रांजलपणानें नमूद करून असें म्हणतों कीं, त्यांचे हावभाव मला अत्यंत कृत्रिम वाटले.

इंग्लंडमधल्या एखाद्या वक्तृत्व शिकविण्याच्या शाळेंत त्यांनीं कांहीं दिवस काढले असतील इतकाच फार तर मी तर्क करीन. त्यांचें हसणें तर माझ्या मनावर क्वचित् व्हावा त्याचे उलटच परिणाम करतें झालें. सारांश, त्यांच्यांत ईश्वरत्व आहे असें मला मुळीं भासलेंच नाहीं.

याचें कारण मी परमेश्वरत्वाविषयींच्या ज्या कांहीं सगुण कल्पना मनांत बाळगतों, त्यांशीं ताडून पहातां, ही कृष्णमूर्तीची मूर्ति मला विसदृश भासली हें उघड होय. तुकारामानें अठ्ठावीस युगें विटेवर उभा असलेला, कटेवर हात ठेवलेला असा पंढरीचा पांडुरंग—पाषाणाचा पुतळा—देव म्हणून मानला व त्याची मनोभावें प्रार्थना केली. त्या पाषाण मूर्तींत जेव्हां त्याला चैतन्य दिसलें, तेव्हांच त्याला परमेश्वरानें दिलेल्या प्रत्यक्ष भेटीची खात्री वाटली. परमेश्वर श्रीराम वेषांत येऊन तुकारामासमोर उभे राहिले असते, तर ते त्यास देवरूप वाटलेच नसते व त्यांच्या अंतःकरणांतली ईश्वरभेटीची आंच शमलीच नसती. रामदासांना परमेश्वरानें आपल्या सोळा हजार एकशें आठ गोपींसह कृष्णावतारांतील रूपानें भेट दिली असती, तर त्यांना त्या रूपांत ईश्वरत्व दिसलें नसतें व "मना वासना दुष्ट कामा नये रे" किंवा "नको रे मना काम नाना विकारी" इत्यादि श्लोक म्हणून कृपेच्या भिक्षेची वाट न पाहतां त्यांनीं भिक्षेसाठीं दुसऱ्या घराकडचा मार्ग चोखळला असता! आणि जातांना या आजन्म ब्रह्मचाऱ्यानें मागें चुकूनसुद्धां पाहिलें नसतें!!

साधारणतः कोणताही भक्त आपल्या मनामध्यें परमेश्वराचें एक प्रकारचें मनोमय सगुण रूप ठरवीत असतो व केव्हांही परमेश्वराची भक्ति करीत असतांना ती मनोमय सगुण मूर्ति

त्याच्या अन्तर्दृष्टीपुढें उभी असते आणि परमेश्वरानें प्रसन्न होऊन भेट देण्याच्या वेळीं तें भक्तानें ठरवलेलें रूप घ्यावें अशी त्याची मनापासून दृढ इच्छा असते.

व्यक्तिशः असें लिहितां येईल कीं, बरेंचसें समजूं लागल्यापासून आणि परमेश्वराविषयीं विचार करूं लागल्यापासून मींही पण माझ्या दृष्टीनें परमेश्वराचें एक रूप ठरवून ठेवलें आहे. परमेश्वराच्या मनांत मला भेट देण्याची कधीं काळीं इच्छा झाली तर त्याच रूपानें द्यावी असा माझाही दृढ हट्ट आहे आणि त्यानें इतर रूपांत भेट दिली तर मी त्याचें ईश्वरत्व साफ नाकारीन. म्हणजे असें कीं, मी वाटेल त्या मूर्तींत ईश्वरत्व पाहण्यास तयार नाहीं. वाटेल त्या वस्तूंत अगर जीवमात्रांत ईश्वरत्व पाहणें ही कल्पनाच मला पटत नाहीं आणि ज्यांच्या मनाला ती पटली असेल, त्यांना कृष्णमूर्तींतच काय, वाटेल त्या गोम्या वल्लद तिम्यामध्यें सुद्धां ईश्वरत्व दिसेल व ते त्याचा ईश्वर ईश्वर म्हणून उदोउदो करतील. मग त्याच्या दरोड्याला ते लीला म्हणतील आणि त्याच्या नीतिबाह्यतेला बंधनातीतता म्हणून गौरवतील.

वाटेल त्या वस्तूंत ईश्वरत्व पाहणें ही मनाची रोगट अगर एक प्रकारें खुरटलेली स्थिति होय. अशा खुरटलेल्या मनाला ईश्वरप्राप्तीची तीव्र, सतत टिकणारी अनिवार तळमळ कधीं लागणें शक्य आहे कीं नाहीं, हा मला एक गूढ प्रश्न वाटतो. पण त्याचा विचार करण्याचें मला कारणच नाहीं. खुरटलेल्या रोगट झाडाला कधीं रसाळ अमृतफळें धरतात का ?

माझ्या दृष्टीनें प्रत्येक मनुष्याला एका ठरीव वस्तुजातांतच ईश्वर दिसूं शकतो व प्रत्येक वस्तुजातांत ईश्वरत्व पाहण्याचा

हव्यास धरणें म्हणजे ईश्वरत्वापासून दुरावणेंच होय. परमेश्वर सगळें चराचर व्यापून दशांगुळें उरला आहे असें आपण आज पिढ्यान्‌पिढ्या मानीत आलों आहोंत. तत्त्व या दृष्टीनें या विधानाकडे पाहिलें तर तें गोंडस व काव्यमय वाटतें, यांत संशय नाहीं. पण असल्या काव्यमय तत्त्वज्ञानाचा दृक्‌प्रत्यय घेतां आला, तरच तीं तत्त्वें जागतिक सत्य म्हणून खरीं मानणें युक्त होईल. म्हणून ज्यांना ज्यांना कृष्णमूर्तींत परमेश्वर दिसला त्या माझ्या मित्रांना मी गतानुगतिक म्हणून हिणवीत असतों. वाटेल त्या व्यक्तींत ईश्वरत्व पाहणारे मित्र दिसले कीं, मला 'उतावळ्या नवरदेवा'ची आठवण होते.

आणि ज्याप्रमाणें एकाच कृष्णमूर्तींत अनेकांनीं देवत्व पाहणें मी हास्यास्पद मानतों, त्याचप्रमाणें, प्रत्येक स्त्रीनें आपल्या पतींत देवत्व– म्हणजे पूर्णत्व– पाहणेंही मी हास्यास्पद मानतों. पतींत, म्हणजे एका विशिष्ट, जगाच्या बाजारांत मानवी बंधनांनीं निगडित झालेल्या व्यक्तींत–आपला पति झाला, तरी देवत्व दिसणें कसें शक्य आहे हें मला कोडेंच आहे. लग्न हा लौकिक व्यवहार होय. त्याचा देवत्वाशीं संबंध नाहीं. पण तो दुसऱ्या लघुनिबंधाचा विषय झाला.

# वरातीचा सुखसोहळा

एकादी वरात पाहिली, कीं मला अलीकडे राहून राहून थोडेसें वाईट वाटतें आणि मग पश्चात्ताप होतो. वरात म्हणजे कांहीं लग्नांतल्या प्रत्यक्ष विधींतलें तंत्रमंत्र नव्हे, ती हौसेची बाबत आहे, असें माझें प्रामाणिक मत पडून माझ्या लग्नांत वराती-निमित्तदारू कामांत व बॅन्डमध्यें पैसे खर्च न करण्याच्या अटी-वरच मी बोहल्यावर उभा राहिलों आणि मग वरातीच्या सुख-सोहळ्यांतल्या पुष्कळशा गमतींना मुकलों. म्हणून अलीकडे मी मधून मधून आमच्या कुटुंबाला म्हणतों सुद्धां कीं, पुन्हा आपण आपली एकदां थाटाची नुसती वरात काढूं या म्हणून. पण ती माझें प्रांजल मत 'इश्श'वरच घालवते !

परवांच मीं एक वरात पाहिली व मला असेंच पुन्हा थोडेसें वाईट वाटलें. रात्रींची अगदीं शांत वेळ, दूर दूर सरलेल्या मोजक्याच चांदण्या आकाशाच्या ताजमहालांत बसवलेल्या हिऱ्यांसारख्याच भासत होत्या. सगळ्यांनाच अगदीं गाढ झोंपा लागल्या होत्या आणि इतक्यांत उत्कृष्ट बॅन्डच्या उत्तेजक आणि उन्मादक सुरांत, घोड्याच्या थयथयाटांत, सुंदर वस्त्रालंकारांत नटलेल्या स्त्री-पुरुषसमुदायांत एक वरात निघाली. पहिल्याच दणदणीत बारानें मी जागा झालों. प्रथम गॅसच्या बत्त्या घेतलेलीं माणसें, नंतर समुद्राच्या फेसासारखें दुधाळ उमदें वारू व त्यावर जरीची टोपी व अंगांत उंची कपडे चढवलेलें ७।८ वर्षांचें बालक

व मागें नुकत्याच लग्न झालेल्या जोडप्याची मोटार असा थाट मला आस्ते आस्ते दिसूं लागला. मग माझी त्या नूतन जोडप्याकडे दृष्टि वळली.

पगडी चढवलेले ते राजश्री आपल्या पत्नीपासून लांब नाहींत जवळही नाहींत, असे बसले होते. त्यांची दृष्टि तिच्यापासून दूरही नाहीं व तिच्याकडेही नाहीं, अशीच कुठेंशी होती. आणि त्यांच्या 'तिची' सुद्धां कांहींशी अशीच स्थिति दिसली. बिचारी-ला मान वर करून पाहणें शक्यच नव्हतें. शिवाय शेजारींच एक कैदाशीण ( सौम्य अर्थीं ) पाठीराखीण म्हणून डोळ्यांत अगदीं तेल घालून बसलेली. पाठीराख्या म्हणजे पाठपुरावा करण्यांत अगदीं मुरलेल्या मोरंब्यासारख्या आणि रापलेल्या गुलकंदा-सारख्या असायच्या. संधि सांपडतांच अगदीं मर्मावरच विनोदा-चा आणि थट्टेचा फुंकर घालीत घालीतच शेल मारतील आणि नकोनकोसें करतील. वैरीसुद्धां इतका संधि साधून काम साधायचा नाहीं! असो. आणि मागाहून स्त्रीसमाज व पुरुषसमाज पायींच रेंगाळत, हसत-खिदळत चालला होता.

लग्नाची वरात म्हणजे एक और चीज होय. लग्न हें एक सामाजिक पण अत्यावश्यक व नैसर्गिक बंधन आहे. मनुष्यास या बंधनाच्या धाग्या-दोऱ्यांत एकदांच अडकावयाचें असतें. अर्थात्, या बंधनांत स्वतःस गुरफटून घेत असतां प्रत्येक वेळीं तरुणपणच्या किंचित् लाजऱ्या स्वभावानुसार आणि प्रकाराच्या एकंदर नवखेपणानें त्याच्या मनाची कशी चमत्कारिक स्थिति होते, याचें पूर्ण वर्णन करणें प्रायः जमायचें नाहीं. वरात हा लग्नांतलाच एक प्रकार. या वेळीं मनाचीं आन्दोलनें सारखीं चालूच असतात. साधारणपणें समाजांतील प्रत्येक घटकावयवास

लग्न आवश्यक, पण ही मिरवणूक मोठी संकोचकारक वाटते. नवरदेव या वेळीं एकाच वेळीं आनंदानें हसत असतो, लाजेनें ओशाळत असतो आणि एकंदरींत सावध, बेसावध, बुजलेला, अशा सर्व प्रकारच्या मनःस्थितींत एकसमयावच्छेदेंकरून असतो. तसें कशाला!

"हास्य निमालें
अश्रु पळाले
कंटक शल्यें बोथटलीं
मखमालीची लव वठली
कांहीं न दिसे दृष्टीला
प्रकाश गेला, तिमिर हरपला
काय म्हणावें या स्थितिला
झपूर्झा गडे झपूर्झा!"

हा केशवसुतांच्या काव्यांतला भागच ठेवतों अवतरून! त्यांत काय तें समजा! आणि त्याची देवता? ती तर स्त्रीजनसुलभ शालीनता, विनय, लाजाळूपणा यांनीं अगदीं लवलेली असते. तीं दोघें एकमेकांजवळ असून सुद्धां एकमेकांस दिसत नाहींत. जणूं कांहीं त्यांची स्थिति वरातीच्या रात्रीपुरती का होईना, पण चक्रवाकमिथुनासारखी झालेली असते. लज्जेचें केवढें जड दडपण दोघांच्याही मनावर आलेलें असतें! अशा वेळीं वरात पाहण्यास उभ्या असलेल्या प्रेक्षकांना वराचें तोंड किंचित् दिसतें तरी चुकून. पण वधूचें तोंड दिसणें परम दुर्लभ.

एकंदरींत, वरातीच्या वेळीं मनांत भावनांचा सबगोलंकार निर्माण होत असतो. असा सबगोलंकार आयुष्यांत अन्य वेळीं अनुभवणें प्रायः शक्य नसतें; म्हणून या सर्वभावनामय स्थितीचा

अनुभव घेण्यासाठीं, वर सांगितली तशा तऱ्हेची आपली मिरवणूक एकदां काढून घेणें प्रत्येकासच माझ्या दृष्टीनें आवश्यक आहे.

आणखी एक मौज वरातींत मिरवणाऱ्या स्त्री-पुरुषांत घडत असते. माझें लग्न झाल्यानंतर मी प्रथमच जेव्हां एका मित्राकडे "सहकुटुंब सहपरिवार (परिवार नव्हताच मुळीं!) कार्यसिद्धि" करण्यासाठीं गेलों, त्या वेळीं मीं हा वरातीचा सोहळा निराळ्या आणि मोठ्या मजेदार रीतीनें अनुभवला. वरातींत मिरवत्या बायांत आमची 'ती' मिरवत होती व पुरुष मंडळींतल्या मिरवत्यांत मी सामील झालों व दोघांनीं एकाच वेळीं मिरवून घेण्याची हौस पुरवून घेतली! आतां यांत थोडें वैगुण्य होतें आणि तें म्हणजे माझ्या पगडीला व तिच्या कपाळाला मुंडावळी नव्हत्या व बसायला मोटार नव्हती. बाकी सर्व संच अगदीं पुरा जमला होता. पण आम्हीं दुधाची तहान मग नुसती ताकावरच भागवली.

त्या वेळीं आम्हांला प्रथम कळलें, म्हातारीं, पिकलेलीं स्त्री-पुरुषें वरातींत कां मिरवतात तें! वरातींत मिसळून, निर्माण होणाऱ्या तरुण आनंदांत आपणही त्याच तरुणपणच्या स्थितीचा अनुभव घ्यावा, हीच चोरटी भावना त्यांच्या मनांत कळत न कळत, उपजत असली पाहिजे, असा माझा व तिचाही कयास झाला व तोच अजूनही ठाम आहे. आणि म्हणून माझें अलीकडे असें प्रांजल दृढमत होऊं पाहत आहे कीं, वरातीच्या वेळीं तरुण स्त्री-पुरुषांनीं मिरवणुकींत भाग घेण्यापेक्षां पन्नाशीची झुळूक लागलेल्या वृद्धांनींच सहकुटुंब भाग घेऊन, पुन्हा तरुण झालों आहोंत, अशा भावनेचें मृगजळ चाखण्याचा अवश्य प्रयत्न करावा व तरुण जोडप्यांनीं घरींच बसून खुशाल मोकळ्या थट्टा-विनोदांत काल घालवावा.

---

# सारखेपणा

कोणताही मनुष्य आपल्या दृष्टीस पडला, म्हणजे आपण तो कोणासारखा दिसतो, याबद्दल न कळत विचार करीत असतों. त्याचे डोळे, नाक, कान, जिवणी, दातांची ठेवण, भुवयांचा आकार आणि कपाळाचें भव्यपण यांचा आपली दृष्टि एकसमयावच्छेदेंकरून आढावा काढते आणि मग आपल्या मनाच्या कोपऱ्यांत त्या गृहस्थाविषयींच्या कांहीं भावनांना स्थान मिळतें. आपणांपैकीं प्रत्येकजण दुसऱ्या व्यक्तीकडे पाहत असतांना याच सारखेपणा शोधण्याच्या अप्रकट भावनेनें पाहत असतो आणि म्हणूनच एकादा अनोळखी गृहस्थ भेटला, म्हणजे 'हा अमक्या अमक्यासारखा दिसतो; याच्या हनुवटीची ठेवण तमक्याच्या हनुवटीसारखी आहे,' इत्यादि विचार आपल्या मनांत आल्यावांचून राहत नाहींत. पुरुषांपेक्षां स्त्रियांना या बाबतींत जास्त सूक्ष्म दृष्टि असते, असा माझा ढोबळ अजमास आहे; कारण एकादें लहान मूल पाहिल्यानंतर बहुश: पाहणारी बाई म्हणतांना ऐकूं येते, 'अगदीं बापाच्या वळणावर गेलाय् बाई!'

पण प्रत्येक मुलगा बापाच्या वळणावर आणि मुलगी आईच्या वळणावरच जाते कीं काय, याविषयीं माझें मन इतर बऱ्याच लोकांप्रमाणें फार साशंक आहे. पुष्कळ वेळां मूल आईच्या अगर बापाच्या थेट सारखें दिसूं लागतें यांत शंकाच नाहीं. पण हें सारखेपण अगदीं निर्भेळ असणें शक्य नाहीं. तें जर निर्भेळ

असतें, आणि एकजण जर दुसऱ्याची प्रतिमा झाला असता, तर काय मौज झाली असती! जुन्या किती तरी वीर पुरुषांचा क्षणांत पुनरुद्धार करतां आला असता. मल्हारराव होळकरांच्या वडिलांचा फोटो आपणांस पहावयास मिळत नाहीं. त्यांचा ऐन तिशींतला फोटो सध्यांच्या होळकरांच्या छबीवरून हुबेहूब बनवतां आला असता आणि माझ्या निपरपणज्यांच्या रूपाची कल्पना माझ्या चालत्या-बोलत्या स्वरूपाकडे पाहून अगर माझ्या तत्कालीन पेहरावांत काढलेल्या फोटोवरून सहज झाली असती. आज किती तरी ठिकाणीं अज्ञात इतिहासपुरुषांच्या प्रतिमा पडल्या आहेत. पण त्यांतील कोणती कोणाची याचा निर्णय लावणें अशक्य झालें आहे. प्रत्येक वंशजानें पूर्वजानुरूप व्हावयाचें असा नियम असता, तर वंशजांच्या प्रतिमेवरून पूर्वजांचा अजमास लागून संशोधकांची केवढी मोठी सोय झाली असती! कदाचित् फोटोग्राफर्सच्या आणि सिनेमा नटांच्या मात्र पोटावर पाय आला असता!!

जन्मलेल्या प्रत्येक अपत्यांत त्याचे वडिल आणि आई यांच्या गुणांतील सारखेपण आणि शरीरयष्टींतील कांहीं सारखेपण उतरतें ही गोष्ट निर्विवाद आहे; पण एवढ्यानें भागणार नाहीं. एकाद्या मोठ्या थोरल्या वंशवृक्षाचा एकच एक आधार असा एक कोणी तरी पुरुष होऊन गेलेला दिसतो. तो व त्याची बायको यांचेमुळें फोफावलेल्या वंशवृक्षांत अनेक पुरुष व स्त्रिया निर्माण होतात. त्या प्रत्येकांत मातृवंश व पितृवंश या दोहोंतील गुणांश आणि देहांश सामावत असल्यामुळें, कोणताही एक पुरुष पूर्णपणें एकाची प्रतिमा होणें शक्य नाहीं आणि म्हणूनच आपलें अपत्य कितीही आपल्यासारखें झालें, तरी एका ठरीव काल्पनिक मर्यादेपर्यंतच तें आपल्यासारखें होणार हें सिद्धच आहे.

आणि म्हणूनच थोडक्यांत मला असें म्हणावयाचें आहे कीं, आपलें अपत्य, जरी आपलें असलें, तरी तें सहसा आपल्यासारखें दिसायचेंच नाहीं; दिसलेंच, तरी तें अपवादात्मक होय. एका मुलांत त्याचे वडील, आई, आजा, आजी, चुलता, चुलती, मामा, मामी इत्यादि सर्वांचे मूलभूत अंश जर उतरणार, तर तें मूल आपल्यासारखें कसें निर्माण व्हावें ? तें शक्यच नाहीं ! प्रत्येकाच्या मूलभूत अंशानें सजीवता आणि सदेहता प्राप्त झालेल्या आपल्या एका अपत्यांत आपला अंश कितपत असणार ? आणि तो सर्वांत प्रभावी ठरून 'आपलेपण' पूर्णपणें प्रस्थापित करील हें कसें काय शक्य होणार आहे ? एवढ्याचकरितां, जर एखाद्यानें मला उद्देशून म्हटलें, " नाना, तुझा मुलगा अगदीं तुझ्यासारखा आहे; तूं लहानपणीं अगदीं अस्सा होतास " तर मी आपला नुसता हसतों. त्या त्याच्या बोलण्यास माझ्या दृष्टीनें औपचारितेच्या पलीकडे कांहीं अर्थ नसतो. मनुष्य ही असली औपचारिकता कां पाळतो कोणास ठाऊक !

सगळ्या मानवी जगाचा उगम कोणत्या तरी चारदोन अगर दोन ठरीव व्यक्तींपासून झालेला असल्यामुळें, आज कोट्यवधि मानव जरी दिसत असले, तरी त्यांतील प्रत्येकांत कांहीं ठरीव मूलभूत व इतर अनंत, भिन्न अंश एकवटून प्रत्येकाचा देह निर्माण झाला असला पाहिजे. अशा स्थितींत, मी माझ्या पुत्रांत 'मीपण' कितीही शोधूं लागलों, तरी तें कितपत आढळणार ? अशा स्थितींत माझा पुत्र माझ्यासारखा मानणें भ्रामक आणि बुळेपणाचें होणार नाहीं काय ?

हें सगळें शारीरिक रीत्या झालें. मानसिक उत्क्रान्तीच्या अगर विकासाच्या दृष्टीनें पाहिलें, तर याहूनही केवढी तरी क्रान्ति

दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं. आजवर अनेक पिंडब्रह्मांडांत सांठवली गेलेली, माझ्यांत उतरलेली व इतर अनंत मार्गांनीं मिळवलेली अशी बुद्धिमत्ता– मानसिकें– माझ्या मुलांत व प्रत्येक मुलांत उतरणार; तर मग माझ्या मुलाची मनःप्रवृत्ति, तिचा विकास व तिची प्रत अगर कस माझ्यासारखाच असेल, असें मी व इतरांनीं मानणें व म्हणणें हा केवढा वस्तुस्थितीचा विपर्यास !

आकाशांत प्रथम सूर्य प्रकाशूं लागला. त्यानें अवघें ब्रह्मांड व्यापिलें. त्याचे अनेक सूर्य, त्यांचे अनेक ग्रह, उपग्रह, उल्का, इत्यादि निर्माण होऊन कशाच्या तरी अंशांनीं मानवी सृष्टि उद्भवली. ज्याप्रमाणें प्रत्येक तारा, ग्रह अगर उपग्रह दुसऱ्यावर अवलंबून असूनही स्वयंपूर्ण आहे, त्या प्रत्येकांत जसें साम्य असूनही विरोध आहे, तसेंच माझ्या मुलाचें व माझें– प्रत्येक मुलाचें व बापाचें, प्रत्येक व्यक्तिव्यक्तीचें नाहीं काय ? असेंच असलें पाहिजे.

एवढ्याचकरितां मला तर असेंच वाटतें कीं, साधारणतः एकाच वयांतलीं बरींचशीं मुलें एकसारखीं दिसतात– दिसावयास पाहिजेत ! एकाच दिवशीं जन्मलेल्या शंभर मुलांतलीं पुष्कळच मुलें जास्त प्रमाणांत एकसारखीं दिसतील. एका विशिष्ट हवामानांत, एकाच परिस्थितींत आणि एकाच पद्धतीनें वागवलेलीं बहुतेक सर्व मुलें, माझ्या दृष्टीनें अगदीं एकजात एकसारखींच दिसावींत ! आपण लष्करी पोलिसांचें एक पथकच्या पथक पाहतों. सरकार रंगरूटांची भरती करतांना एका उंचीचे, छातीचे, भरदारपणाचे तरुण पसंत करतें. मग त्यांचें शिक्षण एकत्रच होतें. त्यांना एकच नियम पाळावे लागतात व एकच प्रकारचें अन्न व वातावरण अनुभवावयास मिळतें. चारदोन वर्षांतच त्यांच्या चेहरेपट्टीं

तले किरकोळ फरक नष्ट होतात आणि सुतारानें रोखणी फिरवून गुळगुळीत करून वार्निश लाविलेल्या लांकडासारखे सगळेजण फिकट तपकिरी दिसूं लागून, ते एकाच आईबापांचे आणि एकाच वेळीं जन्मलेले– सोदर वाटूं लागतात. तुम्हांला नाहीं वाटत ? निदान मला तरी वाटतात !!

सारांश, बाह्य सारखेपण हें वंशावर अवलंबून नसतें. अनेक कुळांतल्या पुरुषांस अगर स्त्रियांस ही समान परिस्थिति लाभली, तर त्यांच्यांत थोडें फार साम्य दिसून यावयास हरकत नाहीं.

आणि पुष्कळदां हें साम्य प्रत्ययास येतेंच ! एकादे वेळेस आपण रस्त्याकडे सहज पाहत असावें आणि आपली पत्नी घरांत नसावी. समोरून तिच्याच वयाची एकादी बाई जातांना अकस्मात् दिसली, तरी ती 'तीच' असें जें आपणांस वाटतें, तें त्यामुळेंच ! आणि एकादे वेळेस बायकोला चुकून बहीण समजण्याची आणि तिला 'ए पोरी' अशी हाक मारण्याची अस्पष्ट प्रवृत्ति आपल्यांत होते, त्याचें कारण सुद्धां हेंच !

# उन्हाळ्यांतील दुपार

रोजच सकाळीं दिवस उगवतो, दुपारीं माध्यान्हीवर येतो आणि सायंकाळीं मावळतो. असें जर आहे, तर कवि आणि लेखकांनीं सृष्टिवर्णन करितांना – 'ती सकाळची वेळ होती, सूर्याचे कोंवळे किरण हिरवळीवर तकतकूं लागले होते व पक्ष्यांची किलकिल आतां भैरवीच्या सुरांत शेवटची सांघिक लकेर घेत होती' अगर 'सूर्य मावळतीला–अगदीं समुद्राच्या धारेला लागला होता. मनांत ज्याप्रमाणें नाना कविकल्पनांचा गोड कल्लोळ उसळून हेलकावे खावा व नंतर थिजावा तसे आकाशांत क्षीणजीव मेघ सांध्यकिरणांनीं सजीव झाले होते आणि काळवंडूं लागले होते,' इत्यादि सकाळ आणि संध्याकाळचें वर्णन करावें व दुपारचा फक्त एकादा चुकारू उल्लेखच करावा ही कोठली रीत !

आणि याचें उत्तर असें कीं, कवि आणि लेखक हे मोठे लहरी व एककल्ली आणि छांदिष्ट असतात. पूर्वी कोणत्या तरी अमक्या अमक्या कवीनें सकाळ आणि संध्याकाळ यांना चांगलें म्हटलें ना, मग आपणही त्यांना चांगलें म्हणावयाचें असा जणूं कांहीं त्यांचा रिवाज कविसंकेतच पडून गेला आहे. इतर गोष्टींतील नाविन्य पाहण्याच्या त्यांच्या दृष्टीस मग अंधत्व आलेलें असतें.

तीच स्थिति दुपारच्या बाबतींत झालेली असते. वास्तविक दुपार ही एकंदरींत अगदीं अशुभ वेळ आहे व तिच्यांत काव्य-

प्रत्यय येऊं शकत नाहीं असें नव्हे. मला तर असें वाटतें कीं, सकाळ आणि संध्याकाळ या जितक्या आनंदोत्पादक व म्हणून आपल्या दृष्टीनें रमणीय, तितकीच दुपारही रमणीय होय. पण आपल्या उद्योगधंद्याच्या भरांत आपणांस दुपारच्या वेळची रमणीयता अनुभविण्यास उन्हाळ्याच्या सुट्टींतल्या दुपारशिवाय सवडच नसते. पण उन्हाळ्यांतल्या दुपारींसुद्धां ही रमणीयता शोधून काढण्याची वृत्ति आपणांत असली, तरच ती रमणीयता आढळून येते; नाहीं तर नाहीं!

दुपारचें आपलें जेवण, रोजची गर्दी नसल्यामुळें थोडें उशिरां आणि स्वस्थपणानें व म्हणून थोडेंसें जास्त झालेलें असावें, आपण कुटलेली ज्येष्ठमध घातलेली हिरव्या लहान सटांतील लहान चमच्यानें एकदम तोंडांत टाकलेली सुपारी अर्धवट चावीत, चघळीत आरामखुर्चीवर पडलेलें असावें, आपल्या पायांखालीं दुसरी बेतवार उंचीची हातखुर्ची असावी, शेजारींच स्टूलवर प्रो. लक्ष्मणराव सरदेसायांचें 'कल्पवृक्षाच्या छायेंत' हें संकलित लघुकथांचें पुस्तक असावें आणि आपण डावीकडच्या सताड उघड्या खिडकींतून ५।५० पावलांवर असलेल्या उंच गेलेल्या हिरव्याचार चिंचेकडे पहात असावें, म्हणजे मग आपल्याला स्वस्थपणाच्या सुखसंवेदना होऊं लागतात. पावसाळ्याच्या आरंभीं केव्हां तरी केरकचऱ्याबरोबर बुंध्याशीं पडलेल्या शिराळ्याच्या बियांचे वेल वरच्या फांद्यांच्या शेंड्याचाही ठाव घेऊन पसरलेले, नंतर शिराळीं लोंबकळलेले, पण आतां एकंदरींत वाळून पान-पाचोळा झालेले आणि न काढल्यामुळें वाळक्या शिराळ्यांचीं झुंबरें जागोजागीं डोलत असलेलीं आपणांस मध्येंच दिसतात.

वेगवेगळ्या फांद्यांवर कावळे निरनिराळ्या रीतींनीं विश्रांति घेत असलेले आढळून येतात. नवथर, शेजारींच दोन वर्षांपूर्वीं बांधलेल्या डौलदार इमारतीचीं मंगलोरी कौलें दृष्टीला किंचित् दिपवितील, अशा बेतानें चकचकत असतात. पावसाळ्यांत पाण्यानें शेवाळ बाजलेलीं काळीं कौलेंही या वेळीं सूर्यकिरणांच्या पांढऱ्या सफेदीनें माखल्यामुळें आपल्या दृष्टीला नेहमींपेक्षां ठळक वाटतच असतात. मधेंच एकाद्या कावळ्यानें काऽव काऽव असा स्वस्थपणाचा सूर काढावा आणि ठिकठिकाणच्या झाडांवर तितक्याच स्वस्थपणानें विश्रांतीदाखल बसलेल्या कावळ्यांनीं रात्रीच्या गस्तवाल्या पोलिसाप्रमाणें एकमेकांस साद द्यावी असें मोठें पद्धतशीर घडून येत असतें. थोड्याच अंतरावर कोठें तरी न दिसेल अशा बेतानें, जणूं कांहीं शांततेचा भंग करण्याकरितां अगर आपल्या कानठळ्याच बसविण्याकरितां कीं काय, एकादी खार वरच्या कर्कश सुरांत किंचाळत असते व तिचें तें ठ्यँ ठ्यँ आपल्याला एक प्रकारचा आनंदमय त्रास देत असतें. किंवा दुसऱ्या बाजूस किंचित् दूर उगवलेल्या विस्तीर्ण पिंपळावर जागजागीं वटवाघळें उलटीं एका अगर दोन पायांवर लोंबकळत असलेलीं, मधेंच एकादा पंख मंद आवाज होईल इतक्या बेतानें फडफडावीत असतात. ऐन दुपारीं चमचमणाऱ्या निळ्याभोर अस्मानांत दोन्ही पंख ताठ ठेवून वायुलहरींवर अगदीं स्थिर होऊन तरंगत रहाणाऱ्या व तेथूनच एकाग्र दृष्टीनें भक्ष्याचा वेध घेत असणाऱ्या घारीचा कर्कश भिरभिरणारा आवाज व या वटवाघळांचा कोलाहल यांतील साम्य त्या वेळीं एकसमयावच्छेदेंकरून प्रतीत होत असतें.

नुसतीं हींच नव्हेत, यासारखींच किती तरी दृश्यें त्या एकाच जागेवरून आपण शांत चित्तानें पाहूं शकतों असतों. मग मधेंच वाऱ्याची एकादी झुळूक शेजारच्या झाडांना थोडें हलवून आपल्या अंगावर गोड रोमांच उभे करून पलीकडे जाते.

ज्याप्रमाणें मधमाश्यांनीं या फुलावरून त्या फुलावर या क्रमानें रोज शेंकडों फुलांवर बसावें आणि सहसा न दिसणाऱ्या त्यांच्या हळुवार हातांनीं अनंत प्रकारचा मध गोळा करावा, त्याप्रमाणें वायूनेंही शेंकडों प्रकारच्या फुलांतील दरवळ लुटून आणलेली असते आणि कुठल्या तरी स्वर्गीय ठिकाणीं ती सगळी दरवळ आपल्या तरंगहस्तांनीं नेऊन कोंडून ठेवण्याचा त्याचा इरादा असतो. पण तिच्यांत आपलाही कांहीं हविर्भाग असतोच.

आणि मग तीच लिपी, पण फळा पुसून निरनिराळ्या क्रमानें वापरून कांहीं विशिष्ट अर्थ निघेल अशा बेतानें मास्तरांनीं मांडावी आणि मुलांनीं ती नवी अर्थप्रतीति ध्यानांत घेऊन किंचित् हास्य-मुद्रेनें पेन्सिल सरसावून टिपून घ्यावी, तसें आपल्या बाबतींत होऊं लागतें.

वाऱ्यानें हेलावलेलीं पूर्वींचींच झाडें, ते पूर्वींचेच पक्षी, पण एक झुळूक येऊन जणूं कांहीं तींतला शिळा आनंद आपल्या-बरोबर घेऊन जाते व नवा आनंद तेथें पसरवून जाते. वाऱ्याची एक झुळूक वरून गेली, झाडें हललीं व नंतर पुन्हा स्थिर झालीं कीं, तींच निराळ्या तऱ्हेनें जास्त सुंदर दिसूं लागतात. जादुगारानें एक फुंकर मारून मातीचें सोनें करावें, अगदीं तसाच चमत्कार येथें घडतो. जणूं कांहीं वाऱ्याची झुळूक म्हणजे परमे-श्वररूपी जादुगाराची मारलेली फुंकर.

शिवाय आणखी एक मौज आपणांस या वेळीं अनुभवतां येत असते. दुपार म्हणजे सूर्य असलेली मध्यरात्र होय. मध्यरात्रीं जसे मनुष्यप्राण्यांचे व इतरही प्राण्यांचे सर्व व्यवहार थांबून ते स्वस्थपणें विश्रांति घेत असतात, तशीच ही पण सर्वांच्या विश्रांतीचीच वेळ असल्यामुळें आपणांस मध्यरात्रीच्या शांततेचा अनुभव भर दिवसा अनुभवावयास मिळतो. मध्यरात्रीची शांतता एकंदरींत भीषणच. ती शांतता मोडलीच तर एखाद्या चवताळलेल्या वाघाच्या गर्जनेच्या पडसादानें अगर अशुभ घुबडाच्या घूत्कारानें किंवा एकाद्या कालसर्पाच्या सरसरण्यानें. पण दुपारची शांतता मधेंच मोडण्याचें काम एखादी चिटुकली चपळ खार करील तितकीच.

म्हणजे माझ्या दृष्टीनें दुपार मध्यरात्रीपेक्षां किती तरी श्रेष्ठ होय. एकामागें एक, आसपासचीं दृश्यें एकाच जागेवरून पाहतां पाहतां आपण अर्धवटच तास दीड तास झोंपावें व नंतर उठून चूळ भरून शानदार चहा आवडत्या माणसांशीं मनमुराद पण बेतवार हंसत मोकळेपणानें घ्यावा व नंतर टेनिसची रॅकेट उचलून आपल्या, एकंदरींत बेताचे सभासद असलेल्या व म्हणून मनसोक्त खेळतां येईल अशा क्लबमध्यें जावें, हा दुपारचा कार्यक्रम मला सर्वांत बरा वाटतो.

जगांत एकंदरींत सगळीकडे जीवनकलह चाललेलाच आहे. त्यांत आपण आपल्या शक्त्यनुसार भाग घेतोंच आहोंत; त्यांत घस सोसणें आणि नफा लाभणें क्रमाक्रमानें घडतच आहे. त्या सगळ्या बऱ्यावाइटाचा विचार दुपारच्या या संथ वेळीं पूर्णपणें दूर ठेवून शक्य तितकें विकारातीत राहण्याचा प्रयत्न केला, तर प्रत्येकास असेंच वाटेल कीं सकाळ आणि संध्याकाळ याप्रमाणेंच

दुपारसुद्धां आनंदोत्पादक व म्हणून रमणीय आहे. कवींनीं आणि लेखकांनीं म्हटलें नसलें, तरी दुपार ही तितकीच काव्यपूर्ण आहे. सकाळ आणि संध्याकाळप्रमाणेंच दुपारींसुद्धां कोणत्या तरी अज्ञात ठिकाणीं शांति आणि उल्हास यांचे सूर रुणझुणत आणि झंकारत आहेत.

# ग्रंथकार आणि रसिकता

याच महिन्यांतील गोष्ट. सह्याद्रीचा ताजा अंक मी वाचीत होतों. त्यांतील 'राहिलेले शब्द' ही गोष्ट माझ्या वाचनांत आली. मीं पुष्कळच लोकांना ती गोष्ट वाचण्याची शिफारस केली आणि अशी गोष्ट लिहिल्याबद्दल य. गो. जोशांची मनांतून अनेकवार तारीफ केली. कोणत्याशा एका प्रोफेसरमजकुरांनीं जोशांच्या 'शेवग्याच्या शेंगांना' जगांतल्या उत्कृष्ट लघुकथांत स्थान दिलें आहे. ती गोष्ट मीं पण अनेकवेळां वाचून तिची चव चाखली आहे. गोष्ट चांगली खरी, पण ती हिच्यापुढें रद्द आहे, असें माझें मत स्पष्टपणें अनेकांस त्या वेळीं मीं बजावलें.

अर्थात् हें मत बजावतांना मीं एक मुद्दा लक्षांत घेतला होता. जगांतल्या अधिकांत अधिक लोकांस जसे अगर जे अनुभव येतात, त्या अनुभवांवर अलौकिक प्रतिभेच्या जोरावर जें नवलाईनें आणि रमणीयतेनें तन्मय होऊन लिहिलें जाईल, तेंच चिरंजीव ठरावयाचें; तेंच जागतिक वाङ्मयाच्या श्रेष्ठ दर्जाप्रत पोंहोचावयाचें व तेंच उत्कृष्ट, अशी तारीफ बरेच लोक करीत असावयाचे. या दृष्टीनें आयुष्यांतील अनेक आणि अनेकवार प्रत्ययास येणाऱ्या अनुभूतींचें सार शेवग्याच्या शेंगांत भरपूर सांठविलेलें नसून तें 'राहिलेल्या शब्दांतच' सांठविलेलें दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं. अर्थात् 'शेवग्याच्या शेंगा' बेचव आहेत, असें मला मुळींच म्हणावयाचें नाहीं.

पण माझें हें विधान माझ्या एका मित्राला पटलें नाहीं. त्यानें मला सरळ म्हटलें, 'नाना, तुम्ही म्हणतां तें खरें. गोष्ट चांगली आहे. पण एवढें 'एरूका' (Erukka) म्हणून आर्किमिडीज-सारखें बेहोष धांवण्यासारखें त्यांत काय आहे?' मी जरा खिजलों आणि स्वस्थ बसलों. वाङ्मयीन रसोत्कर्ष मीं त्यांस कसा दाखवावयाचा! त्यांना अरसिक म्हणण्यास माझें मन धजेना; कारण त्यांच्या अभिजात रसिकतेचा प्रत्यय मी अनेकवार घेऊन चुकलों आहें. मी स्वतःच अरसिक असल्याची निर्दय जाणीव माझ्याही मनाला नाहींच. मग 'भ्रमन् वनान्ते नवमंजिरीषु। न षट्पदो गन्धफलीमजिघ्रत्। सा किं न रम्या स च किं न रन्ता। बलीयसी केवलमीश्वरेच्छा।' असें मनाशीं कुरकुरत स्वस्थ बसण्याशिवाय इलाज उरला नाहीं.

पण मन तशा स्थितींत स्वस्थ बसूं देण्यास मुळींच तयार नव्हतें. सारखा विचार येई, 'माझ्या दृष्टीनें जें उत्कृष्ट, माझ्या दृष्टीनें जागतिक अभिजात वाङ्मयांत जें मोडावयाचें, तें इतर श्रेष्ठ रसिकांस दुय्यम प्रतीचें कां वाटावें? मग सगळयांच्या मनास एकजात पटून एकमतानें एकादें पुस्तक श्रेष्ठतम ठरणें शक्य नाहीं काय? कालिदास हा संस्कृत साहित्यक्षेत्रांतला मेरुमणि. त्याचा जगाच्या दृष्टीनें कोणता ग्रंथ उत्कृष्ट तर मग? शाकुन्तलच काय? होय. गटेसारखा जर्मन कवि लेखक तें डोक्यावर घेऊन नाचला नाहीं का!' पण लगेच मन म्हणूं लागलें, 'कमींत कमी पंचवीस श्रेष्ठतम टीकाकार मेघदूतासच श्रेष्ठ मानतात तें कसें?' माझ्या मनांत या विचारांचा जो चक्रव्यूह निर्माण झाला, त्यांतून सहीसलामत सुटतां येणें अशक्य झालें.

एकंदर सगळ्याच श्रेष्ठ दर्जाच्या वाङ्मयाबद्दल मी म्हणतों अशा प्रकारची स्थिति आहे. एकाला War and Peace हा टॉलस्टॉयचा Master piece वाटतो, तर दुसऱ्यास रेझरेक्शन पटतें. कोणाची Prodigal Son वर भक्ति तर कोणी Master of Man ला कवटाळतो. भिन्नरुचिर्हि लोकः हेंच अखेर खरें. वाङ्मयांतील सर्वश्रेष्ठ एकमेव अलंकार कोणता, हें म्हणूनच जगाच्या अंतापर्यंत नक्की ठरावयाचें नाहीं. आणि अमुकच सर्वोत्कृष्ट असें कोणीही कंठरवानें, तारस्वरानें म्हटलें, तरी तें खऱ्या रसिकाला ऐकूं जावयाचें नाहीं.

रसिक मनुष्य आपल्या अनुभूतीच्या निकपावर आपल्या वाचनांत आलेल्या ग्रंथांचा कस अजमावीत असतो. हा कस अजमावीत असतांना ग्रंथांतील जितक्या गोष्टी त्याच्या अनुभूतीस पटतात, तितक्याच सगळ्या मात्र त्याच्या अंतःकरणांत वाङ्मयीन आनंद निर्माण करूं शकतात. अशा पटणाऱ्या गोष्टी ज्या ग्रंथांत जास्त, तो त्याच्या दृष्टीनें उत्कृष्ट ठरतो व इतर ग्रंथ त्यापुढें फिके वाटतात.

पण ही अनुभूति अगर अनुभवाचा निकष हा कधींच स्थगित असूं शकत नाहीं. त्याची सारखीच प्रगति होत असल्यामुळें आज अनुभूतीस पटलेला व श्रेष्ठ वाटलेला ग्रंथ उद्यां श्रेष्ठ वाटेलच असें पैज लावून सांगतां येत नाहीं. उलट पैज लावून असेंच सांगतां येईल कीं, आज श्रेष्ठ वाटत असलेला ग्रन्थ उद्यां किंचित् हिणकस वाटेल म्हणून ! एका विशिष्ट वयांत रासेलस अगर अरेबिअन नाइट्सची गोडी अलौकिक वाटून आपण मिटक्या मारतों व दुसऱ्या काळांत त्याकडे ढुंकूनही पाहत नाहीं याचासुद्धां अर्थ हाच.

एकाच माणसाच्या दोन वेळच्या मतांत जर असें प्रांजल दुमत व्हावयाचा जबरदस्त संभव संभवतो, तर दोन सर्वतोपरी भिन्न वा किंचित् भिन्न रसिक व्यक्तींत एका बाबतींत एकमत होईलच असें कसें सांगतां येईल? अर्थात् दोन व्यक्तींत असें द्विधामत झालें तर तो व्यक्तिमात्राचा अगर रसिकतेचा दोष नव्हे.

पण कोणता ग्रंथ सर्वोत्कृष्ट हें जरी ठरवतां आलें नाहीं, तरी कोणता उत्कृष्ट हें ठरवीत असतांनाही दुमत होण्याचा प्रसंग आला, तर तें कुचिन्ह होय. प्रत्येक रसिकाची ग्रंथाबाबतची कसोटी सामान्यत: एक असावयास पाहिजे आणि ती बहुधा असतेच. म्हणूनच एकाद्यानें उत्कृष्ट ठरवलेला ग्रंथ मी निकृष्ट ठरवीत नाहीं— माझ्या दृष्टीनें निकृष्ट ठरत नाहीं.

आपण जेव्हां एकादा ग्रंथ वाचतों, तेव्हां आपलें वाचनाचें कार्यच फक्त चालतें असें नाहीं. आपल्या अनुभूति व लेखकाच्या ग्रंथबद्ध अनुभूति या दोहोंचा संगम होत असतो व एक प्रकारची संगीति निर्माण होत असते. ही संगीति निर्माण करण्यास आपण व लेखक असे दोघेही कारणीभूत होत असतों. आपलें समरस होण्याचें कार्यही, या संगीतींत ग्रंथाइतकेंच महत्त्वाचें आहे. समजा, लेखकानें आपल्या ग्रंथांत आपल्या मतांचा व अनुभूतींचा पूर्ण पसारा मांडला आहे, पण त्यानें आपणांस तद्रूप होण्यास व आपल्या सुप्त अनुभूति त्यांत विरवण्यास अवसर ठेवलेला नाहीं; आपणांस त्याचें लेखन कंटाळवाणें व रूक्ष चऱ्हाट वाटेल. आपल्या अनुभूतींच्या सहाय्यानें लेखकानें एक चित्र वाचकाच्या मनांत निर्माण करावयाचें असतें पण तें वाचकाच्या अनुभूतींस पूर्ण जागा ठेवून. ज्या ग्रंथांत अशा तऱ्हेनें लेखकानें वाचकास समरस होण्यास जागा ठेवली

असेल, तोच ग्रंथ म्हणून, वाचकास उत्कृष्ट वाटूं लागतो. अर्थात् वाचकास समरस होतां यावें, आपल्या अनुभूतींचा अभिनव उपयोग करतां यावा व आपल्या कल्पकतेला वाव देतां यावा, म्हणून ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत एक प्रकारची अपूर्णता ठेवावयास हवी. आणि ज्या ग्रंथांत अशी गर्भीभूत अपूर्णता अगदीं योग्य प्रमाणांत माझ्या मनास आणि भावनांस आढळेल, तोच माझ्या दृष्टीनें सर्वोत्कृष्ट ग्रंथ होय.

अर्थात् अशी गर्भीभूत योग्य प्रमाणांतली ह्य अपूर्णता मला 'राहिलेल्या शब्दांत' सांपडली, म्हणून मला ती सर्वोत्कृष्ट वाटते. माझ्या मित्रास ती तशी वाटली नाहीं, हा अर्थात् त्याचा दोष नव्हे.

# गायन

गाण्यानें श्रम वाटतात हलके हेंही नसे थोडकें

— केशवसुत

स्वतःला स्वतंत्र विचारांचा म्हणून समजणारा मनुष्यही बऱ्हंशीं परंपरागत विचार न कळत, आपले व स्वतंत्र म्हणून सांगतांना अनेकदां दृष्टीस पडतो. अर्थात् याबद्दल मी तरी अशा मनुष्यास कमी प्रतीचा लेखणार नाहीं; कारण हें त्याचें एक-प्रकारें अज्ञान आहे व अज्ञान हा दोष नव्हे.

पुष्कळ लोकांच्या गायनाच्या बाबतींतल्या कल्पना व त्यांचे विचार असेच शिळे व बुरसलेले असतात; पण ते त्यांस नवीन व स्वतंत्र वाटत असतात व त्याबद्दल ते केव्हांही दोषास्पद नाहींत; कारण ज्ञानाची कितीही वाढ झाली, तरी अज्ञानाचाच वरचष्मा राहणार व संपूर्ण अज्ञानाचा अन्त जगाच्याही अंता-पर्यंत व्हावयाचा नाहीं. शिवाय अज्ञान हें परमेश्वराप्रमाणें अनंत रूपधारी आहे. त्याचें एक रूप मालवलें, तर तें लागलीच नव्या रूपांत प्रकट होऊन प्रकाशूं लागतें.

गवयांची ठरीव गायनपद्धति, त्यांचे आरोह-अवरोह व त्यांचे ताल आणि मन्द्रादि स्वर यांबद्दल ज्यांस थोडें फार कळतें ते लोक गायनशास्त्राची अतिशय तारीफ करतांना दृष्टीस पडतात व त्या बाबतींतले आपले विचार पूर्ण स्वतंत्र असल्याबद्दलची मिजास मारीत असतात. पण बारीक विचार करून पाहिलें, तर

ते एका ठराविक वादाचाच पूर्वपक्ष निराळ्या शब्दांत करीत आहेत, हेंच मार्मिकांस दिसून आल्याशिवाय राहत नाहीं.

आणि यांतल्या दुसऱ्या पक्षाचा मी पूर्वपक्ष करीत आहें. याचें कारण असें कीं, मला गवयांचें शास्त्रोक्त गायन पटत नाहीं; तें माझ्या अन्तःकरणांतील भावनांच्या तारा छेडीत नाहीं. कोणत्याही एकाद्या कलेच्या तंत्राकडे लक्ष पुरवून तदनुसार वागण्याचा उपक्रम चालू केला, म्हणजे आपण त्यांतली कला तेवढीच वेचून बाजूस टाकतों व त्यांत चुकून प्रकट झालेल्या शास्त्राचे धडे गिरवूं लागतों. हीच स्थिति अर्थात् सर्व गवय्यांची व बजवय्यांची झालेली असते. ते त्यांतील कलेचें अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत असतांना चंचल कला अकस्मात् अदृश्य होते. गवय्याचें गाणें माझ्या दृष्टीनें, म्हणून अतिशय नीरस व अनेकदां कंटाळवाणें होतें. नेहमीं मात्र नव्हे.

आणि तें कंटाळवाणें होण्यास जर मुख्य कांहीं कारणीभूत होत असेल, तर तें त्यांतील शास्त्र होय. शास्त्र म्हटलें, कीं त्यांत परिश्रमांचा परिपाक आलाच. ठरीव स्वर आणि ताना बसवतां बसवतां गवय्यांनीं एवढे परिश्रम घेतलेले असतात कीं, त्यापलीकडे त्यांच्या कंठांतून दुसरें कांहीं बाहेरच पडूं शकत नाहीं.

किंवा गवय्यांच्या गाण्याला तलावाची उपमा देतां येईल. तलावांत एका ठरीव मर्यादेपर्यंत पाणी सारखें सांठत येतें. त्याच्या कांठांवर बांधलेल्या दगडी धक्क्यावर बसून पाय लोंबकळत सोडून स्वस्थ बसतां येतें व त्याच्यांत क्षणभर मधेंच उसळणारी लाट पाहून आपलें मन रमतें; पण पुढें काय ? त्याच्या उथळतेची आपणांस कल्पना असते; शिवाय तें पाणी साठवणीचें आहे,

त्याला जिवंतता नाहीं, हेंही आपल्या ध्यानांत असतें. गवय्या-च्या गायनांतही अशाच मर्यादा भासमान होतात व त्यांची परिसीमा अमक्या ठिकाणीं होणार, हें पहिल्याच आ ऽऽ ऊ ऽऽ वरून ध्यानांत यावयास फारसा वेळ लागत नाहीं.

अर्थात् यांत गवय्याचा दोष नाहीं. शास्त्रांत मनुष्यानें कितीही प्रगति करून घेतली, तरी त्या ज्ञानाला, त्याच्या ग्राहकतेला व खुद्द शास्त्रालाही सदाच अपूर्णतेच्या मर्यादा असतात. पण कला ही केव्हां, कोठें व किती प्रमाणांत प्रकट होईल, हें सांगतां येणार नाहीं. ती नेहमींच सजीव व अमर्याद असल्यामुळें, तिचें मनो-हारित्व मेलेलें असूंच शकत नाहीं.

म्हणजे संगीताच्या लकेरी छेडणारे आणि उल्हसित होऊन मुक्तकंठ, लहरीनुसार ताना छेडणारे स्वच्छन्दी चंडोल मी जास्त कलोपासक समजतों. त्यांच्या गायनांत, त्यांस पटेल इतक्याच प्रमाणांत, म्हणजे स्वतःची म्हणण्याची विशिष्ट धाटणी कायम ठेवून दुसऱ्यांची सुरेलता अगर सारखवट मिसळलेली असते. त्यामुळें आपण एकाच वेळीं एकाद्या श्रेष्ठ गायकाच्या कंठांतील सूर व नवीन गायकाच्या स्वतंत्र लहरी अशा दोन गानसमुच्चयांचा आस्वाद सानन्द घेत असतों. पुष्कळदां अशी अनाहूत आणि जमून आलेली बैठक रंगली आणि गायकास कंठांतील स्वर प्रसन्न झाले असले, तर सूरसागराच्या लाटा जिवाला किती निववीत आणि आराम देत असतील, हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. अशा बैठकीला मग खरोखरच बेहद्द रंग भरत असतो. अशा बैठकीचें विशेष असें कीं, "भर्जी खाल्ल्यामुळें माझा गळा बसला अगर आम्बला आहे; तंबोरा किंवा दिलरुबा नसल्यामुळें आज दिल

लागत नाहीं, नामू बजवय्या नसल्यामुळें घोडें आडलें आहे,—" इत्यादि सबबी ऐकून श्रोत्यांचा विरस झालेला नसतो. आपण बैठकीचें गाणें ऐकणार ही कल्पनाच श्रोत्यांच्या मनाला नसते व ती नसणें, असण्यापेक्षां उत्तम होय. शिवाय या बैठकींत वाद्यांचा आणि वादनपटूंचा बडेजाव नसतो. गायनाच्या शास्त्रासंबंधीं म्हणत नाहीं, पण गायनकलेच्या बाबतींत ही स्पृहणीय गोष्ट होय. जीं बेतास बात वाद्यें असतील, तितक्याच तुटपुंज्या वाद्यांवर काम भागवणें व तेंही नवशिक्यानें अगर अर्धशिक्यानें करणें हेंही त्या गायनाला पोषक होत असतें. अशा वेळीं गायक व वादक आपापला अभिमान बाजूस ठेवून क्षणभर अगदीं निरभिमानतया एकमेकांस शक्य तितकें सांभाळून घेत असतात. अशा तऱ्हेनें साम्भाळून घेणें ही गोष्ट एकंदरींत इतकी कलापोषक होते कीं, खरा कलाप्रेमी श्रोता एकाचित्त होऊन रंगला नाहीं, असें क्वचितच होतें.

आणि समजा कीं वाद्यें नाहींत—पण वाद्यें नाहींत म्हणून कांहीं अडत नाहीं. कोणी तरी कशावर तरी ठेका धरतो, समेच्या वेळीं "वा !" असा मान हलवून उत्साहानें हुंकार देतो व सगळ्या श्रोत्यांच्या माना एकसाथ हलतात आणि बहार उडते.

अशा बैठकी म्हणजे वळवाचा पाऊस. ऊन पडलेंच आहे, उष्मा शिजवीतच आहे, अशा स्थितींत एकदम सडसडत यायचें, रस्ते, झाडें, घरें बेतवार शिंपून भिजवायचीं, जमिनींतून मातीच्या वासाचे वाफारे आणि फवारे येतील असें करावयाचें आणि आल्या धांदलीनेंच पुढें पळत सुटायचें, अगदीं अशी स्थिति या गायनाची होते. अशा वेळीं गायकाच्या गळ्यांतून एकदम लकेरी बाहेर येऊं लागतात; वादकाचा हात वाद्यावर हळुवार

फिरूं लागतो; श्रोते एकदम शांतचित्त होतात. कांहीं वेळानें ती गायकाची लहर हळूहळू ओसरते; वादकाचे वाद्यांतले सूर मंद होतात व श्रोत्यांचें चित्त बाह्योपाधींकडे वळतें.

असल्या बैठकींची काळ-वेळ अगोदर ठरत नाहीं व ती तासन् तास चालत नाहीं. नव्हे, ती किती लवकर संपेल याचाही पुष्कळदां नेम नसतो. चार-पांच पदें म्हणजे हद्द झाली, सहा म्हणजे अगदीं डोक्यावरून पाणी गेलें! मागें एकदां मीं कुठेंसें वाचलें होतें, कीं स्पेनचा पांचवा फिलिप आणि इंग्लंडचा तिसरा जॉर्ज यांना उदासीनतेचा असाध्य रोग होऊन त्यांस वेडाच्या लहरी येऊं लागल्या होत्या. या लहरींवर आणि रोगावर ( Melancholia ) गायन हा एकच रामबाण उपाय ठरला. हें गुणकारी आणि रोगनाशक गायन जर कोणतें असेल, तर माझ्या दृष्टीनें असलें कलात्मक गायनच होय.

आणि शास्त्रोक्त गायन म्हटलें, म्हणजे त्यांत तंबोरा पाहिजेच आणि पेटी व तबला यांची साथ हवीच. तबला, पेटी व तंबोरा यांच्या सुरांतून श्रोत्यांनीं गायकाच्या सुराची परीक्षा करावयाची आणि त्याची शास्त्रांतली प्रगति ठरवावयाची! त्यांतच पुन्हा तबलेवाल्याच्या व गायकाच्या झुकांड्या, तें समेवर येणें, तानांबरोबर कलाटणी देणें, मुखडा लावणें, माना डोलवणें इत्यादि इत्यादि आहेच! इतक्या सगळ्यांत सदरहू तबलाशास्त्री आणि गायनशास्त्री यांचें पटलें तर बरें; नाहीं तर आटोपलाच कारभार! शिवाय गवयाचा आवाज लागणें हीही एक चीज आहेच त्यांत. आवाज न लागला म्हणजे मग गायनकलेचे जे धिंडवडे उडतात, ते पाहवत नाहींत अगदीं!

आगगाडीनें खडाड् खडाड् असा चाकांचा आवाज करीत करीत डोंगराच्या चढणीवर चढत असावें, त्याच वेळीं आसमंतात्‌भागच्या डोंगरकडयांवरचें पाझरणारें पाणी तुषारांचे योगानें अंगावर उडाल्यामुळें आपण सानंद आणि रोमांचित व्हावें, असाच कांहींसा प्रकार आपण अनाहूत संगीत एकाग्र चित्तानें ऐकत असतांना होत असतो. उलट, शास्त्रीय संगीत म्हणजे आगगाडीचें बोगद्यांतून जाणें. त्या वेळीं देखावा तर नव्हेच, पण धूर मात्र डोळ्यांत आणि नाकांत भरावयाचा आणि अंधारानें आपणांला दृष्टिभ्रम व्हावयाचा. म्हणूनच मी म्हणतों कीं, गायनाच्या बैठकीपेक्षां अशा तऱ्हेचें अनाहूत संगीत श्रेष्ठ प्रतीचें होय. त्यांतच कला प्रकट होते व तीच आनंदाचे पूर वाहवूं शकते.

# वाचन

लहानपणचें कांहीं सांगतां येणार नाहीं पण अलीकडचें म्हणजे कॉलेजमध्यें असतांचें मात्र नक्की सांगतां येईल. त्या वेळीं मीं बहुश: दोनच गोष्टी प्रामुख्यानें केल्या. खूप वाचन आणि खूप खेळणें. खूप खेळण्याचा परिणाम असा झाला कीं, मीं क्रिकेट, फूटबॉल, टेनिस व व्हॉलीबॉल यांत बरेंच प्राविण्य मिळविलें आणि कांहीं काल क्रीडाप्रिय लोकांच्या कौतुकपूर्ण चर्चेचा विषय झालों. आणि वाचनामुळें ........ पण त्या वाचनाचे परिणाम इतक्यांतच समजून यावयाचे नाहींत. कांहीं कांहीं गोष्टींचा परिणाम ठळकपणें दिसूं लागण्यास बराच कालावधि जावा लागत असतो. उदाहरणार्थ, आपल्या पौर्वात्य वैद्यचिन्तामणींच्या मात्रा, रसायनें आणि गुटिका. त्यांचा गुण उशिरां यावयाचा व चिरकाल टिकावयाचा. अर्थात् गडकऱ्यांनीं एकच प्याल्यांत असलीं विधानें ज्या अर्थानें उपयोजिलीं आहेत, त्या अर्थीं मात्र माझें हें म्हणणें नाहीं; यांतला वाच्यार्थ फक्त घ्यावयाचा.

वाचनाचेंही तसेंच आहे. मनाची वाचनामुळें होणारी सुसंस्कृतता जरी चिरकालिक असली, तरी ती कमवावयास आणि मुरण्यास फार वेळ लागत असतो. आरंभीं आरंभीं तर वाचलेल्या मजकुरांतील वाच्यार्थ तेवढाच आपले ध्यानांत येत असतो. पण पुढें वाचनाची ही संवय एकदां अंगवळणीं पडली आणि अप्रत्यक्ष-रित्या आपोआप, वाचलेल्या मजकुराबद्दल विचार करण्याची संवय

वाढली, म्हणजे प्रत्येक उत्कृष्ट ग्रंथांत अशब्दरूप– नव्हे शब्दातीत असलेले गूढ विचार आपल्या अन्तर्दृष्टीस दिसूं लागतात. मग आपलें त्या ग्रंथाबद्दलचें वाचन नेहमींच दुहेरी होऊं लागतें. एक चर्मचक्षूंच्या योगानें होणारें वाच्यार्थमय आणि दुसरें अन्तर्दृष्टीमुळें घडणारें ध्वन्यर्थसूचक.

या दुसऱ्या वाचनाचे बाबतींत अनेकदां एक निराळाच प्रकार घडून येतो. आपण पुस्तक मिटून दूर ठेवलें व बाह्यदृष्टि मिटली, कीं अन्तर्दृष्टि उघडते आणि त्या मिटलेल्या पुस्तकांतल्या तेजस्वी विचारचांदण्या मनाच्या क्षितिजावर चमकूं लागतात. मागें एकदां टेनिसनचें 'मॉर्ट ड आर्थर' कीं कोणचेंसें एक खंडकाव्य वाचीत असतांना 'अरोरा बोरिआलिस' म्हणजे काय हें आमच्या प्रोफेसर चतर्जींनीं मोठें काव्यपूर्ण शब्दांत सांगितलें होतें. आपल्या पुराणांतूनही त्याचें वर्णन आहे म्हणतात. म्हणजे आर्य ज्या वेळीं उत्तर ध्रुवाजवळच्या प्रदेशांत वास्तव्य करीत, त्या वेळीं अगदीं मध्यरात्रीसही पंधरावीस मिनिटें टिकणारा एकादा रमणीय प्रकाशाचा झोत सर्वत्र पसरलेला दृष्टीस पडे. किंवा कालिदासानें पण हिमालयाचें वर्णन करीत असतांना तेथें वनस्पतींच्या योगानें वा अन्य कारणानें एकदम आल्हादक लकलकाट कसा होतो याचें वर्णन केलें आहे. या लकलकाटासारखें किंवा उषःप्रकाशासारखें आपल्या अंतर्दृष्टीसमोर होऊं लागतें. मनुष्याच्या मनास ही स्थिति प्राप्त झाली, म्हणजे वाचन त्याच्या अगदीं पचनीं पडूं लागलें आहे म्हणून समजण्यास हरकत नाहीं.

वाचनाच्या बाबतींत मी बराच लहरी आहें. अगोदरच वाटेल ते न वाचण्याची मनाची प्रवृत्ति आणि त्यांत लहर, मग काय

विचारतां ! पण या लहरीपणाबद्दल मला कधींच वाईट वाटत नाहीं. मनुष्यानें आपल्या नैसर्गिक स्वभावावर एकंदरींत वर्षानुवर्षांच्या वागण्याच्या विशिष्ट पद्धतीमुळें एक प्रकारची विचारांत घेण्यासारखी अनैसर्गिकता चढविली आहे आणि याच अनैसर्गिकतेला मानवी संस्कृति आणि तिची उत्क्रान्ति असें आपण मोठें रहस्यपूर्ण नांव देतों. या संस्कृतीच्या प्रभावामुळें मनुष्याच्या मूळच्या लहरीपणावरही बव्हंशीं विरजण पडलें आहे. पण तो अनेकदां डोकावतोच.

म्हणजे मी असें करितों कीं, एक पुस्तक वाचावयास घेतलें म्हणजे स्वतःला खोलींत अगदीं एकांतांत कोंडून घेतों व त्या पुस्तकाचें एक वाचन शक्य तितक्या कमी वेळांत पुरें करतों. हें चालू असतांना एकादी चुकार चिमणी चिवचिवली आणि उघडच्या खिडकीच्या जाळींतून धीटपणानें आणि बेपर्वाईनें आंत येऊन खोलीचे वरचे कोनेकोपरे धुंडूं लागली म्हणजे माझ्या मस्तकांत तिडीक उठते. मग खोलींतल्या खोलींत तिचा पाठलाग केल्याशिवाय आणि तिला पिटाळून हद्दपार केल्याशिवाय मला चैन पडत नाहीं. आणि पुष्कळदां तें पुस्तक अर्धवट टाकून दुसरें कांहीं करावें लागलें तर थोडें वाईट वाटल्यामुळें माझे सर्व व्यवहार मनाच्या गंभीरावस्थेंत अबोल्यानें चालतात. हातानें कृति चालू असते निराळीच, पण मनांत विचार मात्र पुस्तकाचा. अगदीं पुस्तक पुरें होईपर्यंत ही स्थिति.

पण ही स्थिति प्रत्येक पुस्तकाच्या बाबतींत नसते. ज्या पुस्तकांत प्रतिपाद्य विषय एकच एक असेल, त्या पुस्तकाचे बाबतींत अगदीं असें होतें. परंतु लघुकथा अगर लघुनिबंध यांचे

बाबतींत माझीं वाचनाची पद्धत निराळी आहे. साधारणतः अनेक मासिकें नेहमींच वाचनांत येत असल्यामुळें, पुष्कळशा लेखकांचें त्यांतून प्रसिद्ध होणारें थोडथोडें वाङ्मय माझ्या अगोदरच नजरेखालून गेलेलें असतें व पुस्तक हातीं पडल्यावर न वाचलेलें वाचून, मी बाकीचें पूर्वीं आवडलेलें पुन्हा कोणाच्या तरी बरोबर वाचतों. अशा वेळीं मला नुसतें वाचन आवडत नाहीं. त्याबरोबर टीकेचा मालमसाला सुद्धां माझ्या श्रोत्यानें ऐकला पाहिजे अशी माझी त्याच्यावर जबरदस्ती असते.

दुसऱ्यांनीं वाचावयाचें आणि आपण ऐकावयाचें ही स्थिति एकंदरींत माझ्या मनाला मानवत नाहीं. स्वतः मरावें आणि अमृतफळ चाखण्यासाठीं स्वर्गद्वार गांठावें अशी माझी प्रवृत्ति असल्यामुळें वाचनाची तलफ भागविण्याकरितां मला वाचक लागत नाहीं. पण पुष्कळदां वाचन ऐकवण्याची माझी लहर इतकी उन्मत्त होते कीं, मी निःशंक चारचौघां मित्रांच्या कंपूंत जातों आणि सांगतों, "ऐका रे, आतां मी वाचतों. मोठं मजेदार आहे."

त्यांच्या कुचेष्टेला न जुमानतां तेवढें वाचून झालें, म्हणजे मग माझ्या मनाचें समाधान होतें. मग तें त्यांनीं लक्षपूर्वक ऐकलें नसलें, तरी माझें कांहीं बिघडत नाहीं. अशा वेळीं आपल्याच कविता रस्त्यांत उभे राहून वाचून दाखवणाऱ्या 'झेंडूच्या फुला'-वरच्या कवीसारखी माझी स्थिति झाली, तरी मला त्याची पर्वा नसते. मीच मग शान्त चित्तानें म्हणतों. "हं! बोलूं या आतां." आणि मग आमच्या इकडच्या तिकडच्या गप्पा सुरू होतात.

पण कांहीं वेळां दुसऱ्यानें वाचून दाखवावयाचें व मीं ऐकावयाचें ह्या स्थितींतील सुख मीं अनुभविलें आहे. एकदां 'करुणा'

कादंबरीचें भारतगौरव ग्रंथमालेनें प्रसिद्ध केलेलें भाषांतर माझ्या मित्रानें मधून मधून वाचलें व मी तें तन्मयतेनें ऐकत होतों. मग मला राहवलें नाहीं आणि मी सहा तास ती कादंबरी सतत वाचीत बसलों.

सारांश, वाचनाच्या या त्रिविध तऱ्हा मी पसंत करतों. त्यांत थोडी फार आवडनिवड जमल्यास करतों इतकेंच. पण वाचनाच्या माझ्या वेळा मात्र अशा त्रिविध नाहींत; त्या अनंत आहेत. रात्रीं नऊपासून सकाळचे सात वाजेपर्यंत मीं अनेकदां अगदीं उत्साह कायम राहून मानासिक श्रम फारसे न होतां वाचलेलें आहे. संपूर्ण विश्वाचे बाबतींत वसंतकाल रमणीय आणि आल्हादक वाटतो खरा; पण विश्वाची लहर फिरली आणि फिरते ऋतु बद-लून बदलत्या ऋतूंचें अस्तित्व प्रकट होऊं लागलें, म्हणजे हृदया-ल्हादकत्व नष्ट होतें असें थोडेंच आहे! नव्हे– मला तर असें वाटतें कीं, बदलत्या कालानुसार बदलता आल्हाद ब्रह्मांडावर वावरूं लागतो व त्यांत नवें नाविन्य निर्माण होऊं लागतें. अगदीं तसेंच वाचनाच्या बाबतींत म्हणतां येईल. निरनिराळ्या वेळच्या वाचना-मुळें निरनिराळ्या प्रकारचा आनंद आणि निरनिराळ्या प्रकारचे सुखानुभव आणि सविकल्प समाधीचे विविध प्रकार मला अनु-भवावयास मिळतात. म्हणूनच सत्यसृष्टींतली रमणीयता शोधण्या-पेक्षां ग्रंथांतरीची रमणीयता अनुभवण्यासाठीं मी अनेकदां धड-पडत असतों आणि जेव्हां जेव्हां ही उत्कटता वाढते, तेव्हां तेव्हां मी बरा आणि माझीं पुस्तकें बरीं असें मला वाटूं लागतें.

# दृष्ट

त्या दिवशीं मी यशवंताला घेऊन जरा वेळ बाहेर अभ्यंकरांकडे गेलों होतों. संध्याकाळीं घरीं आलों. त्याला खालीं सोडल्यावर तो आपल्या आईजवळ जाऊन रडत बसला. तिला काय वाटलें कोणास ठाऊक! तिनें पटकन् पडग्यांतलें मीठ आणि पंचपाळ्यांतील मोहऱ्या घेऊन त्याची दृष्ट काढावयास सुरुवात केली—— आल्यागेल्याची, भुताखेताची, वगैरे —— मी मोठ्या आनंदित मनानें घरीं परतलों होतों; त्या उल्हसित वृत्तींत गांभीर्याचें थोडेंसें मिश्रण होऊन मी तिला नंतर म्हटलें, 'हें काय, त्याची एकट्याचीचशी दृष्ट काढलीस? माझी पण काढ कीं!'

चुलींत दृष्ट तडतडत होती; तितक्यांत माझें वाक्य ऐकून तिनें एकदम ठसक्यानें पण थोड्याशा गंभीरपणानें मान वेळावून म्हटलें, "इश्श! कांहींच्या बाहीच!" तिच्या या दोनच शब्दांतला मथितार्थ असा कीं, प्रत्येक नवऱ्याचें बोलणें त्याच्या बायकोच्या दृष्टीनें 'मुलखावेगळें' असतें आणि त्याच्या प्रत्येक शब्दांत अकालीं थट्टा गुंफलेली असते.

मीं व्याख्यात्याच्या सुरांत म्हटलें, "मी रोज संध्याकाळीं बाहेरून आल्यावर आई अगदीं नियमानें माझी दृष्ट काढीत असे. तिनें मीं 'दृष्ट काढ' म्हटल्यावर 'इश्श' कधींच म्हटलें नाहीं. तुला मुलाची दृष्ट काढावयाला कांहीं कारण लागत नाहीं अन् त्याच्या बापाची काढायला मात्र 'इश्श' वाटतं!

तिनें नुसते हात ओवाळण्यापूर्वीच मी घरांतून धांदलीनें बाहेर हसत हसत येऊन झोपाळ्यावर बसलों. आईनें दुरून शांत चित्तानें आमचा एवढाच थट्टाविनोद नातवाला घेतां घेतां ऐकला होता.

लहान मुलांच्या बाबतींत आयाबायांचे आरंभीं आरंभीं तरी फार नियम, उपनियम असतात. पहिल्या एक दोन मुलांच्या बाबतींत तर हे उपनियमही अमर्याद असतात. आणि वर लिहिलेंच आहे कीं, माझी आई लहानपणीं रोज दृष्ट काढीत असे म्हणून. आणि त्या वेळीं मी म्हणजे काय ध्यान होतों नुसता ! माझीच दृष्ट पडावयाची इतरांना !

आपल्या दृष्टीनें जें मोलाचें असेल त्याला जपणें ही नैसर्गिक मानवी बुद्धि होय. विशेषतः ही दृष्टि स्त्रियांत जास्त असते. पण यांतही आणखी एक विशेष आढळतें. मनुष्य एकादी मौल्यवान वस्तु तिजोरींत जाम बंद करून मग पूर्ण निर्धास्त तरी होतो; पण बायकांचें तसें नाहीं. त्या शक्य तितकी सुरक्षितता यावी म्हणून कड्या-कुलुपांचा उपयोग तर करतीलच ; पण आणखी वर सुरक्षिततेची काळजी पण बाळगतील ! त्यांना चैन म्हणून पडावयाचें नाहीं. त्यांची हीच प्रवृत्ति लहान लेंकराबद्दल तीव्र प्रमाणांत असते. अगोदर त्या लहान मुलास संध्याकाळीं बाहेर फारसें राहूंच देणार नाहींत. नेलेंच तर, “फार दूर न्यायचं नाहीं हं त्याला !” म्हणून प्रेमळ आज्ञा करतील! मग मुलाचा बाप पण मान डोलवतो आणि ही आज्ञा मुकाट्यानें पाळतो. पुष्कळ बायकांची कुरकूर असते कीं, यजमान आपलें ऐकत नाहींत. अगदीं खोटें आहे सारें !

दृष्ट काढण्यांत बायकांच्या स्वभावांतला भोळा भाव प्रकट होत असतो आणि भोळा भाव ही अंत:करणांतील केवढी थोरली स्वर्गीय संपत्ति आहे ! या भावनेंत दुसऱ्याचें कोणत्याही तऱ्हेनें नुकसान करण्याची इच्छा नसते व या भावनेनुसार वागलें तर फारसा मूर्खपणाचा आरोपही बायकांवर कोणी करीत नाहीं. अपत्यप्रेम ही गोष्टच मुळीं कौतुकास्पद होय; मग ती या रूपानें प्रगट झाली, म्हणून तिच्यांतलें कौतुक नाहींसें झालें आहे असें कोण म्हणेल ?

पण या लहानशा गोष्टीचा आणखी एक मोठा फायदा असतो. दृष्ट काढली कीं, 'इडापिडा टळते' अशी बायकांची अंधश्रद्धा असते. तेवढें केलें कीं, त्यांची अंत:करणांतली हुरहुर थांबते व त्यांचें मन अगदीं शांत होतें. आणि इतक्या अल्पस्वल्प उपायानें जर मनास शांतता लाभूं शकत असेल आणि एकंदर गृहसाम्राज्यांत शांततेचें वातावरण निर्माण होत असेल, तर दृष्ट काढण्याची रीत प्रत्येक घरांत सुरू होणें माझ्या दृष्टीनें इष्टच आहे. मानवजाति निर्भेळ सुख ज्या योगें अनुभवूं शकेल, अशी स्थिति मनुष्यास प्राप्त करून देणें हें एक शिक्षणाचें अंतिम ध्येय आपण मानतों. अर्थात् तर्कमार्गापलीकडील प्रत्येक भावना त्याज्य समजून नष्ट केल्याच पाहिजेत असें म्हणणें अवास्तव होय. इतकेंच नव्हे, तर अशा सुख-संवेदना निर्माण करणाऱ्या भावनांची जोपासना करणें हेंही शिक्षणाचें उद्दिष्ट असावयास पाहिजे.

शिवाय दृष्ट काढण्यांत मोहिनी विद्येचें थोडेंसें बीज आपणांस सांपडतें. 'तुझें कल्याण होवो' असा गंभीर आणि गंभीर शब्दांत आशीर्वाद देण्यानें जो परिणाम मुलाच्या भावनामय मनावर

होईल, तोच परिणाम निराळ्या प्रकारें लहान मुलाच्या मनावर व्हावा, अशी, दृष्ट काढण्यांत, आईच्या भोळ्या मनाची इच्छा असते. आणि हा इष्ट परिणाम दर वेळीं नव्हे, क्वचित् का होईना साधत असलाच पाहिजे अशी माझीही भोळी भावना असल्या-मुळें, दृष्ट काढण्याची पद्धति खरोखरच चांगली आहे, असेंच मीही पण म्हणेन !

---

# निरुत्साह व निष्क्रियता

मनुष्याची शरीरप्रकृति कितीही निर्दोष व उत्कृष्ट असो, तो कितीही उद्यमशील व दैववान म्हणून जगाच्या व स्वतःच्याही दृष्टीनें सुखी असो, पण त्याच्या बाबतींत कमी अधिक उशिरां का होईना, असा दिवस अनेकदां मधून मधून उगवतोच कीं, त्या दिवशीं तो पूर्णपणें निरुत्साही झालेला असेल. सकारण असो अगर अकारण असो, त्याला कसलेंच काम करण्यास तरतरी वाटत नाहीं व निव्वळ आळसांत स्वस्थ पडून राहवेंसें वाटतें. पण अशा तऱ्हेनें स्वस्थ पडून राहण्यांत बाह्यतः तो स्वस्थ दिसला तरी एकंदरींत आंतून त्याचें अंतःकरण व शरीर पूर्ण अस्वस्थ झालेलें असतें.

या अस्वस्थतेचीं कारणें काय असावींत याची मला फारशी मीमांसा करावयाची नाहीं. फार तर या बाबतींत मी एवढेंच म्हणेन कीं, पुष्कळदां सर्व गोष्टी सुरळीत चाललेल्या असतांना व आसपासचें वातावरण नेहमींसारखें उत्साहपूर्ण असतांना मनुष्य कांहीं काल अकस्मात् निरुत्साही व म्हणून निष्क्रिय होतो, असा अनुभव आपणांस येतो खरा. एवढा युरोपच्या नकाशावर निव्वळ स्वतःच्या इच्छाशक्तीच्या, अलोट कर्तृत्वाच्या आणि अमर्याद बुद्धिवैभवाच्या करामतीवर इच्छित फेरबदल तात्काळ घडवून आणणारा नेपोलियन, कामास एकदां सुरुवात झाली म्हणजे ज्याच्या उत्साहाचें आणि अफाट सहनशक्तीचें सर्वांनीं

अचंबा वाटून कौतुक करावें, त्यासही पुष्कळदां अगदीं ऐनवेळीं निष्क्रियतेचे झटके येतच कीं! मनुष्य ऐन उमेदींत असो, भरल्या वैभवांत असो, दैवाची पाखर असलेल्या स्थितींत असो, पण निष्क्रियता व निरुत्साह मधून मधून आपला अंमल त्याजवर एकसमयावच्छेदेंकरून गाजवीत असतातच.

जरा उपमा-अलंकारांच्या भाषेंत सांगावयाचें झालें तर, असें म्हणतां येईल कीं, मनुष्याच्या मनाला प्राप्त झालेली असली स्थिति समुद्राची भरती पूर्ण झाल्यानंतरच्या सम्याप्रमाणें असते. भरतीचें पाणी चढत आणि भरत शक्य तितकें पूर्ण भरलें, म्हणजे ओहोट फिरण्यापूर्वीं तें कांहीं मिनिटें तसेंच ठाम राहतें. वास्तविक इतर वेळीं पाणी उसळण्यास जी परिस्थिति अनुकूल असते ती यावेळीं बदललेली असते असें नव्हे. शिवाय लाटा उसळण्यास व फेंसाळण्यास जीं कारणें संभवत असतात, तीं या वेळीं विलुप्त झालेलीं असतात असेंही नव्हे. मग लाटांची गर्जना अकस्मात् मंद व्हावी, पाण्याचें उसळणें आणि फेंसाळणें थांबावें, हें घडून येण्याचें कारण तरी काय असावें? कांहीं नाहीं!

मनुष्य निरुत्साही व निष्क्रिय झाला असला म्हणजे त्याच्या मनाची सम्याप्रमाणें स्थिति झालेली असते असें आपणांस म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. पण समा झाल्यानंतर ओहोटी लागते व समुद्राच्या पाण्यास आलेली फुगवटी ओसरूं लागते; तशी कांहीं मनुष्याच्या मनाची स्थिति होत नाहीं. अशा तऱ्हेनें निरुत्साह आणि निष्क्रिय झालेल्या मनुष्याचें मन समुद्राच्या पाण्याप्रमाणें ओहोटूं लागेलच, म्हणजे जास्तच निरुत्साही अगर निष्क्रिय होईलच असें म्हणतां येणार नाहीं. उलट अशा

स्थितीनंतर तें बहुधा उल्हासितच होतें, असा आपला अनुभव असतो.

जागतिक दृष्ट्या पाहिलें, तर ही निष्क्रियता व हा निरुत्साह आवश्यक आणि समर्थनीय आहे असें कोणी म्हणणार नाहीं. प्रत्येक घडीला स्वत:चें असें कांहीं अमोलिक मोल असतें. एकाद्या अमोल वेळीं जबाबदार मनुष्य असा निष्क्रिय होऊन एकाद्या महत्कार्यांत व्यत्यय आला व त्या कार्याचा विनाश झाला तर त्याबद्दल त्याचें समर्थन कसें करावयाचें ? अर्थात् तें शक्यच नाहीं.

पण हा निरुत्साह आणि ही निष्क्रियता सर्वथैव तिरस्करणीय व त्याज्य आहे असें मात्र नव्हे. आपण निरुत्साही आणि निष्क्रिय होऊन स्वस्थ पडल्याची मागली एकादी स्थिति लक्षांत घेऊन पहा. त्या स्थितींतल्या विचारप्रणालींचें जें अस्पष्ट चित्र डोळ्यां-समोर उभें राहील, तेंच जास्त स्पष्ट दिसेल, अशा बेतानें अंत-र्दृष्टीनें पहाण्याचा यत्न करा. माझी अशी मनस्थिति लक्षांत घेतल्यानंतर मला नक्की असें लक्षांत येतें कीं, माझ्या मनांत त्या त्या वेळीं हिंदु तत्त्वज्ञानांतील अनेक जुने, संस्कारांनीं रुजलेले तात्त्विक विचार डोकावतात. अर्थात् हें तत्त्वज्ञान माझ्या तत्कालीन मनस्थितीस साजेसें असतें.

म्हणजे हें जग एकंदरींत क्षणभंगुर आहे, मनुष्य अबल असून सर्व कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् अशी शक्ति अदृश्य परमेश्वरा-च्या मनगटांत आहे व आपण एकाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणें आहोंत. त्यानें आपल्या मनांत प्रेरणा करावयाची व आपण तद-नुरूप काय तें करावयाचें—अगर आतां बसलों तसें चुपचाप निष्क्रिय

व निरुत्साह होऊन पडावयाचें. सारांश, विचारांचा सांचा असा ठराविक आणि जुना असा असतो. पण यावरून आपणांस एक विधान मात्र नक्की मांडतां येईल— मीच मांडतों असें नव्हे— कीं निरुत्साही आणि निष्क्रिय मनस्थिति अशा तऱ्हेनें तत्त्वज्ञानाची जननी होय. आपल्या मनांतून जेव्हां जेव्हां तत्त्वज्ञानाचे झरे पाझरूं लागतात, तेव्हां तेव्हां आपली मनस्थिति वर उल्लेखिल्या-प्रमाणेंच बहुशः झालेली आढळून येते. आपला एकादा अगदीं जवळचा नातलग वारला म्हणजे आपली दुःखानें अगदीं चमत्कारिक स्थिति होते. आपल्या दुःखानें दुःखित झालेला, समजूत करण्यास आलेला तत्त्वज्ञानी आपल्यास जें तत्त्वज्ञान सांगत असतो, तें बहुधा हें असेंच असतें. फार तर किंचित् पुढें होऊन तो म्हणेल कीं, आत्मा पूर्वदेह टाकून देहांतर करतो तशी ही स्थिति आहे. तूं नाहीं का तुझीं जीर्ण वस्त्रें बदलीत?

गीतेंतील एकंदर तत्त्वज्ञान अर्जुनाच्या अशाच मनस्थितीशीं थोडेंफार समरस होऊन पण स्वतःच्या मनाचा तोल जाऊं न देतां श्रीभगवंतानीं सांगितलें आहे. मग तें कर्मयोगाचें प्रतिपादन करीत आहे असें टीकाकार सांगोत, अगर तें एकंदरींत मानवाच्या निष्क्रियतेचा पाढा वाचो. ही निष्क्रियतेची स्थिति आपण जितक्या जास्त प्रमाणांत मानसिक दृष्ट्या अनुभवीत असतों, तितकाच आपला ओढा तत्त्वज्ञानाकडे जास्त प्रमाणांत होऊं लागतो. म्हातार-पणीं निरुत्साह आणि निष्क्रियता यांचे झटके वारंवार येऊं लागतांच मनुष्यास तात्त्विक ग्रंथांच्या वाचनांत काळ कंठावा असें वाटूं लागतें.

अशा तऱ्हेनें निरुत्साह व निष्क्रिय होणें थोडेंफार दोषास्पद असलें व One is nearer the truth when cheerful than

depressed या Varnon Lee वगैरेंच्या तत्त्वांशीं जरी तें विसदृश असलें, तरीही निरुत्साह आणि निष्क्रिय होण्यांत एक फायदा खास आहे; आणि तो म्हणजे परमेश्वराच्या अस्तित्वाची नक्की जाणीव होण्याचा. ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव होण्याइतका निरुत्साह आणि निष्क्रियता आपणांमध्यें खरोखरच मधून मधून बाणावयास पाहिजे आहे, तरच मानवी मनाची धाव योग्य मर्यादेंत राहील.

# वाचक, लेखक आणि खेडें

कॉनन्डाईल म्हणतो कीं, एकंदरींत मानवाचें आयुष्य हें इतकें तोकडें आहे व वाङ्मय तर इतकें अफाट आहे कीं, एकदां एक पुस्तक वाचल्यानंतर बहुधा तें पुस्तक मी पुन्हा वाचीत नाहीं. कॉनन्डाईलचीच काय, पण प्रत्येक सुशिक्षित वाचकाची जवळ जवळ हीच स्थिति झाली आहे. शहरांतून मोठमोठीं वाचनालयें असतात व त्यांत शेंकड्यांनीं मोजतां येतील इतकीं नुसतीं नियत-कालिकेंच असतात. ग्रंथ सोडूनच द्या, इतकीं नुसतीं नियत-कालिकेंच पूर्णपणें वाचणें आपणांस अशक्य असतें; म्हणून आपल्याला त्यांतल्या त्यांत आवडणाऱ्या एकाद्या विषयावरचे लेख आपण वाचतों व सगळ्या नियतकालिकांचा पसारा दूर करून श्रांत झालेल्या मनस्थितींत आपण घरीं परत येतों. आपला हा रोजचाच क्रम असतो. अशा तऱ्हेनें आपण रोज वाचतों व आपल्या ज्ञानांत भरपूर भर पडत आहे, असे मांडे मनांत नेहमीं खातों.

आपण भरपूर वाचतों खरें, पण आपण वाचलेल्या मजकुरावर सहसा मुद्दाम विचार करीत नाहीं; यदृच्छया विचार होईल तेवढाच. आपण रोज वाचतोंच कीं नाहीं, हें ध्यानांत घेणें माझ्या दृष्टीनें गौण आहे. खरा महत्त्वाचा मुद्दा, आपण वाचलें त्यावर विचार केला कीं नाहीं हाच आहे. आणि आवडत्या विषयावर रोज कांहीं ना कांहीं नवीन वाचावयास मिळत

असल्यामुळें, आपण वाचण्याच्या अनिवार इच्छेच्या भरांत पूर्वी वाचलेल्या मजकुरावर विचार करण्याचें लांबणीवर टाकतों आणि कालांतरानें सगळें विसरून जातों.

हीच स्थिति खरोखर शोचनीय होय. अवर्षणाचा दुष्काळ एक वेळ पुरवतो, पण ओला दुष्काळ जास्त भयंकर असतो म्हणतात. मी कांहींच वाचलें नाहीं, म्हणून माझें अज्ञान अमर्याद आहे, असें म्हणणाऱ्यांस आपल्या योग्यतेची खरी जाणीव तरी असते. पण नुसतें, विचार न करतां रोज भाराभर वाचणारा आपल्या ज्ञानाबद्दलची जी मिजास मारील, ती मात्र करुणास्पद होय.

यावर माझ्या दृष्टीनें एक अत्यंत सोपा उपाय आहे आणि तो म्हणजे मधून मधून कांहीं दिवस खेड्यांत जाऊन राहण्याचा. खेड्यांत वाचनालयें बहुधा नसतात. असलींच तर अशा वाचकांस तीं अगदीं तुटपुंजीं वाटतात. अशा स्थितींत जें काय आपण पूर्वीं वाचलें असेल, त्यावर विचार करणें अगर बरोबर आणलेलीं थोडकींच पुस्तकें वारंवार वाचून, चाळून विचार करणें हें क्रमप्राप्तच असतें. ही स्थिति, वाचकानें ग्रहण केलेले विचार पचविण्यास व आत्मसात् करण्यास पुष्कळ मदत करिते.

लेखकाच्या बाबतींत, खेड्यांतलें कांहीं दिवसांचें राहणें अनेक दृष्टींनीं हितकर असतें. सध्यां आपल्या मराठी वाङ्मयांत एका ठरीव वातावरणांतील पडसाद उमटलेले दिसतात. कादंबऱ्यांतून ठरीव स्थितींतील पात्रें रंगविलेलीं आढळतात व काव्यांतील शब्द क्वचित् नवे, पण बाकी सगळें जुनेंच अशी एकंदरींत अनुकंपनीय स्थिति झालेली आढळून येते. या सगळ्या लेखकांनीं आणि

कर्यांनीं मधून मधून खेड्यांत फेरफटका करावा आणि कांहीं दिवस—ज्यास जमेल त्यानें—नांगर हातीं घ्यावा व त्या प्रकारच्या जीवनाशीं समरस होण्याचा प्रयत्न करावा, किंवा स्वस्थ बसून तटस्थ वृत्तीनें तें जीवन पाहण्याचा तरी प्रयत्न करावा.

आणि काय मौज होईल मग ! जादूची कांडी फिरल्या-प्रमाणें होईल कांहीं तरी ! त्यांच्या लेखनांत प्रादेशिकतेचे पडसाद उमटतील. शेतकरी, हमाल, मोलमजुरी करणारे कष्टाळू गरीब, यांचीं स्वाभाविक हृदयस्पर्शी चित्रें त्यांच्या लिखाणांतून भरघोस उमटूं लागतील आणि मगच, झालें तर मराठी वाङ्मय परिस्थितिनिदर्शक होईल. रशियांतील झारशाहीनें उत्कृष्ट लेखकांस सैबेरियांतल्या थंड आणि बर्फाळ वाळवंटांत हद्दपार करून जगाच्या वाङ्मयावर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. मॅक्झिम गॉर्की, पुष्किन्, बुनिन, इव्हॅन टुर्जिनीव्ह वगैरे लेखकांस, मला वाटतें, त्यांची ही पुस्तकांपासून झालेली अनेक वर्षांचीताटातूटच श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मयसेवक बनविण्यास कारणीभूत झाली असावी. मराठी लेखकांनीं हा खेडेगांवांत राहण्याचा अज्ञातवास आपण होऊनच वर्षांतून कांहीं महिने स्वीकारावा, अशी माझी त्यांस प्रेमाची सूचना आहे.

आणि कवींनींही त्याच मार्गाचा अवलम्ब केला, तर त्यांचें आत्मगुंजन कांहीं काल तरी थांबल्याशिवाय राहणार नाहीं. मला तर नक्की वाटतें कीं, स—ला—तें, स—ला—ना—तें वगैरे प्रत्यया-त्मक काव्यविषयांस आजकालच्या कृतींतून पूर्ण फांटा देणें या-मुळेंच जमणार आहे.

म्हणजे लिहिण्यांतला मुद्दा असा कीं, आपणांपैकीं प्रत्येकाचें आयुष्य द्विविध असावयास पाहिजे. एकाद्या विषयावरील वाचन करावयाचें असेल, तर आपण बराच काल शहरांत घालवून तद्विषयक साहित्य गोळा करणें इष्ट होय. आणि ते सगळे विचार नीट घुसळून त्यांतून योग्य तत्त्वप्रतिपादनाची पात्रता आपल्या अंगीं यावी, म्हणून आपण कांहीं दिवस खेडेगांवांत थारेपालट करावयास पाहिजे. खेडेगांवांत राहण्यापासून इतर फायदे अगर तोटे वाटेल ते असोत, पण हा फायदा मात्र अत्यंत मोठा होय.

---

# भ्रामक अर्थान्तरन्यास

एकाद्या प्रसंगाविषयीं बोलतां बोलतां रंगलेला बोलका आणि ऐकणारा समरस श्रोता हे दोघेही त्यांत इतके रंगून जातात कीं, त्यांना अनेकदां वेळेचें भान राहत नाहीं. त्यांतून विषय थोडा-फार करुण असला— आणि असायचाच ; कारण जगांत मनुष्य आनंदाच्या— विशेषत: दु:खाच्या वेळींच जास्त मोकळ्या मनानें बोलण्याचा प्रयत्न करीत असावयाचा— म्हणजे मग जी त्यांची एकतानता होते ती विचारूंच नका. " अहो, मुलगा गेल्याचं कळलं मात्र," अशा शब्दांत विशिष्ट करुण प्रसंगाच्या वर्णनाला आरंभ व्हावयाचा, मधून मधून करुण कोंवळे शब्द व उसासे ऐकूं यावयाचे आणि मग श्रोत्याचें अन्त:करण ओलें होऊं लागावयाचें.

मग या सर्वाचा परिपाक म्हणून, " बाबा रे जग असंच आहे बरं," इत्यादि अर्थान्तरन्यास ऐकूं यावयाचे. सुशिक्षित असो, अर्धशिक्षित असो अगर बुद्धि व भावना जडावलेला आणि बोजड असलेला अशिक्षित असो, प्रत्येकजण आपापल्यापरीनें जगाच्या राहटीविषयीं अर्थान्तरन्यासात्मक बोलूं लागतो.

अर्थान्तरन्यास, एकंदरींत कवींचा, अरसिकांचा, गद्य-लेखकांचा, अक्षरशत्रूंचा, वक्त्यांचा, मुक्यांचा, श्रोत्यांचा, बहि-ऱ्यांचाही आवडता अलंकार आहे. 'जो अंतरीं निर्मळ आणि वाचेचा रसाळ' आहे, त्याच्या तोंडची प्रेमळवाणी ऐकण्याकरितां

जसा प्रत्येकजण थबकतो, त्याप्रमाणेंच असा एकादा अर्थान्तरन्यास अभावितपणें कानांवर आला म्हणजे आपणही जरा चरकून स्थिरावतोंच.

पण या प्रत्येक अर्थान्तरन्यासामध्यें जागतिक पूर्ण सत्यच स्पष्टपणें भरलेलें असतें असें नव्हे. पुष्कळदां असें होतें कीं, एकाद्या लहानशा प्रसंगावरून काढलेला अर्थान्तरन्यास अगदीं विपर्यासात्मक असतो. असा अर्थान्तरन्यास म्हणजे इसापनीतींतील गोष्टींचें जणूं कांहीं तात्पर्यच होय. असा अर्थान्तरन्यास त्या प्रसंगापासून अलिप्त असलेल्या निर्विकार माणसाच्या मनाला पटायचा तर नाहींच, पण त्याच्या दृष्टीस तो विनोदगर्भ भासून त्यास हसूंही येईल. तो अप्रकट व प्रकट म्हणेल "वा रे सिद्धान्त! आणि वा रे सिद्धान्ती!"

असे सिद्धान्त अगर अर्थान्तरन्यास बांधायची जगांतल्या प्रत्येकाची खोडच—सहजप्रवृत्तिच आहे. मागें मीं प्रो. फडक्यांचा क्रिकेटपटु गोडांबे यांच्याबद्दलचा एक लेख वाचला होता.

मुंबईचा चौरंगी का कोणतासा सामना गोडांब्यांनीं आपल्या गोलंदाजीवर जिंकला, पण आपण चेंडू टाकतांना "Swing" करितों हें मात्र गोडांब्यांस माहीत नव्हतें, असें कांहींसें अप्पासाहेबांनीं त्यांत लिहिलें. अगदीं तशीच स्थिति अनेकांची अर्थान्तरन्यासाबद्दलची आहे. असें कांहीं तरी तत्त्व बरळणारे बरेच वाचिवीर असे सांपडतात कीं, त्यांना हा "अर्थान्तरन्यास" असें ठाऊक नसतें. त्यांच्या अंतःकरणाला एवढेंच कळलेलें असतें कीं, समाधान करण्यासाठीं एखादें, शक्य तर सर्वांस लागू पडेल असें, वाक्य उच्चारावें आणि सगळ्या जगाच्या दुःखसमुद्रांत तुझें दुःख

कःपदार्थ आहे याची जाणीव करून द्यावी. प्रथम कलेचा प्रत्यक्ष उपयोग मग तंत्र; प्रथम भाषा मग व्याकरण, तसेंच प्रथम अर्थान्तरन्यासाचा प्रत्यक्ष उपयोग व मग ओळखीकरितां नामाभिधान, हें एका अर्थी क्रमप्राप्तच झालें.

पण वरच मीं असें म्हटलें कीं, आयुष्याबाबत बांधलेले असे अर्थान्तरन्यास अनेकदां विपर्यासात्मक आणि भ्रामक असतात म्हणून. असा अगदीं भ्रामक अर्थान्तरन्यास "गेले दिवस बाबा रे कधीं यायचे नाहींत," हा एक होय. "रम्य तें बालपण देइ देवा फिरुनि" असें म्हणणारा कविसुद्धां असेंच अप्रत्यक्ष रीतीनें म्हणत असतो कीं, मागले दिवस– गेलेले दिवस– पुन्हा येणार नाहींत.

या सिद्धान्तांचा आपल्या मनावर इतका घट्ट परिणाम झालेला आहे कीं, बहुशः आपण तो बुद्धीच्या निकषावर पारखून घेण्याची गरजच नाहीं असें मानून उपयोगांत आणीत असतों. अशा सिद्धान्तात्मक वाक्यांचा हाच तर मोठा दोष. जुने होऊन रूढ झालेले सिद्धान्त आपल्या बुद्धीची जागजागीं नजरबंदी करतात. बुद्धीच्या स्वैरसंचारास हे अर्थान्तरन्यास आणि सिद्धान्त दृढ बंधनेंच होत. केशवसुतांनीं "अस्मदीय हृदयीं ठरलें कीं जग हें दुःखें भरलें" किंवा– "धिकार या जगीं इच्छित न मिळे कांहीं" असें म्हटलें आहे; हें पूर्ण सत्य आहे काय ? किंवा कालिदास "किमिवहि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम्" म्हणतात. केवळ कालिदास श्रेष्ठ यावर जाऊं नका. पहा मनाला विचारून यांतलें पूर्ण सत्य. सौंदर्य आणि वृद्धत्व– पहा बरें जोडी कशी जमते ती ! तसें नको. उदाहरणादाखल "गेला दिवस पुन्हा प्राप्त होत नाहीं" हा सिद्धान्तच आपण पारखूं या.

रोज सूर्य उगवतो, दुपार होते आणि सूर्य मावळून रात्र होते व दुसरा दिवस– अगदीं तस्सा दिवस उजाडतो. दुसरा दिवस पहिल्यासारखा नाहीं असें बळेंच म्हणत बसावयाचें हा निव्वळ अट्टाहास ! याहून दुसरें नांव त्यास देतां यावयाचें नाहीं. अशा दुसऱ्या किंवा कोणत्याही दिवसाकडे पहिल्या दिवसाच्या दृष्टीनें पाहण्याची आपली संवय मोडली आहे. वास्तविक संपूर्ण सृष्टींत क्रमाक्रमानें त्याच त्याच दिवसांचा चक्रनेमिक्रम घडतांना स्पष्टपणें दिसतच असतो. वसंताचा आगम होतांच फुलांचा, फळांचा बहर आणि मंद सुगंधित, शीतल वायु इत्यादींचाही आविष्कार व्हावयाचाच. पर्जन्यकालांत लतावृक्षांचें स्नान, सरितांचें तुडुंब वाहणें– फोफावणें इत्यादि घडावयाचेंच. या प्रत्येक गोष्टीचा प्रत्यय आपणांस दर दिवशीं नव्हे, पण दरवर्षीं एकदां तरी घडतोच कीं नाहीं ? अशा तऱ्हेनें सृष्टींतल्या सगळ्या गोष्टी क्रमानें पुनः पुन्हा त्याच जुन्या स्वरूपांत तशाच घडतांना पाहून सुद्धां गेले दिवस पुन्हा येत नाहींत, असें म्हणण्यांत मनुष्याच्या हट्टीपणापेक्षां दुसरें काय सिद्ध होणार ? सृष्टींत तरी गेला दिवस गेला, पुन्हा येणार नाहीं, असें फारसें होत नाहीं.

अगदीं सृष्टींतल्यासारखेंच मनुष्याच्या आयुष्याचें आहे. तरुण वयांत तो असे किती तरी दिवस क्रमानें अनुभवीत असतो कीं, निवळ सुखेंच त्याच्या वांट्यास आलेलीं असतात. पूर्णपणें निष्काळजीपणाचें आयुष्य, सम परिस्थितींतले सहकारी आणि उमदी तब्येत अशा स्थितींत तो काय एकच हृत्पटलावर खोदून ठेवण्यासारखा दिवस अनुभवीत असतो ? असे दिवस मोजण्याच्या बाबतींत प्रत्येकाची एकाद्या म्हाताऱ्यासारखी स्थिति होत असते. कोल्हटकर म्हणतात कीं, कांहीं कांहीं म्हातारे आपलें तेंच तेंच

वय दरसाल सांगतांना दृष्टीस पडतात. त्यांना एकच आंकडा ठाऊक असतो. साधारणतः प्रत्येक मनुष्य गेलेल्या दिवसांकडे अशाच विसराळू, पण लोभी नजरेनें पाहतो आणि या लोभी नजरेनें पाहात असतांना 'आपण आजही त्याच दिवसाचा वास्तविक अनुभव घेत आहोंत' याची जाणीव त्यास असत नाहीं. अर्थात् हा दोष दिवसाचा अगर परमेश्वराचा नव्हे. परमेश्वर सृष्टीच्या बाबतींत व सृष्टींतल्या जीवांच्या बाबतींत खास सारखाच वागत असला पाहिजे. त्याचेजवळ ही मानवाची पक्षपाताची दृष्टि नाहीं.

मग मनुष्याच्या बाबतींत जर दिवस बदलत नाहींत, अगर बदलले तरी ते पुन्हा अनुभवावयास मिळतातच, तर मग खरें खुरें काय बदलतें ? 'परिस्थिति' हें एकच त्या प्रश्नाचें उत्तर. दिवसांचा आगम हा गणितांतल्या आवर्तदशांशासारखा आहे. ठरीव क्रमानें ठरीव वेळीं विशिष्ट दिवसाची पुनरावृत्ति व्हावयाची हाच सृष्टीचा नियम. पण परिस्थिति अशी ठरीव आणि मर्यादित नाहीं. ती मात्र अनंतविध असून अतिशय चंचल आहे. दिवस ज्या गतीनें जातात, त्याहूनही ती शीघ्र गतीनें बदलत असल्यानें आजचा दिवस आणि आजची परिस्थिति यांची पुन्हा आयुष्यांत गांठ पडण्याचे प्रसंग बहुशः येतच नाहींत; जणूं कांहीं दिवस आणि परिस्थिति यांचा पाठशिवणीचा खेळ चाललेला असतो व त्यांची कधींच पुनर्भेट व्हावयाची नसते.

पण म्हणून आपण त्याच परिस्थितीचा पुन्हा अनुभव घेत नाहीं, असें मात्र नव्हे हं ! आपण त्याच दिवसाचा जसा अनेकदां प्रत्यय घेतों, अगदीं त्याचप्रमाणें त्याच परिस्थितीचा अनुभवही अनेकदां घेतोंच. तरुण वयांत लग्न झाल्यावर देखील

आपण लग्नापूर्वीची परिस्थिति अनेकदां अनुभवतोंच कीं! म्हातार-पणीं दुबळें झाल्यावर ज्या परिस्थितीचा अनुभव आपण घेतों, त्याच परिस्थितीचा अनुभव ऐन तरुणपणीं जिवावरच्या दुखण्याच्या वेळीं आपण घेतलेला असतोच. सारांश, तीच तीच चंचल परिस्थिति सुद्धां आपण त्याच त्या दिवसाप्रमाणें अनुभवल्या-शिवाय राहात नाहीं हें खरेंच.

पण त्याबरोबर हेंही खरेंच कीं, तीं दोन्ही एकसमयावच्छेदें-करून अनुभवणें आपणांस जमत नाहीं; कारण तें आपल्या हातचें नाहीं. तीं दोन्ही एकत्र अनुभवण्याची इच्छा असली, तर परि-स्थितीस बंधनें घालण्याचा हव्यास मनुष्यानें धरावयास हवा. पण याचा अर्थ गेले दिवस ते गेलेच असा मात्र नव्हे. दिवस पुन्हा अनुभवतां येऊं शकतात हाच त्याचा अर्थ– अर्थात् परिस्थिति न बदलूं दिली तर! आणि मग परिस्थितीवर मात करणें साध्य झालें, म्हणजे असे हजारों सिद्धान्त आणि अर्थान्तरन्यास भ्रामक आहेत, याचा दृक्प्रत्यय यावयास काय उशीर!

# आज्ञाभंग

कांहीं कांहीं माणसांचा अगदीं जन्मजात स्वभावच. एकादी गोष्ट भावनेच्या भरांत ते करून जातील. ती जर इतरांच्या दृष्टीनें बरी झाली असली व त्याबद्दल त्यांस त्यांचेकडून शाब्दिक सर्टि-फिकेट मिळालें असलें, तर त्यांचे पश्चात् विचारांनीं कुलकुलत असलेलें मन निवेल व त्यांना आंतून समाधान वाटूं लागेल. पण त्याच गोष्टीबाबत इतरांनीं मौनव्रत स्वीकारलें, तर अशा माणसां-च्या मनाला आंतून स्वस्थता प्राप्त व्हावयाची नाहीं. आपलें कांहीं तरी चुकलें, असा एक विचार त्यांच्या मनाला सारखा बोचत राहील, व मोकळेपणाचें समाधान त्यांस लाभावयाचें नाहीं. आणि मग गोष्ट किती का क्षुल्लक असेना; किती वेळ तरी आंतून ठुसठुसत राहावयाचें हा त्यांचा स्वभावधर्मच. आणि हें कोठवर? त्यांच्या कृतीचा दृश्य परिणाम पूर्ण नष्ट होईपर्यंत.

परवां माझ्या बाबतींत पण अगदीं असेंच झालें. मीं आमच्या पांडूला कांहीं तरी एक काम सांगितलें. पांडू काम करीलच अशी पुरी खात्री. त्याच्या आज्ञाधारकपणाचें शिफारसपत्र मी त्याला अगदीं वाटेल तेव्हां फर्मास लिहून देईन.—पण त्या दिवशीं त्यानें तें काम केलें नाहीं व वर तो माझ्याशीं त्या बाबतींत मला न रुचेल अशा सुरांत वाद घालूं लागला. शेवटीं मीं त्याला कांहीं तरी टाकून बोलून स्वस्थ बसवलें आणि तो खिन्न होऊन दुसऱ्या कामाला निघून गेला. तें काम मात्र तसेंच राहिलें. वास्तविक मी तेंच करण्यास त्याला पुन्हा फर्मावूं शकलों असतों; पण संतापाच्याही

भरांत मला तें करवलें नाहीं व त्यानेंही तें केलें कीं नाहीं, याची मीं पुन्हा चौकशी केली नाहीं.

अर्थात् मीं त्याला तेंच काम पुन्हा करावयास सांगितलें नाहीं, यांत माझ्या मनानें अनेक गोष्टी अप्रकट कबूल केल्या, याची जाणीव आज मला आहे. एक तर, पांडू माझा नौकर असला, तरी तो माझा गुलाम नव्हे. आणि इमानी नौकरानें एखादें काम टाळणें हा त्याचा थोडाफार हक्क आहे. दुसरें असें कीं, त्यांत त्याचें मीं व्यक्तित्व कबूल केलें. शिवाय आजवर केलेल्या चाकरीची पुण्याई त्याच्यामागें होती ती या वेळीं त्यास उपयोगीं पडली.

पुष्कळदां आपण आपल्या नौकरास आज्ञा करतों आणि आपली आज्ञा पूर्णपणें मानली जाईल अशा भावनेंत आपण असतों. अशा वेळीं जर आपल्या आज्ञेचा भंग झालेला आढळला, तर आपण रागवतों. अर्थात् याचें खरें कारण आपला अभिमान. आपण अभिमानाचे बळी आहोंत. अशा वेळीं आपण खरोखर काम झालें नाहीं म्हणून रागवत नाहीं, आपला अभिमान चुरल्यामुळें, आपल्याला डिवचल्यामुळेंच आपण रागावलेले असतों. अभिमान हा मस्तकावर रत्न असलेल्या एकाद्या नागाप्रमाणें आहे. दिसायला गोंडस, गणला जायचा गुणांत आणि व्हायची सदा तारीफ. पण हरएक वेळीं आपला अभिमान जर वरचष्मा गाजवूं लागला, तर आटोपलाच कारभार ! अभिमानसुद्धां विनयप्रधान असावयास हवा.

आपले नौकराचेंच उदाहरण जास्त सखोलपणानें पाहूं या ना ! आज्ञाभंगांत आपल्या इमानी नौकराचा उद्देश आपला उपमर्द करण्याचा खचित नसतो. शिवाय तो आपला हुकूम मोडीत

असतांना बेदरकार कधींच नसतो. आज्ञाभंग करीत असतांना एक प्रकारचें तुमुल युद्ध—किंचित्काल का होईना— त्याच्या मनांत चाललेलें, चेहऱ्यावर, संजयाच्या दृष्टीनें आंधळ्याला सुद्धां स्वच्छ वाचतां येण्यासारखें उमटत असतें. हें द्वंद्व युद्ध कोणत्या दोघांत चाललेलें असतें? त्याची भावना व आपली आज्ञा यांत! पुष्कळदां, नव्हे नेहमींच, आपण जेव्हां एखादा हुकूम नौकरास सोडतों, तेव्हां त्याला मन आहे आणि त्याच्याही मनांत विचार आणि भावना आहेत, ही गोष्टच आपण विचारांत घेत नाहीं. आपणांस असेंच जणूं कांहीं अस्पष्टपणें वाटत असतें कीं, नौकर म्हणजे एक यंत्र. त्याला स्वत्व नाहीं, दया नाहीं, अभिमान नाहीं, कांहीं नाहीं. एका दृष्टीनें विकारविचारातीत म्हणून मुक्त; अगर अक्कल-भावनाशून्य म्हणून पशु, असेंच कांहीं तरी आपण त्याला समजत असतों. हुकूम सोडीत असतांना आपण बहुधा याच मनःप्रवृत्तींत असतों.

आणि नौकर? हुकुमाची तामिली करावयाची व शक्यतों प्रत्येक गोष्ट इमानेंइतबारें करावयाची, हा त्याचा आंतला विचार. पण त्याबरोबर त्याच्याही अंतःकरणांत भावना, अभिमान व स्वत्व असतेंच कीं. जोंपर्यंत या अभिमानास अगर स्वत्वास धक्का बसेल असे हुकूम मालक फर्मावीत नाहीं, तोंपर्यंत त्याचें कर्तव्य तो पूर्णपणें मन लावून बजावीत असतो व आपणांसही आपले हुकूम पाळले जात असल्याचें समाधान पूर्णपणें मिळत असतें.

पण या अभिमानाशीं, भावनांशीं व स्वत्वाशीं विसंवादी हुकूम आपण सोडला, तर हें झुंज लागलेंच म्हणून समजावें. आणि जितक्या जास्त प्रमाणांत आपल्या आणि आपल्या नौकराच्या

मनःप्रवृत्ति विसंवादी असतील, तितकें हें तुमुल युद्ध जास्त तीव्र होणार हें उघडच आहे. अशा वेळीं नौकरानें प्रत्यक्ष सांगितलें नाहीं, तरी त्याची असहकारिता अगर आज्ञाभंग आपणांस स्पष्टच सांगत असतो, 'तुमचे दुसरे नौकर आहेत. त्यांना सांगा कीं तें काम! ते करतील. माझ्यानें तें व्हावयाचें नाहीं. दुसरीं लाख कामें सांगा, मी अगदीं बंदा गुलाम आहें.'

आणि गंमत अशी कीं, अशी भावना प्रकट करण्याचा हक्क त्यास असूनही आपण त्याच्यावर रागावतों. कां? त्यानें आपला असहकारितेचा आणि आज्ञाभंगाचा अधिकार अमलांत आणला म्हणून! सध्यांच्या आपल्या हक्कांना जपण्याच्या कालांत आपण आपल्या मालक या नात्याच्या हक्कांना जपत असतांना, नौकरानें आपल्याही हक्कांना व भावनांना जपणें हें त्याचें कर्तव्यच नाहीं का! यापुढें मी तर उलट असेंच म्हणेन कीं, पांडूनें मधून मधून माझे हुकूम मोडून आपला हक्क वारंवार शाबीत करून घेण्यांत व माझा अभिमान डिवचून मला विचार करावयास लावण्यांतच त्याचें हित आहे. नाहीं तर मी मालक, वाटेल तें करावयास सांगावयाचा!

---

# दोन घुबड

समोर आडव्या पसरलेल्या सह्याद्रीच्या उत्तुंग रांगेवर आभाळांतले काळे ढग जागजागीं लोंबकळत होते आणि आम्ही तीन समव्यवसायी छत्र्या हलवीत आणि गरगरवीत एकमेकांशीं बोलत फिरावयास नदीच्या कांठाकडे जात होतों. आमचें भाषण प्रसंगाला अनुसरून अप्रासंगिक होतें. विशेषतः, सभ्य शब्दांत दुसऱ्यांच्या कुचाळक्या करण्याचें काम आमच्यांत चाललें होतें. इतक्यांत एक उंचच उंच गृहस्थ आमच्या समोरून येतांना आमच्या दृष्टीस पडले.

ते नुसतेच उंच होते. अगदीं शेवग्याची शेंग. नुसती लांब असते ना, तसे आणि तितकेच जाड ते गृहस्थ होते. पण ओली शेवग्याची शेंग थोडी टपोरी असते. हे गृहस्थ वाळलेल्या शेंगेसारखे होते. डोक्यावर पांढरी टोपी, अंगावर दहा दिवसांपूर्वीं धुतलेलें सुती उपरणें, निळा-रेघा असलेला लांब कोट, असा त्यांचा पोशाख होता. पन्नाशी गांठल्यामुळें वयपरत्वें आणि दातांच्या डॉक्टरांपरत्वें त्यांच्या तोंडाचें बोळकें झालें होतें. देहाप्रमाणें त्यांचे डोळे पण घारे होते. त्यांच्याबरोबर त्यांचे ए. डी. सी. पण होते. बरेच ठेंगणे, काळे, खोल डोळ्यांचे, खादी टोपीचे, खादीच्याच सद्यांतले इत्यादि इत्यादि........

ते दोघेही माझ्या स्पष्ट अवलोकनांत येण्यापूर्वींच मी त्यांना अमुक अमुक, एवंगुणविशिष्ट म्हणून ओळखलें होतेंच. एकाचा

माणसाची आणि आपली पहिली भेट झाल्यापासूनच त्याच्याबद्दल कांहीं तरी अनुकूल अगर प्रतिकूल मत आपण बनवीत असतों. तसेंच मी या दोघांविषयीं पूर्वीपासून बनविलें होतें—आणि तें म्हणजे त्या दोघांविषयींही माझ्या मनांत तिरस्काराच्या भावना निर्माण झाल्या होत्या हें. कांहीं कांहीं माणसांचा चेहराच आपल्याला आवडत नाहीं, मग त्या चेहऱ्यास अनुकूल अगर प्रतिकूल देहयष्टीचें सोडूनच द्या. त्या दोघांच्या चेहऱ्यांवरून मी हा त्यांच्याविषयींचा ग्रह बनविला होता व त्यांचा मी स्वतःशीं अगर खाजगी रीतीनें इतरांशीं घुबडांचे बाप म्हणून उल्लेख करीत असे.

पण या दोन घुबडांत मोठें माझ्या दृष्टीनें जास्त अभद्र आणि अपशकुनी ! तें जवळ येतांच त्यानें आमच्या नारायणरावांस उद्देशून नमस्कार केला. बाकीचे आम्ही त्यांच्या खिजगणतींत नव्हतों.

त्यांचा चेहरा आम्हां दोघांस उद्देशून असें सांगत होता, " दुर्दैवी पातकी पामरांनो ! आम्ही नमस्कार करणारे दोन आणि नमस्कार स्वीकारणारे हे तिसरे नारायणराव असे तिघे आर्यमातेचे, हिंदभूमीचे वंदनीय पुत्र आहोंत. आम्हां तिघांची तपश्चर्या आणि राष्ट्रसेवा थोर आहे. तुम्ही दोघे मशकं आहांत. तुम्ही नुसते कीटक आहांत. स्वर्गाचें दार आमच्यासाठीं खुणे-सरशी उघडणार असून वाटेल त्या वेळीं सदेह स्वर्गास जातां येईल, इतक्या पुण्याईची कमाई केलेले दिव्यात्मे आम्ही आहोंत."

'बापुजीं 'च्या या दोन शिष्यांनीं आमच्याकडे पाहिल्या-सारखें केलें व आम्हीही 'आम्ही पण कोणी तरी आहोंत; आपण

ज्या स्वर्गांत राहाणार त्या स्वर्गांत राहण्याची आमची तयारी नाहीं,' असें स्पष्ट निदर्शवीत–त्याच दृष्टीनें त्यांचा सत्कार केला आणि तिघेही पुढें चालूं लागलों.

अर्थात् हें सगळें चाललें असतां आम्ही तिघे अगर ते दोघे थांबले होते असें मुळींच नव्हे. सगळ्यांचीच गति किंचित् मंदावली येवढेंच. नमस्कार केल्यावर त्या उंच गृहस्थानें नारायणरावांस उद्देशून म्हटलें, "कां? ठीक चाललंय् ना एकंदरींत सगळीकडे?"

आम्ही पूर्वीच्या गतीनें चालूं लागल्यावरही, तोच, माझ्या दृष्टीनें तिरस्करणीय मनुष्य माझ्या मनांत घोटाळत होता. आणि त्याचे ते शब्द! मला गॅरिबाल्डीची आठवण झाली. इटलीला स्वातंत्र्य लाभावें म्हणून तरवार गाजवणारा जगद्वंद्य वीर गॅरिबाल्डी. गॅरिबाल्डीची निःस्वार्थता अतुलनीय आणि वंदनीय. एका राष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त करून देणारी व लाखांच्या सुखाकडे आणि आकांक्षांकडे चित्त पुरविणारी ती थोर विभूति. इटली स्वतंत्र झाल्यानंतर वास्तविक गॅरिबाल्डीचें केवढें वैभव आणि महत्त्व असावयाचें. पण त्या निःस्वार्थ पुरुषानें आपली तरवार म्यानांत ठेवून एकान्तवास स्वीकारला व जागतिक सुखाकडे कःपदार्थ या दृष्टीनें पाहिलें. त्या गॅरिबाल्डीनें, एकादा इटालियन त्यास अज्ञातवासाच्या गृहांत भेटण्यास आल्यावर ज्या सुरांत 'इटालीचें ठीक आहे ना एकंदरींत? काय हालहवाल?' असें विचारावें, त्या सुरांत या एका गृहस्थाची दुसऱ्यास केलेली आलबेली पाहून मी सर्दच झालों! स्वतःच्याविषयीं या क्षुद्र माणसाच्या केवढ्या भारदस्त, भरदार आणि भरमसाट कल्पना! दुसऱ्यांनीं केवळ 'बनवल्यानें' बनलेल्या आणि तुरुंगांतला अर्ध्या

वर्षांतला एक एक क्षण युगाप्रमाणें ज्याला भासला अशा या निष्क्रिय ऐतखाऊ माणसाची केवढी अहंमन्य बुद्धि ! या गृहस्थांना 'आपण एकदां तुरुंगांत जाऊन आलों' एवढेंच भूषण. तुरुंगांत त्यांनीं अधिकाऱ्यांपुढें—भंग्यांपुढें सुद्धां—कितीदां लांगूलचालन केलें, कितीदां अन्याय्य हुकुमांची तामिली केली, याचा इतिहास आम्हां दोघांसही हस्तें परहस्तें पुरा पुरा समजला असल्यामुळें, मी आणि दुसरे अनमस्कारित समवयस्क एकमेकांकडे पाहून हसलों नुसते ! शिवाय, 'आम्ही हें तुरुंगांत जाण्याचें महत्कृत्य उरकल्यावर आतां निर्लोभ आणि निर्विकार आहोंत; तुम्ही मात्र अजून मायापाशांत गुंतलां आहांत. गीतेची निष्कामकर्माची शिकवण शिका नारायणराव ! ' अशी भावना त्यांच्या क्षेमकुशलांत नारायणरावांबाबत दिसून आली, तिचेंही आम्हांस हसूं आलें.

त्या आमच्या हसण्यांत एकंदरींत एकच भावना प्रकट होत होती. ती ही कीं, 'नुसत्या तुरुंगांत जाण्यानें देशभक्त होत नाहीं. कांहीं तरी उच्च ध्येय, उच्च विचार, वाचन, मनन, स्वतःची कर्तबगारी, आकांक्षा इत्यादींनीं जो भरीव असेल, तोच आमच्या दृष्टीनें एका साध्या नमस्कारास पात्र, तुमच्यासारखीं दोन गतानुगतिकें, अंधश्रद्धेंत चाचपडणारीं माणसें आमच्या दृष्टीनें दोन घुबड ! '

# सिंहावलोकन

मुखा वळवुनी जरा वळुन पाहतो मागुती
कितीक हृदयें वदा चरवल्याविणें राहती ?

—केशवसुत

लाख टोंचण्या उभ्या राहतिल टोचायातें फिरून्
कशाला मागें बघती वळून्

—अज्ञातवासी

खिन्नतेचा पगडा मनावर बसला, म्हणजे मनुष्याला मागील आयुष्यक्रमावर दृष्टि टाकून मन रमवावेंसें वाटतें आणि रोमांचकारी परंतु दुःखाचे चटके लागतील अशा प्रसंगांपेक्षां सौख्यपूर्ण असे प्रसंगच आठवीत राहण्यांत त्याच्या मनाला समाधान वाटत असतें. मागल्या– गत आयुष्यांतल्या – अशा प्रसंगांची मालिका म्हणजे आयुष्याच्या सहारांतील विलोभनीय हिरवळी होत आणि त्यांतून दूर गेलों असतांही आपण मनसा तेथेंच राहण्याचा प्रयत्न करण्यांत एका प्रकारें मृगजल प्राशन करण्याचा आपण हव्यास धरीत असतों.

परंतु आयुष्य पूर्णपणें सहारासारखें नाहीं, तें थोडेंसें डोंगराच्या अवघड चढणीसारखें आहे. आपण सारखें चढत असावें, चढतां चढतां तीव्र उन्हाची तिरीप सारखी आपल्या देहास बोंचण्या देत असावी व आपल्या अंगांतून घाम सारखा पाझरत असावा, अशा तऱ्हेचें कांहीं तरी आपल्या वर्तमान आयुष्याबद्दल म्हणतां

येईल. वर्तमान आयुष्य वास्तविक कितीही का सुखांत लोटत असेना, त्यांतल्या दुःखाकडेच बोट दाखविण्याकडे आपल्या मनाचा कल असतो. आणि म्हणूनच, 'कसें काय? ठीक चाललें आहे ना?' असें कोणी विचारलें तर, बहुधा नेहमींच आपल्या आई वडिलांपैकीं कोणी तरी कालच मृत्युमुखीं पडल्यामुळें आपली शोचनीय स्थिति झाली आहे, असें दर्शविणाऱ्या सुतकी मुद्रेनें "हं! चाललाय्, बरं आहे झालं!" असें आपण म्हणतों.

वास्तविक वर्तमानकाल आपणांस वाटतो इतका दुःखपूर्ण नसतो व गतकालही आपण मानतों तेवढा सुखपूर्ण गेलेला नसतो. 'धन्य तें बालपण देइ देवा फिरुनि' असे उद्गार काढतांना आपण देवाजवळ संपूर्ण बालपण मागत असतों, असें मानणें चुकीचें होणार आहे. बालपणांतील आनंदाचे दिवस प्रथम ध्यानांत आणून, आपण त्या आनंदमय जीवनांतील फक्त निरामय, सुखपूर्ण कालच पुन्हा प्राप्त व्हावा हीच आपली भावना आणि वासना आपण या शब्दांच्या द्वारें प्रकट करीत असतों. प्रत्येक वेळीं मनुष्याची दृष्टि अशी चोखंदळासारखी असते. वर्तमानाकडे पहात असतांना तिला क्लेशांचाच फक्त ढिगारा दिसतो व मागील कालांतील मनोहारित्वच फक्त तिच्या प्रत्ययास येत असतें.

आणि म्हणूनच मी म्हणतों कीं, आपलें आयुष्य एकाद्या उत्तुंग वृक्षलताच्छादित अशा गिरिशृंगासारखें आहे. आपण प्रत्यक्ष तुडवीत असलेल्या आयुष्यांतील खाचखळगे व वळणें यांच्या प्रत्ययानें आपलें मन वर्तमानाविषयीं सदाच उदासीन असावयाचें व त्यामुळें मागील आयुष्य फार सुखपूर्ण गेलें असें मानण्याकडे प्रवृत्ति व्हावयाची हें साहजिकच होय. गतायुष्याच्या बाबतींत आपणांस थोडी

तिऱ्हाइताची वृत्ति प्राप्त झालेली असते. आपण एकादा डोंगर शरदृऋतूंत दुरून पाहिल्यावर आपणांस जसें वाटतें, अगदीं तसेंच गतायुष्याकडे पाहतांना वाटत असतें. आयुष्यपथाची इतकी चढण आपण आपल्या परिश्रमांच्या जोरावर संपविली आहे व तिच्याकडे पाहत असतांना अनुभवास येणारा आनंद आपल्याच श्रमसातत्याचें फल होय, या भावनेनेंच आपण मागील आयुष्याकडे बघत असतों.

अशा वेळीं इंद्रधनुष्याकडे पाहण्याची आपली दृष्टि व गतकालावर खिळून राहिलेली आपली दृष्टि यांत मुळींच अंतर नसतें. गतायुष्य म्हणजे इंद्रधनुष्यच होय. इंद्रधनुष्याकडे अमका हिरवा रंग, तमका जांभळा, तमका निळा असें पृथक्करणात्मक दृष्टीनें पाहणें शास्त्रज्ञास आनंददायक होईल व तो त्याबाबत आणखी संशोधनाच्या खोल पाण्यांत शिरेल. पण ही संशोधकाची पृथक्करणदृष्टि वेगळी. ही दृष्टि बहुजनसमूहाची नसते. जनसमूह ऐनजिनसी सौंदर्यांतून आनंद निवडून घेत असतो व संशोधक पृथक्करणांतून ज्ञानाचे कण व तद्भव आनंद गोळा करीत असतो.

गतायुष्याकडे पाहण्यांतही अगदीं हाच भेद दोन भिन्न प्रकृतींच्या माणसांत आढळून येतो. आपली दृष्टि सर्व गतायुष्यांतून मिळून आनंद निवडून घेण्याची असते. अर्थात् हीच दृष्टि प्रत्येकाची नसली तरी बहुतेकांची असते. गतायुष्याकडे चिकित्सक दृष्टीनें पाहून त्यांतील मानवी गुणधर्म, मनाला प्रत्यहीं लागलेली दिशा, परिस्थितीनें दिलेली कलाटणी यांकडे व इतर विशिष्ट प्रसंगांवरून सुचलेल्या प्रमेयांकडे लक्ष पुरविण्याची दृष्टि विवेचकाचीच. विवेचक काय, किंवा सामान्य जन काय, गतायुष्यांतील सिंहावलोकनांतून निर्भेळ आनंदाचें सारच अनुभवण्याचा प्रयत्न करीत

असतो; पण तें या दोन प्रकारांनीं—म्हणून दोन प्रकारचें. त्यांत भोगलेल्या दुःखांकडे आपण सिंहावलोकन करतांना ठळकपणें पाहूंच शकत नाहीं.

आणि आपण हीच विचारपद्धति गतकालीन इतिहासाशीं पडताळून पाहण्याचा अगर मागल्या इतिहासाचें सिंहावलोकन करण्याचा प्रयत्न केला, तर काय वाटूं लागेल आपल्याला? आपण नेहमींच म्हणतों, 'गुप्तकालीं हिंदुस्थानांत सुवर्णयुग होतें. किंवा समुद्रगुप्ताच्या दरबारांत हिंदुस्तानच्या अखिल वैभवाचें सार एकवटलें होतें. किंवा शिवछत्रपतींच्या काळीं महाराष्ट्रांतील हिंदूंस दुःख फारसें जाणवलेंच नाहीं, निव्वळ सुखाचाच पाऊस पडला.' हीं विधानें प्रत्यक्ष इतिहासाच्या दृष्टीनें कितपत सत्यास धरून होतील? मागील इतिहासाबद्दल अशा तऱ्हेनें विधानें करीत असतांना आपण सत्यनिष्ठ न्यायाधिशाचा आव आणतों खरा, पण आपली दृष्टि एकांगी म्हणून दोषपूर्ण असतेच. अगदीं अशाच एकांगी व दोषपूर्ण दृष्टीनें आपणांपैकीं प्रत्येकजण आपल्या गतायुष्याचें सिंहावलोकन प्रत्यहीं करीत असतो.

पण या एकांगी दृष्टीनें पाहण्यांतही आपणांस पाहिजे असलेलें सुख आपणांस अनुभवतां येतें व म्हणून या गुणैकदृष्टीचें महत्त्व तसेंच आहे. गतकालांतील सुखांकडे एकाग्रचित्त करून अन्तर्दृष्टीनें पाहिलें, तर त्यांतले किती तरी क्षुल्लक पण सुखकारी प्रसंग आपणां-पुढें तरळूं लागतात. वास्तविक ते प्रसंग किती क्षुल्लक, पण असा प्रत्येक प्रसंग अन्तःकरणांत सुखाचें माप भरपूर ओतीत असतो. शिवाय या प्रसंगांचें विशेष असें कीं, सगळेच आपल्या अंतर्दृष्टीपुढें अतिशय ठळकपणानें उभे रहात असतात. एकादी लहानशी वस्तु

सूक्ष्मदर्शक काचेंतून पाहिली म्हणजे जशी ती जास्त ठसठशीत दिसते, अगदीं तसेंच या क्षुल्लक प्रसंगांचें होतें. जणुं कांहीं आपली अन्तर्दृष्टि म्हणजे सूक्ष्मदर्शक यंत्रच.

अशा वेळीं मनांत एक विचार चमकून जातो. कांहीं काल-पर्यंत मनुष्याच्या बाह्यदृष्टीचे व्यापार आपोआप बंद होण्याचा निसर्गाचा नियम असता तर फार बरें झालें असतें. विस्मरणाच्या धूळींत लोळत पडलेल्या क्षुल्लक वा महत्त्वाच्या प्रसंगांच्या कितीतरी हिरकण्या प्रकाशित करण्याचें सामर्थ्य मग अन्तर्दृष्टीस प्राप्त झालें असतें व मग अल्पकाल टिकणारी ही बाह्यान्धता आवश्यक व सुखकरच वाटली असती! ही बाह्यान्धता मनुष्यास निसर्गप्राप्त नसल्यानें, अनेक बाह्य गोष्टींकडे व अन्तःसृष्टींतलि प्रसंगांकडेही डोळेझांक करण्याची प्रवृत्ति मनुष्यास उत्पन्न झाली आहे; ती कांहीं मोठीशी फायदेशीर नव्हे.

५५७८

# तुळसीपूजा

सध्यां आपला समाज विशिष्ट प्रकारच्या एका संक्रमणावस्थेंतून जात आहे. ती संक्रमणावस्था बौद्धिक वाढीमुळें व इंग्रजी विचारांच्या सम्पर्कानें होत आहे. या क्रांतीचें स्पष्ट चिन्ह हें कीं, पूर्वींच्या कांहीं चालीरीतींस आणि रूढींस आज आपण बव्हंशीं फांटा दिलेला आहे.

ज्या गोष्टी आपण पूर्णपणें—नव्हे अर्धवट—टाकल्या आहेत, यांतली वृक्षपूजा ही एक होय. दसऱ्याच्या दिवशीं 'शिलंगणास' केवढी तरी यात्रा अजूनही जमते व तेथें रूढीस अगर जुन्या चालीरीतीस अनुसरून आपण पैशाभरेचें सोनें खरेदी करतों खरें; पण आपण, ज्याला कांहीं अर्थच उरला नाहीं, असें कांहीं तरी करीत आहोंत, असें आपणांस नक्की वाटतें. कोण " शास्त्रोक्त " शमीपूजन करतो, जाऊं द्या कीं! असा निरुत्साहपूर्ण आणि उपेक्षात्मक विचार आपल्या मनांत डोकावतो. अर्थात् याचें कारण बौद्धिक चालना हेंच होय. " जुनें जाउं द्या मरणालागुनि! जाळुनि किंवा पुरून टाका " हे केशवसुतांचे शब्द आपण या बाबतींत अमलांत आणतों.

अशा तऱ्हेनें एका काळीं अत्यंत पूज्य मानल्या गेलेल्या, कौरव-पांडवांच्याही इतिहासाशीं संबद्ध असलेल्या शमी वृक्षाचें पूजन करण्याच्या बाबतींतला कटाक्ष आपण सोडून दिला आहे. कुठें तरी, कोणी तरी आपट्याच्या डाहळ्या सोनें म्हणून विकीत

असतो; आपल्यापैकीं कोणी तरी एक विकत घेत असतो व आपण सगळेजण एक पैशांत श्रीमंतीचें मृगजल पिण्याचा प्रयत्न करतों. पुष्कळ वेळां या सीमोल्लंघनाची पद्धतशीर उपेक्षा करावयाची असली, तर आपण, लोक कोणत्या दिशेनें जातात हें पाहतों आणि नंतर नक्की त्यांच्या विरुद्ध दिशेनें फिरावयास निघतों.

ज्याप्रमाणें शमीपूजनाचे बाबतींत आपण उदासीन झालों आहोंत, त्याप्रमाणें पिंपळाचेभोंवतीं तासन् तास फेऱ्या मारण्याच्या बाबतींत बायका उदासीन झाल्या आहेत.

पण मनुष्य कितीही बुद्धिप्रधान आणि तर्ककर्कश असेना; त्याच्या विशाल अंतःकरणांत असा एक मऊ कोपरा असतो कीं, त्यांत भावना व गत रूढींचा अभिमान सदा सुप्तावस्थेंत असतो. याच तरुपूजा-प्रसंगाचें उदाहरण घेऊं या. एकंदरींत वृक्षपूजनांत वेडसरपणा आणि भोळेपणाचा भाग बराच असला, तरी तुलसी-पूजेंत मात्र स्वर्गीय भावनांचा बराच भाग आहे, असें मानण्या-कडे आपल्या मनाची प्रवृत्ति होते. आपल्या संसाराची स्वामिनी इतर गोष्टींप्रमाणें तुलसीपूजेच्या बाबतींत अत्यंत जागरूक असते. तुलसीपूजा झाल्याशिवाय ती आपल्याला जेवावयास वाढावयाची नाहीं व कितीही गर्दी असली, तरी तुलसीपूजा उरकेपर्यंत आपणही धीर धरतोंच. त्यांतूनही अतिशय घाईत जेवतां जेवतां, तुलसी-पूजा अजून व्हावयाची आहे असें कळलें, तर आपला घांस तोंडांतल्या तोंडांत किंचित् अडखळतो व आपला घांस असलेला हातही किंचित् जडावल्यासारखा होतो. हजारों वर्षांच्या चालत असलेल्या तुलसीपूजेच्या पवित्र वातावरणाचा आपल्या मनावर असा विलक्षण परिणाम झाला आहे. आपल्या घरच्या तुलसी-

वृंदावनाभोंवतीं असें पवित्र वातावरण सारखें भरून राहिलेलें असतें व तेथें गेल्यावर क्षणभर तरी आपलें मन किल्मिषरहित आणि सात्त्विक झाल्याशिवाय राहत नाहीं.

आपल्या धाकट्या बहिणीनें किंवा मुलीनें संध्याकाळच्या वेळीं हातपाय धुऊन तुळशीला नमस्कार करून 'तुळसी तुळसी एकादशी' इत्यादि कायसें तें म्हणावयास सुरुवात केली, म्हणजे आपण अगदीं मन्त्रमुग्ध होतों. त्या तिच्या म्हणण्यांत कांहीं खोल अर्थ भरलेला नाहीं, हें आपणांस माहीत असतें. एवढेंच नव्हे, तर त्यांत कांहींच अर्थ भरलेला नाहीं, हेंही आपणांस माहीत असतें. भावना प्रकट करणें हें अनेकदां शब्दांच्या आवांक्याबाहेरचें आहे म्हणतात. मुलींचा भोळाभाव हात जोडण्याच्या कृतींत व या शब्दांत ओतला जात असतो. म्हणून सुज्ञपणा दाखवण्याकरितां आपण त्यांना 'असलें कांहीं निरर्थक बडबडत जाऊं नका' म्हणून सांगत नाहीं. उलट, "नाना, आम्ही तुळशी तुळशी म्हटलं हो!" असें त्यांनीं म्हटलें, म्हणजे आपण त्यांना प्रेमानें कुरवाळतों. तुळसीपूजेचें हें एकंदरींत वेड तर खरेंच, पण तें गोड वेड आहे व तें वेड नसण्यापेक्षां असणेंच जास्त पटींनीं सरस व श्रेष्ठ होय, असें आपण आपल्या मनास हरघडी बजावलेलें असतें.

कुठल्याशा एका पुस्तकांत मीं अनेकदां वाचलें आहे—हो, वामनराव जोशांच्या रागिणींतच. तें असें कीं, ज्ञान मिळवण्याचे जे मार्ग आहेत, त्यांतला तर्क हा जसा एक मार्ग आहे, तसाच तर्कातीत असा भावनांचा एक मार्ग आहे. तुळसीपूजा करणें वेडेपणाचें पूर्ण द्योतक आहे, असें सिद्ध करणें तार्किकाला सहज शक्य होईल; पण तें आपल्या सद्भावनांना पटावयाचें नाहीं.

तुलसीपूजेच्या विरुद्ध कोणी आक्षेप घेतला, तर आपल्या भावना नक्की दुखतात व तो एकंदर वादविवाद आपल्यास बराच अप्रिय व विषादजनक होतो.

आणि या सर्वांचें कारण माझ्या मतें एकच. आपण सहज १०॥, ११ च्या सुमारास आपल्या घराकडे परतत असतों, रस्त्याच्या बाजूच्या एकाद्या घराकडे आपली दृष्टि वळते व त्या घरच्या एकाद्या सौभाग्यवती स्त्रीचें तुलसीपूजन चाललेलें सहजच आपल्या दृष्टीस पडतें. तिची ती परमेश्वराविषयींचे गंभीर विचार मनांत बागडत असलेली, किंचित् ध्यानमग्न, हात जोडलेली मूर्ति पाहिली कीं, आपल्या अन्तःकरणांत पावित्र्याचा उज्ज्वल प्रकाश तेवूं लागतो. मला तर अशा वेळीं सारखें वाटतें कीं, आपण अगदीं धावत जाऊन तें नैवेद्याचें दूध तेवढें पटकन् पिऊन टाकावें! त्याला वास्तविक मी दूध म्हणण्यासच तयार नाहीं; तें साक्षात् अमृतच होय.

केव्हांही, तुलसीपूजेचा प्रकार पाहिला, कीं आपल्या अंतःकरणांत तें पावित्र्य पुन्हा पुन्हा प्रदीप्त होत असल्याचा भास आपणांस होत असतो. आणि म्हणूनच, जिच्यामुळें आपल्या अंतःकरणांत निव्वळ सात्त्विक आणि स्वर्गीय भावनांचाच उदय होतो, ती तुलसीपूजा तार्किकाला कितीही हेटाळणी करण्यासारखी वाटली, तरी ती खरोखरच तशी उपहासास्पद आहे, असें आपणांस वाटणें कदापि शक्य नाहीं.

५५७८

— समाप्त —

REFBK-0005578